CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, १९ मे २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक १७० । पाने १२ । किंमत रु. ८/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com






आॅडीओ क्लिपची चर्चा खरी असली तर अजितदादांबद्दल खालच्या पातळीवर बोलणाऱ्याला सोडणार नाही. तो कितीही मोठा नेता असला तरी त्याला सोडणार नाही. त्याला व्याजासहित उत्तर देऊ.
- **अमोल मिटकरी**, माजी आमदार


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

**सोलापूर**, मंगळवार, १९ मे २०२६





राष्ट्रांवर संकट वाढेल, गरिबी वाढेल, हे तुम्हाला निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर समजले का? त्यांना आता सवय झाली आहे, सुखाची आणि अय्याशीची. ते ढोंग करीत आहेत.
- **संजय राऊत**, नेते



गुजरातमधील कच्छ आणि राजस्थानातील सांभर सरोवरातील लक्षावधी फ्लेमिंगा पक्ष्यांचे थवेच्या थवे नवी मुंबईतील ऐरोली आणि ठाणे खाडी परिसरात दाखल झाले आहेत. चिखलात येणारे शेवाळ हे या पक्ष्यांचे खाद्य आहे

## अनावश्यक सोने खरेदीला लागला ब्रेक

◆ **नवी दिल्ली, १८ मे**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना अनावश्यक सोन्याची खरेदी टाळण्याचे आवाहन केल्यानंतर देशातील सोन्याच्या खरेदीच्या प्रवृत्तीत लक्षणीय बदल दिसत असल्याचे एका सर्वेक्षणामधून समोर आले आहे.

'लोकल सर्कल्स'च्या अहवालानुसार, सोन्याची खरेदी करणाऱ्या सुमारे ६१ टक्के लोकांनी पुढील एक वर्षासाठी अनावश्यक सोने खरेदी न करण्याचा निर्णय घेतला आहे. भारतामध्ये सोन्याची आयात विक्रमी पातळीवर पोहोचल्याच्या पृष्ठभूमीवर हा बदल महत्त्वाचा मानला जात आहे. वाढत्या आयातीमुळे परकीय चलन साठ्यावर दबाव निर्माण होत असून जागतिक आर्थिक अस्थिरतेच्या काळात सरकारकडून यावर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न सुरू आहे. याच कारणामुळे पंतप्रधानांनी परकीय चलन वाचवण्यासाठी नागरिकांना सोन्याची अनावश्यक खरेदी टाळण्याचे आवाहन केले होते. अहवालानुसार आर्थिक वर्ष २०२६ मध्ये भारताने सुमारे ७१.९८ अब्ज डॉलर्स इतक्या किमतीचे सोने आयात केले आहे, जे मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे २४ टक्क्यांनी जास्त आहे.

◂(वृत्तसंस्था)

# महिलांना मोफत प्रवास; तीन हजार रुपयांची मदत

● **अधिकारी सरकारने घेतले पाच मोठे निर्णय** ● **सातव्या वेतन आयोगाच्या स्थापनेला मंजुरी**

◆ **कोलकाता, १८ मे**

पश्चिम बंगालच्या शुभेन्दू सरकारने सोमवारी मंत्रिमंडळ बैठकीत पाच मोठे निर्णय घेतले. बैठकीनंतर बंगाल सरकारचे मंत्री अग्निमित्र पॉल यांनी सांगितले की, मंत्रिमंडळाने महिलांसाठी अन्नपूर्णा योजना आणि सातव्या वेतन आयोगाच्या स्थापनेला मंजुरी दिली आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील महिलांना १ जूनपासून दरमहा ३,००० रुपयांची आर्थिक मदत मिळणार आहे. तसेच १ जूनपासून महिलांना सरकारी बसमधून मोफत प्रवासही करता येईल.

पॉल यांनी पुढे सांगितले की, मंत्रिमंडळाने राज्य कर्मचारी, संलग्न वैधानिक संस्थांचे कर्मचारी आणि शैक्षणिक संस्थांसाठी सातव्या वेतन आयोगाच्या स्थापनेलाही मंजुरी दिली आहे. मंत्रिमंडळाने जूनपासून धार्मिक गटांना मिळणारी सरकारी मदत थांबवण्याचाही निर्णय घेतला आहे. नागरिकत्व सुधारणा कायद्या (सीएए) अंतर्गत नागरिकत्वासाठी अर्ज करणारे आणि मतदार यादीत समावेशासाठी न्यायाधिकरणाकडे अर्ज करणारे अन्नपूर्णा योजनेसाठी पात्र असतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शुभेन्दू सरकारने आपल्या पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीत मोठे निर्णयही घेतले आहे. ज्यात शालेय नोकऱ्यांसाठी अर्ज करणाऱ्या अर्जदारांच्या वयोमर्यादेत पाच वर्षांची वाढ करण्यास मंजुरी देण्याचा समावेश आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी निवडणूक प्रचारादरम्यान याबाबतचे आश्वासन दिले होते. ते शुभेन्दू सरकारने पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजूर केले. राज्यात आयुष्मान भारत योजनेच्या अंमलबजावणीलाही मंजुरी देण्यात आली आहे. विशेष म्हणजे, मागील तृणमूल काँग्रेस सरकारने ही योजना लागू करण्यास नकार दिला होता. या योजनेअंतर्गत केंद्र सरकार आर्थिकदृष्ट्या दुर्बळ कुटुंबांना आरोग्य विमा प्रदान करते. आता बंगालमधील लोकांनाही या योजनेचा लाभ घेता येईल.

◂(वृत्तसंस्था)

### भूखंड वाटपाची प्रक्रिया ४५ दिवसांत

» **शुभेन्दू सरकारने बांगलादेश सीमेवर कुंपण घालण्यासाठी सीमा सुरक्षा दलाला (बीएसएफ) जमीन वाटप करण्याच्या निर्णयालाही मंजुरी दिली. बंगालमधील घुसखोरी रोखण्यासाठी हा सरकारी निर्णय महत्त्वपूर्ण आहे. सीमा कुंपणासाठी भूखंड वाटपाची प्रक्रिया सोमवारी सुरू झाली असून, ती ४५ दिवसांत पूर्ण होणे अपेक्षित आहे.** ■



### जनगणनेसंदर्भातील परिपत्रकाची तत्काळ अंमलबजावणी करा

» **शुभेन्दू सरकारने बंगालमध्ये भारतीय राष्ट्रीय न्याय संहिता (बीएनएस) औपचारिकपणे लागू करण्याचाही निर्णय घेतला आहे. यापूर्वीच्या ममता बॅनर्जी सरकारने ती लागू करण्यास नकार दिला होता. बंगाल सरकारने जनगणनेसंदर्भातील गृह मंत्रालयाच्या जून २०२५ च्या परिपत्रकाची तत्काळ अंमलबजावणी करण्याचे आदेशही दिले आहेत, ज्याकडे मागील सरकारने दुर्लक्ष केले होते.** ■

# ट्रम्प यांच्या 'स्टॉक ट्रेडिंग'वरून चौकशीची मागणी

### सल्लागारांकडून हजारो शेअर्सचे व्यवहार

◆ **वॉशिंग्टन, १८ मे**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. यावर्षीच्या पहिल्या तीन महिन्यांत ट्रम्प किंवा त्यांच्या सल्लागारांकडून हजारो शेअर व्यवहार झाल्याचे समोर आले. या व्यवहारांमुळे हितसंबंधांच्या संघर्षाबाबत नवे प्रश्न निर्माण झाले असून वॉल स्ट्रीटमधील तज्ज्ञांनाही आश्चर्याचा धक्का बसला आहे.

एका अहवालानुसार, जानेवारी ते मार्च या कालावधीत ट्रम्प यांच्याशी संबंधित तब्बल ३,७०० हून अधिक स्टॉक व्यवहार झाले. म्हणजेच दररोज सरासरी ४० पेक्षा जास्त व्यवहार करण्यात आल्याचे समोर आले आहे. मागील तिमाहीच्या तुलनेत हा आकडा प्रचंड वाढलेला असल्याचे सांगितले जात आहे. या व्यवहारांमध्ये



अमेरिकेतील अनेक मोठ्या तंत्रज्ञान, वित्तीय, सुरक्षा आणि मीडिया कंपन्यांच्या शेअर्सचा समावेश होता. एनव्हिडिया, मायक्रोसॉफ्ट, ॲमेझॉन, मेटा प्लॅटफॉर्म्स, बोईंग आणि ओरॅकल कॉर्पोरेशन यांसारख्या कंपन्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्यात आली आहे. विशेष म्हणजे काही व्यवहारांमध्ये लाखो ते कोट्यवधी डॉलर किमतीचे शेअर्स विकले किंवा खरेदी करण्यात आल्याचेही उघड झाले आहे. फेब्रुवारी महिन्यात मायक्रोसॉफ्ट, मेटा आणि ॲमेझॉनमधील मोठ्या हिस्सेदारीची विक्री झाल्याचेही समोर आले आहे.

◂(वृत्तसंस्था)

### मीडिया, मनोरंजन क्षेत्रातही गुंतवणूक

» **मीडिया आणि मनोरंजन क्षेत्रातील अनेक कंपन्यांमध्येही गुंतवणूक करण्यात आली होती. या संपूर्ण प्रकरणामुळे अमेरिकेत पुन्हा एकदा नैतिकता आणि राजकीय पारदर्शकतेवर चर्चा सुरू झाली आहे. कारण ज्या कंपन्यांमध्ये व्यवहार झाले, त्या अनेक कंपन्यांवर अमेरिकन सरकारच्या धोरणांचा थेट परिणाम होतो. कृत्रिम बुद्धिमत्ता, संरक्षण, निर्यात धोरण, तंत्रज्ञान नियंत्रण आणि मक्तेदारीविरोधी चौकशा अशा संवेदनशील विषयांशी संबंधित क्षेत्रांमध्ये या कंपन्या कार्यरत आहेत.** ■

# जामीन हा नियम, यूएपीएमध्येही तुरुंगवास अपवाद

### सर्वोच्च न्यायालयाचा आरोपीला जामीन

◆ **नवी दिल्ली, १८ मे**

जामीन हा नियम आहे आणि अगदी बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायद्यांतर्गतचा तुरुंगवासही अपवाद आहे, असे निरीक्षण नोंदवताना सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी एका व्यक्तीला जामीन मंजूर केला. जम्मू-काश्मीरमधील मादकपदार्थांची तस्करी व दहशतवादाला वित्तपुरवठा करणाऱ्या एका सीमापार टोळीमध्ये कथित सहभाग असल्याच्या आरोपावरून एका अत्यंत गाजलेल्या मादकपदार्थ-दहशतवाद प्रकरणाचा खटला या व्यक्तीवर सुरू आहे.

न्या. बी. व्ही. नागरत्ना आणि न्या. उज्ज्वल भुयान यांच्या न्यायासनाने हंडवाडा येथील रहिवासी सय्यद इफ्तिखार अंद्राबी याला दिलासा दिला आणि त्याला पासपोर्ट जमा करण्याचा तसेच दर १५ दिवसांनी एकदा स्थानिक पोलिस ठाण्यात हजेरी लावण्याचा निर्देश दिला.

बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायद्यातील आणि भादंवितील विविध तरतुदींच्या अंतर्गत २०२० मध्ये



दाखल करण्यात आलेल्या प्रकरणाचा तपास एनआयए करीत आहे. बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायद्याच्या कलम ४३ डी(५) अंतर्गत अनिश्चित काळासाठी तुरुंगवासाचे समर्थन करता येणार नाही आणि ते कलम २१ व २२ च्या अधीन राहूनच लागू झाले पाहिजे. या कलमात जामिनावर कठोर निर्बंध घालण्यात आले आहेत.

जामीन हा नियम असावा आणि कारावास हा अपवाद असावा, हे अनुच्छेद २१ आणि २२ मधून निष्पन्न होणारे एक घटनात्मक तत्त्व आहे तसेच निर्दोषत्वाची गृहिती हा कायद्याच्या राज्यावर आधारित कोणत्याही सुसंस्कृत समाजाचा मूलाधार आहे, असे न्यायासनाने नमूद केले.

के. ए. नजीब खटल्यातील निर्णय हा एक बंधनकारक कायदा आहे आणि कनिष्ठ न्यायालये, उच्च न्यायालये किंवा सर्वोच्च न्यायालयाच्याच कमी सदस्यसंख्या असलेल्या न्यायासनांकडून या निर्णयाची तीव्रता कमी केली जाऊ शकत नाही अथवा त्याकडे दुर्लक्ष केले जाऊ शकत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

के. ए. नजीब प्रकरण हा २०२१ मध्ये एक बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायद्याच्या अंतर्गत जामिनाबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेला एक ऐतिहासिक निकाल आहे. अंद्राबीने जम्मू-काश्मीर आणि लडाख उच्च न्यायालयाने दिलेल्या एका आदेशाला आव्हान दिले होते. या आदेशान्वये त्याचा जामीन अर्ज फेटाळण्यात आला होता. अंद्राबी सीमेपलिकडील दहशतवादी हस्तकांच्या संपर्कात होता, असे आदेशात नमूद करण्यात आले होते.

◂(वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### कान्समध्ये अशोक-निवेदिताने उमटवला ठसा



**मुंबई** : सर्वात प्रतिष्ठित चित्रपट महोत्सवांपैकी एक मानल्या जाणाऱ्या कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये यंदा मराठी कलाकारांनी विशेष छाप पाडली आहे. मराठी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ आणि अभिनेत्री निवेदिता सराफ यांनी फ्रान्समध्ये सुरू असलेल्या या आंतरराष्ट्रीय सोहळ्यात मराठी संस्कृतीची झलक दाखवत रेड कार्पेटवर वेगळी ओळख निर्माण केली. अशोक सराफ पांढऱ्या रंगाचा सूट आणि काळ्या रंगाची पँट अशा लूकमध्ये दिसले. तर निवेदिता सराफ यांनी महाराष्ट्राच्या पारंपरिक वैभवाची ओळख असलेली पैठणी साडी परिधान केली होती. यासोबतच त्यांनी दागिने, गजरा आणि पारंपरिक साजशृंगार करून आपला लूक पूर्ण केला होता. विशेष म्हणजे, रेड कार्पेटवर येताच अशोक सराफ यांनी हात जोडून उपस्थितांना नमस्कार केला. ■

### 'राजा शिवाजी'ने केला १०० कोटींचा टप्पा पार



**मुंबई** : जिओ स्टुडिओज आणि मुंबई फिल्म कंपनीची निर्मिती असणारा 'राजा शिवाजी' या ऐतिहासिक चित्रपटाने देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर १०० कोटी रुपयांची ग्रॉस कमाई करत मराठी चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील सर्वात मोठ्या ब्लॉकबस्टर चित्रपटांपैकी एक होण्याचा मान पटकावला आहे. प्रदर्शनाच्या १७ व्या दिवशी या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवरची पकड मजबूत ठेवत ४.०७ कोटी रुपयांची कमाई केली. १०० कोटी ग्रॉस कमाई करत ८४.५५ नेट कमाई केली आहे. तिसऱ्या आठवड्यात अवघ्या ३ दिवसात ८.९७ कोटी रुपयांचा ग्रॉस कलेक्शन केले. 'राजा शिवाजी' या चित्रपटाने प्रदर्शनाच्या सतराव्या दिवशी एकूण ८४.५५ कोटी रुपयांची नेट कमाई केली. ■

### 'डिसी'चा ट्रेलर प्रदर्शित

**मुंबई** : वामिका गब्बीचा आगामी चित्रपट 'डीसी' प्रदर्शनासाठी सज्ज आहे. चित्रपटाचा ट्रेलर ७९व्या कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये प्रदर्शित करण्यात आला. 'डीसी'मधून दिग्दर्शक ते अभिनेता बनलेले लोकेश कनगराज अभिनयात पदार्पण करत आहेत. ३ मिनिटे १३ सेकंदांच्या या ट्रेलरमध्ये लोकेश कनगराजला देवदास आणि वामिकाला चंद्राच्या भूमिकेत दाखवण्यात आले आहे. चंद्राच्या पालकांनी तिला अनेक वर्षांपूर्वी कोलकाता येथे बेकायदेशीरपणे विकले होते. देवदास हा पोलिसाच्या आणि डॉक्टर चंद्राच्या हत्येच्या आरोपाखाली वॉन्टेड असल्याचे समजते. यानंतर ट्रेलरमध्ये जबरदस्त ॲक्शन पाहायला मिळतो. ■




# १३ लाखांहून अधिक युवक मादक पदार्थांच्या आहारी

### जम्मू-काश्मीरमधील स्थितीही चिंताजनक

◆ **जम्मू, १८ मे**

पंजाबनंतर आता जम्मू-काश्मीरमध्ये मोठ्या प्रमाणात युवक मादकपदार्थांच्या आहारी जात असल्याची माहिती समोर आली आहे. सरकारी आकडेवारीनुसार राज्यातील तब्बल १३ लाखांहून अधिक लोक विविध प्रकारच्या मादक पदार्थांच्या विळख्यात अडकले आहेत.

काही वर्षांपूर्वी हा आकडा सुमारे सहा लाखांच्या आसपास होता. अल्पावधीत व्यसनाधीनांची संख्या दुपटीहून अधिक वाढल्याने प्रशासन, सुरक्षा यंत्रणा आणि समाजामध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. अधिकाऱ्यांच्या मते, जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादासोबतच मादकपदार्थांच्या सेवनाचे नेटवर्कही वेगाने वाढत आहे. सीमावर्ती भागातून पाकिस्तानमार्गे मादकपदार्थांची तस्करी होत असल्याचा संशय आहे. या वाढत्या तस्करीमुळे युवकांचे आयुष्य उद्ध्वस्त होत असून राज्याच्या सुरक्षेलाही मोठा धोका निर्माण झाला. राज्याचे पोलिस महासंचालक नलिन प्रभात यांनीही या परिस्थितीबाबत गंभीर इशारा दिला आहे. त्यांनी ड्रग्ज नेटवर्क आणि पाकिस्तान समर्थित दहशतवाद यांच्यातील संबंधांकडे लक्ष वेधत हे संकट जम्मू-काश्मीरसमोरील सर्वात मोठ्या समस्यांपैकी एक झाल्याचे म्हटले आहे.

◂(वृत्तसंस्था)

### प्रशासनाची विशेष नशामुक्ती मोहीम

» **या पृष्ठभूमीवर प्रशासनाने राज्यभर विशेष नशामुक्ती मोहीम सुरू केली आहे. शाळा, महाविद्यालये, धार्मिक संस्था आणि स्थानिक समुदायांच्या माध्यमातून युवकांमध्ये जनजागृती केली जात असून लाखो लोकांनी या मोहिमेत सहभाग घेतल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात आला आहे.** ■

## वेतनवाढीवरून मुंबई विमानतळावर गोंधळ

◆ **मुंबई, १८ मे**

छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सोमवारी सरकारी मालकीच्या ग्राऊंड हँडलिंग कंपनी, एअर इंडिया एअर ट्रान्सपोर्ट सर्व्हिसेस लिमिटेडच्या (एआयएएसएल) कर्मचाऱ्यांनी पगारवाढ आणि इतर मागण्यांसाठी आंदोलन केले. या आंदोलनामुळे विमानतळावर गोंधळ उडाला. या आंदोलनाचा थेट परिणाम विमानांवरही झाला. एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्सप्रेसच्या अनेक विमानांना विलंब झाला.

एआयएएसएल कर्मचारी विमानतळांवर प्रवासी चेक-इन, सामान चढवणे, विमानांची स्वच्छता आणि इतर आवश्यक सेवा हाताळते. कर्मचाऱ्यांच्या अचानक झालेल्या आंदोलनामुळे या सेवा विस्कळीत झाल्या आणि विमान वाहतुकीवर परिणाम झाला.

एअर इंडियाने एक निवेदन जारी करून म्हटले की, हे आंदोलन एका त्रयस्थ एजन्सीच्या कर्मचाऱ्यांनी केले होते, परंतु त्यांची टीम परिस्थिती हाताळण्यासाठी आणि प्रवाशांना होणारा त्रास कमी करण्यासाठी अथक प्रयत्न करीत आहे.

◂(वृत्तसंस्था)

# व्ही. डी. सतीशन् यांनी घेतली केरळम्च्या मुख्यमंत्रिपदाची शपथ

### २० आमदारांचाही शपथविधी



◆ **थिरुवनंतपुरम्, १८ मे**

व्ही. डी. सतीशन् यांनी सोमवारी केरळम्च्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ आर्लेकर यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची येथे शपथ दिली. सतीशन् यांनी देवाच्या नावाने शपथ घेतली.

सतीशन् यांच्याव्यतिरिक्त त्यांच्या कॅबिनेटमधील २० सदस्यांनीही येथे आयोजित भव्य समारंभात शपथ घेतली. २० कॅबिनेट सदस्यांमध्ये काँग्रेसचे वरिष्ठ नेते रमेश चेन्नीथला, के. मुरलीधरन्, ए. पी. अनिल कुमार आणि केरळ प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष सनी जोसेफ यांचा समावेश आहे. आययूएमएलचे वरिष्ठ नेते पी. के. कुन्हालिकुट्टी, आरएसपीचे नेते शिबू बेबी जॉन, केरळ काँग्रेसचे नेते मॉन्स जोसेफ, केरळ काँग्रेसचे (जेकब) नेते अनुप जेकब आणि सीएमपीचे नेते सीपी जॉन यांनीही आज शपथ घेतली.

मंत्रिमंडळात १४ नवीन चेहरे आहेत; यामध्ये मुख्यमंत्री सथीसन यांचाही समावेश आहे. ते २००१ पासून परावूरमधून निवडून येत असूनही, पहिल्यांदाच एखादे शासकीय पद भूषवत आहेत. मंत्रिमंडळात अनुसूचित जातीतील दोन सदस्यांसह दोन महिलांचा समावेश आहे.

मंत्रिमंडळातील नव्या चेहऱ्यांमध्ये सीएमपीचे नेते जॉन, आययूएमएलचे नेते एन. शमशुद्दिन, के. एम. शाजी, पी. के. बशीर आणि व्ही. ई. अब्दुल गफूर यांचाही समावेश आहे. काँग्रेसचे नेते पी. सी. विष्णुनाथ, रोजी एम. जॉन, बिंदू कृष्णा, टी. सिद्दिक, के. ए. तुलसी आणि ओ. जे. जनीशदेखील पहिल्यांदाच मंत्री झाले आहेत.

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे, ज्येष्ठ नेते राहुल गांधी शपथविधी सोहळ्यासाठी उपस्थित होते. त्यांच्या व्यतिरिक्त काँग्रेस शासित राज्यांतील मुख्यमंत्री, केरळम्चे माजी मुख्यमंत्री पी. विजयन्, डावे नेते, भाजपाचे प्रतिनिधीही सोहळ्यासाठी उपस्थित होते. शपथविधी सोहळ्यासाठी केरळम्मधील काँग्रेसचे हजारो कार्यकर्ते पोहोचले होते. ◂(वृत्तसंस्था)


# मद्यपानाचा थेट संबंध ६२ आजारांशी

### संशोधनातून झाले खुलासे

◆ **वॉशिंग्टन, १८ मे**

'स्टेटस सिम्बॉल' मानल्या जाणाऱ्या मद्यपानाचा थेट संबंध कॅन्सरसह ६२ आजारांशी आहे. हा खुलासा एका नवीन संशोधनातून करण्यात आला आहे. मद्यपानाचे व्यसन हे यकृतासह कॅन्सरसारख्या जीवघेण्या आजारांनाही निमंत्रण देत असल्याचे नवीन संशोधनात स्पष्ट झाले.

'ॲडिक्शन' या वैद्यकीय नियतकालिकामध्ये 'मद्यपानाचे प्रमाण आणि आजारांचा धोका' या विषयावर एक शोधनिबंध प्रसिद्ध झाला आहे. मद्यपानाचा थेट संबंध तब्बल ६२ आजारांशी असल्याचे या शोधनिबंधामध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. या संशोधनात ५० हून अधिक अशा आजारांची यादीच समोर आली आहे, जे केवळ आणि केवळ मद्यपानामुळेच होतात. यात वेगवेगळ्या प्रकारचे कॅन्सर, पोटाचे



विकार, टीबीसारखे संसर्गजन्य आजार आणि हृदयाच्या गंभीर आजारांचा समावेश आहे. या अभ्यासानुसार, मद्यपानामुळे आपल्या शरीरातील हार्मोन्सचे संतुलन बिघडते, अन्नाचे पचन नीट होत नाही, शरीराला पोषक तत्व मिळत नाहीत आणि मानसिक आरोग्य बिघडून माणसाचे वागणे-बोलणेही बदलू लागते, असेही अभ्यासात नमूद केले आहे. मद्यपानामुळे केवळ रोग प्रतिकारशक्ती कमी होत नाही, तर कॅन्सरसारखे आणि इतर कधीही न बरे होणारे मोठे आजार होण्याचा धोका प्रचंड वाढतो.

### अति मद्यपान म्हणजे...

» **ज्युर्गेन रेहम यांनी 'अल्कोहोलचा वापर आणि मद्यपीपणाशी संबंधित धोके' (२०११) नावाच्या अभ्यासाचा हवाला देत 'हेवी ड्रिंकिंग'ची व्याख्या स्पष्ट केली आहे. महिलांसाठी दिवसाला ४० ग्रॅमपेक्षा जास्त शुद्ध अल्कोहोल (साधारण ४१ मिली किंवा १.४ औंस दारू) तर पुरुषांसाठी हेच प्रमाण दिवसाला ६० ग्रॅमपेक्षा जास्त शुद्ध अल्कोहोल (साधारण ६२ मिली या २.१ औंस दारू) पिणे म्हणजे अति मद्यपान आहे.** ■

आपण हातावरील किंवा जखमेवरील जंतू मारण्यासाठी सॅनिटायझर किंवा जंतुनाशक वापरतो, यात अल्कोहोल असते. विचार करा, अल्कोहोल जंतूंना मारण्यासाठी वापरले जाते, ते मुळातच एक प्रकारचे विष आहे. तर ते आपल्या शरीरासाठी कसे चांगले असेल, असे अमेरिकेतील हृदयविकार तज्ज्ञ डॉ. अँड्र्यू फ्रीमन यांनी सांगितले. ६२ प्रकारचे आजार होण्यासाठी मद्यपान करणे हे एक प्रमुख कारण आहे. मद्य नसते तर हे आजार जगात अस्तित्वातच नसते. असे आणखी ३० आजार आहेत ज्यात अल्कोहोलची भूमिका असते. स्तनाचा आणि इतर कर्करोग, हृदयरोग, पक्षाघात, मधुमेह आणि स्मृतिभ्रंश, यासाठी मद्यपान हेच कारण ठरते, असे 'ॲडिक्शन' नियतकालिकेमध्ये प्रकाशित शोधनिबंधाच्या लेखकांपैकी एक डॉ. ज्युर्गेन रेहम यांनी स्पष्ट केले.

◂(वृत्तसंस्था)

## १८ लाखांचा अवैध खतसाठा जप्त

◆ **जालना, १८ मे**

शहरातील नवीन मोंढा परिसरात कृषी विभागाच्या भरारी पथकाने कारवाई करत अवैध खत साठ्यावर छापा टाकला. या कारवाईत सुमारे १,७६२ खताच्या गोण्या आणि अंदाजे १८ लाख रुपयांहून अधिक किंमतीचा संशयित खतसाठा जप्त करण्यात आला.

या प्रकरणी संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार, कृषी विभागाच्या विभागीय आणि जिल्हा भरारी पथकाने नवीन मोंढा येथील एपीएमसी मार्केटमधील एका गाळ्यावर अचानक तपासणी केली. या ठिकाणी ट्रकमधून मोठ्या प्रमाणात खताच्या गोण्या उतरवण्यात येत असल्याचे निदर्शनास आले. तपासात विविध प्रकारची खते आढळून आली असून संपूर्ण साठ्याची किंमत अंदाजे १८ लाख ७ हजार रुपयांपेक्षा अधिक असल्याचे स्पष्ट झाले.

◂(वृत्तसंस्था)

सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | मंगळवार, १९ मे २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# ‘चारचाकी’ची ‘मालट्रक’ला धडक

# सख्ख्या बहिणी जागीच ठार, तान्ह्या बाळाचा उपचारादरम्यान मृत्यू

### पती-पत्नी जखमी; मृतदेहांना अक्षरशः ओढून काढावे लागले

### शासकीय रुग्णालयात नातेवाईकांनी केला एकच आक्रोश

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १८ मे-

देवदर्शनासाठी पुण्याहून भरधाव निघालेली एम.एच.१२ एन.जे.९९४२ या क्रमांकाची मारुती सुझुकी हे चारचाकी वाहन एम.एच.३८ एक्स ११२१ या क्रमांकाच्या चालत्या मालट्रकला पाठीमागून धडकल्याने झालेल्या भीषण अपघातात





सख्ख्या बहिणी जागीच ठार झाल्या. दरम्यान, दीड वर्षाचा तान्ह्या बाळाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. यात चारचाकी चालवणारा मुलगा व सून जखमी झाले. या अपघाताची तीव्रता इतकी भीषण होती की, ‘चारचाकी’मधील मृतदेह अक्षरशः ओढून बाहेर काढावे लागले. ही घटना सोलापूर-पुणे महामार्गावरील कोंडी शिवारात सोमवार, दि.१८ मे २०२६ रोजी सकाळी ६.१५ वाजता घडली.

याबाबतचे वृत्त असे की, पुणे जिल्ह्यातील देहुरोड येथील उमेश मोरे आणि त्यांचे काही



नातेवाईक हे एम.एच.१२ एन.जे.९९४२ या क्रमांकाच्या मारुती सुझुकीतून श्रीक्षेत्र तुळजापूर, अक्कलकोट येथे दर्शनासाठी मोहोळमार्गे येत होते. भरधाव असलेली ही चारचाकी पुणे-सोलापूर महामार्गावरील कोंडी शिवार (ता.उत्तर सोलापूर) येथे एम.एच.३८ एक्स ११२१ या क्रमांकाच्या चालत्या मालट्रकला पाठीमागून जोरदार धडकली. या अपघातात सिंधू रवि खंडागळे (वय-४२), नंदा भाऊराव हाताळकर (वय-४५, दोघेही रा.पिंपरी चिंचवड, जि.पुणे) ह्या दोघी जागीच ठार झाल्या. सिंधू खंडागळे व नंदा हाताळकर ह्या दोघी सख्ख्या बहिणी आहेत.

रुद्राक्ष उमेश मोरे या दीड वर्षाच्या तान्ह्या बाळाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. रुद्राक्षची आई साक्षी उमेश मोरे आणि वडील उमेश प्रकाश मोरे हे पती-पत्नी जखमी झाले आहेत. साक्षी मोरे यांच्यावर सोलापुरातील अश्विनी रुग्णालय तर उमेश मोरे यांच्यावर छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार (सिव्हील हॉस्पीटल) रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले. दरम्यान, घटनेची माहिती पुण्यातील नातेवाईकांना समजताच नातेवाईकांनी दुपारपर्यंत येथील शासकीय रुग्णालयात धाव घेत एकच आक्रोश केला. या अपघात प्रकरणी सोलापूर तालुका पोलिस ठाण्यात उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती.

#### तान्ह्या बाळाचे वडील चालवित होते चारचाकी

दीड वर्षाच्या मृत तान्ह्या बाळाचे वडील व यातील जखमी उमेश प्रकाश मोरे हे चारचाकी चालवित होते. या भीषण व हृदयद्रावक अपघातात चारचाकीचा पुढचा भाग पूर्ण चेंदामेंदा झाला. त्यामुळे मृतांना अक्षरशः ओढून बाहेर काढावे लागल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. मृतदेह आणि जखमींना टोलनाक्यावरील रुग्णवाहिकेद्वारे शासकीय रुग्णालयात आणण्यात आले.

---

### विचारपुष्प



संघाचे सर्व कार्यक्रम भगव्या ध्वजाच्या साक्षीने होतात. संघाची शाखा भगव्या ध्वजाला वंदन करून सुरू होते व भारत मातेची प्रार्थना म्हणून संपते. भगवा ध्वज हा संघात गुरुस्थानी मानला जातो. मानवी जीवनाला मार्ग दाखवणारा तो दीपस्तंभ आहे.

**- स्व. मधुभाई कुलकर्णी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

### महत्त्वाचे

#### कच्चे तेल ११० डॉलर पार; रुपयाचा नीचांक

**मुंबई** : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला वेळ वेगाने निघून चालली आहे, असा कडक इशारा दिल्यानंतर जागतिक पातळीवर तणाव वाढला आहे. याचे थेट पडसाद भारतीय शेअर बाजारात उमटल्याचे पाहायला मिळाले. सोमवारच्या सत्रात भारतीय शेअर बाजाराची सुरुवात मोठ्या घसरणीने झाली. बाजार उघडताच सेन्सेक्स ८०० पेक्षा जास्त अंकांनी कोसळला तर, निफ्टीमध्ये २०० हून अधिक अंकांची घसरण झाली. मात्र, दिवसभराच्या पडझडीनंतर माहिती तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्रातील कंपन्यांच्या शेअर्समध्ये झालेल्या जोरदार खरेदीमुळे बाजाराने पुन्हा उभारी घेतली.

---

## गंगेसह अनेक नद्या मृतप्राय होण्याच्या मार्गावर

### ऑक्सिजन पातळीत मागील काही दशकांत लक्षणीय घट

◆ **बीजिंग, १८ मे**

जागतिक तापमानवाढ आणि सातत्याने बदलणारे हवामान यामुळे पृथ्वीवरील नद्यांचे अस्तित्वच धोक्यात येत असल्याचा इशारा एका नव्या आंतरराष्ट्रीय अभ्यासातून समोर आला आहे. वाढत्या तापमानामुळे नद्यांमधील नैसर्गिक ऑक्सिजनची पातळी वेगाने कमी होत असून यामुळे जलचर जीवसृष्टी आणि संपूर्ण परिसंस्थेवर मोठा परिणाम होत आहे.

या संशोधनात भारतातील गंगा नदीचाही समावेश करण्यात आला असून गंगेतील ऑक्सिजन पातळीत मागील काही दशकांत लक्षणीय घट झाल्याचे निरीक्षण



नोंदविले गेले आहे. हीच स्थिती जर कायम राहिली तर भविष्यात अनेक नद्या मृतप्राय अवस्थेत रूपांतरित होण्याची भीती आहे. चीनमधील संशोधकांनी १९८५ ते २०२६ या काळातील सुमारे २१ हजार नद्यांचा सखोल अभ्यास केला असून उपग्रह तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने मिळालेल्या निष्कर्षांनुसार जगभरातील नद्यांमधील ऑक्सिजन पातळी सरासरी २.१ टक्क्यांनी घटली आहे. हा बदल छोटा वाटला तरी दीर्घकालीन परिणाम अत्यंत गंभीर असल्याचे संशोधकांचे म्हणणे आहे. वाढते जलप्रदूषण, कार्बन उत्सर्जन आणि मानवी हस्तक्षेपामुळे नदीच्या आरोग्यावर मोठा ताण निर्माण झाल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. पाण्याचे वाढते तापमान हे देखील या घटनेमागील एक महत्त्वाचे कारण मानले जात आहे. कारण उष्ण पाण्यात ऑक्सिजन कमी प्रमाणात मिसळतो. *(वृत्तसंस्था)*

### ड्राय बल्ब टेम्परेचर म्हणजे काय?

ड्राय बल्ब टेम्परेचर म्हणजे हवे[illegible] सामान्य तापमान होय. ते स[illegible] थर्मामीटरने मोजले जाते. या थर्मामीट[illegible] बल्बभोवती कोणतेही ओले कापड गुंडा[illegible] नसते, त्यामुळे त्याला ‘ड्राय बल्ब’ म्हणतात. हे तापमान वातावरणातील उ[illegible] दर्शवते, परंतु हवेमधील आर्द्रतेचा त्याव[illegible] परिणाम होत नाही. हे सर्वसा[illegible] वातावरणीय तापमान असते. ते सेलि[illegible] किंवा फॅरेनहाइटमध्ये मोजले जाते. हव[illegible] अंदाज, एअर कंडिशनिंग आणि औद्यो[illegible] प्रक्रियांमध्ये याचा मोठ्या प्रमाणात वापर [illegible] तापमान मोजण्याच्या या पद्धतीचा वापर आणि रेफ्रिजरेशन प्रणालींच्या कार्यक्षमते[illegible] शेती व औद्योगिक क्षेत्रात ताप[illegible] नियंत्रणासाठी केला जातो.

---

**नीट पेपरफूट प्रकरण**

## लातूरचा ‘आरसीसी क्लास’ चालक मोटेगावकरला अटक

### नऊ दिवसांच्या सीबीआय कोठडीत रवानगी

◆ **पुणे, १८ मे**

देशात गाजत असलेल्या ‘नीट’ पेपरफुटीप्रकरणात पुण्यानंतर आणखी एका हायप्रोफाईल अटक झाली असून, लातूरमधील प्रसिद्ध आरसीसी क्लासेसचा संचालक शिवराज रघुनाथ मोटेगावकर (वय ४७) याला केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने अटक केली. सलग तीन दिवसांच्या चौकशीनंतर ही अटक करण्यात आली. एका व्हायरल व्हिडीओनंतर मोटेगावकर हा नीट पेपरफुटीत सहभागी असल्याचा संशय होता. आरसीसी क्लासेसच्या मॉक टेस्टमधील अनेक प्रश्न आणि प्रत्यक्ष नीट परीक्षेतील प्रश्न जुळल्याची बाबही तपासात समोर आली आहे. अटकेनंतर न्यायालयाने नऊ दिवसांच्या सीबीआय कोठडीत पाठविले आहे.



मराठवाड्यातील शिक्षण क्षेत्रात लातूरमधील आरसीसी क्लासेसचा शिवराज मोटेगावकर म्हणजे मोठे प्रस्थ मानले जाते. सीबीआयची चमू गेल्या तीन दिवसांपासून त्याच्या लातूरमधील घरी चौकशी करत होती. सीबीआयने रविवारी त्याना पुण्यातील कार्यालयात आणून पुन्हा काही तास कसून चौकशी केली आणि त्यानंतर रात्री उशिरा त्याला अटक करण्यात आली. तत्पूर्वी लातूरमधील त्याच्या ‘आरसीसी क्लासेस’ कार्यालय आणि निवासस्थानी छापे टाकले.

आरसीसी संस्थेमध्ये विद्यार्थ्यांना ‘नीट-यूजी’ परीक्षेचे प्रशिक्षण दिले जाते. या संस्थेच्या एकूण नऊ शाखा असून मुख्य शाखा लातूर येथे आहे. प्रा. मोटेगावकरचे राष्ट्रीय परीक्षा संस्था (एनटीए)शी संबंधित रसायनशास्त्राचे प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी याच्याशी निकटचे संबंध असल्याचे सीबीआयच्या चौकशीत समोर आले आहे. भारतीय न्याय संहिता (बीएनएस), भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा (पीसी ॲक्ट) आणि सार्वजनिक परीक्षा (अनुचित प्रकारांना प्रतिबंध) कायदा, २०२४ अंतर्गत अटक केली असून त्याच्यावर फसवणूक, गुन्हेगारी कट रचणे आणि परीक्षेतील गैरप्रकारांना खतपाणी घालणे यांसारखे गंभीर आरोप आहेत.

#### मोबाईलमध्ये सापडली नीट प्रश्नपत्रिका

सीबीआयच्या तपासात शिवराज मोटेगावकरच्या मोबाईलमध्ये कथितपणे नीट-यूजी २०२६ ची प्रश्नपत्रिका सापडल्याचा दावा करण्यात आला आहे. तपास यंत्रणांच्या मते, मोटेगावकर हा प्रश्नपत्रिका लीक आणि प्रसारित करणाऱ्या संघटित रॅकेटचा भाग असल्याचा संशय आहे. याप्रकरणात आतापर्यंत दिल्ली, जयपूर, गुरुग्राम, नाशिक, पुणे, लातूर आणि अहिल्यानगर येथून एकूण १० आरोपींना अटक करण्यात आली आहे. *(तभा वृत्तसेवा)*

#### पालक, विद्यार्थ्यांचीही चौकशी

**मोटेगावकरच्या अटकेसोबतच सीबीआयने मुंबई, ठाणे तसेच इतर काही शहरातील पालक आणि विद्यार्थ्यांना चौकशीसाठी बोलवल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. पुण्यातील कार्यालयात या विद्यार्थी तसेच पालकांची चौकशी झाली आहे. मात्र, याबाबतचा तपशील अधिक मिळू शकलेला नाही. पण, या विद्यार्थ्यांना प्रश्न पत्रिका आणि उत्तरे कोणी दिली किंवा कोठून मिळाली, किती पैसे घेतले गेले यासंदर्भात ही चौकशी झाल्याचा संशय आहे.**

---

## परिषदेच्या १७ जागांसाठी १८ जूनला मतदान

### सोलापूरच्या एका जागेचा समावेश

◆ **मुंबई १८ मे**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकरण मतदारसंघातील तब्बल १७ जागांसाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने निवडणूक जाहीर केली आहे. त्यामुळे राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा तापण्याची चिन्हे दिसू लागली असून निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार येत्या १८ जून रोजी मतदान होणार असून २२ जूनला मतमोजणी केली जाणार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्यामुळे गेल्या काही वर्षांपासून या जागा रिक्त होत्या. त्यामुळे या निवडणुकीकडे राज्यातील सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष लागले होते. विशेषतः महायुतीला या निवडणूकीच्या माध्यमातून बहुमत वाढवण्याची चांगली संधी मिळाली आहे. सदर निवडणूकीबाबत निवडणूक आयोगाकडून २५ मे रोजी अधिकृत अधिसूचना जारी करण्यात येणार असून, १ जून रोजी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम कालावधी राहणार आहे. २ जूनला अर्जांची छाननी, तर ४ जूनपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहेत. मतदान १८ जून रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत होणार आहे.

या निवडणुकीत सोलापूर, अहमदनगर, ठाणे, जळगाव, पुणे, नाशिक, नांदेड, नागपूर, अमरावती, सांगली-सातारा, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, उस्मानाबाद-लातूर-बीड, परभणी-हिंगोली, औरंगाबाद-जालना, यवतमाळ तसेच भंडारा-गोंदिया या महत्त्वाच्या मतदारसंघांचा समावेश



आहे.

राजकीय समीकरणांचा विचार केला असता सत्ताधारी महायुती सध्या मजबूत स्थितीत असल्याचे चित्र आहे. भाजप, शिंदे गटाची शिवसेना आणि अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मोठे संख्याबळ असल्याने अनेक जागांवर त्यांचे पारडे जड मानले जात आहे. दुसरीकडे काँग्रेस, उद्धव ठाकरे गटाची शिवसेना आणि शरद पवार गटाची राष्ट्रवादी काँग्रेस असलेल्या महाविकास आघाडीसमोर संख्याबळाचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. *(तभा वृत्तसेवा)*

#### निवृत्त झालेले व राजीनामा दिलेले सदस्य

**चंद्रशेखर बावनकुळे- नागपूर (विधानसभेत विजयी ), दुष्यंत सतीश चतुर्वेदी- यवतमाळ, परिणय फुके- भंडारा- गोंदिया, रामदास आंबटकर- वर्धा चंद्रपूर गडचिरोली, प्रवीण पोटे- अमरावती, प्रशांत परिचारक- सोलापूर, अरुणकाका जगताप- अहिल्यानगर, रवींद्र फाटक- ठाणे, चंदूभाई पटेल- जळगाव, मनोहरराव कदम- सांगली सातारा, अमरनाथ राजुरकर- नांदेड,अनिल भोसले- पुणे, , अनिकेत तटकरे- रायगड रत्नागिरी सिंधुदुर्ग, नरेंद्र दराडे- नाशिक, सुरेश धस- धाराशिव- लातूर- बीड, विप्लव बाजोरिया- परभणी- हिंगोली , अंबादास दानवे- उबाठा (छत्रपती संभाजीनगर-जालना)**

### महाराष्ट्रात पेट्रोलियम उत्पादने पुरेशा प्रमाणात उपलब्ध

**मुंबई** : पश्चिम आशियातील सध्याच्या भू-राजकीय तणावामुळे जागतिक पुरवठा साखळीवर झालेल्या परिणामाच्या पृष्ठभूीवर, महाराष्ट्र राज्य सरकार आणि तेल विपणन कंपन्यांनी (भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि., इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लि. आणि हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि.) संपूर्ण राज्यात एलपीजी, पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याची ग्वाही ग्राहकांना दिली आहे. महाराष्ट्राचे समन्वयक (तेल उद्योग) मिहीर गणेश जोशी यांनी याबाबतची माहिती दिली. पेट्रोलियम उत्पादनांच्या पुरवठा विषयक कार्यान्वयनावर बारकाईने लक्ष ठेवले जात असून, कोणत्याही समस्येशिवाय पुरवठा सुरळीत राखला जात असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

---

## दहावी-बारावीची प्रश्नपत्रिका तीन पानांची

### बोर्ड परीक्षेत दोन मोठे बदल; ताण कमी होणार

◆ **नागपूर, १८ मे**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी-बारावीच्या परीक्षा पद्धतीत दोन क्रांतिकारी बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रश्नपत्रिकांचा आकार १०-११ पानांवरून थेट ३-४ पानांवर आणणे आणि उत्तरपत्रिकांमधील गैरप्रकारांना फौजदारी गुन्ह्याच्या कक्षेत आणणे, या दोन सुधारणा लवकरच लागू होणार आहेत.

सध्या काही विषयांच्या प्रश्नपत्रिका तब्बल १० ते ११ पानांच्या असतात. एवढी मोठी प्रश्नपत्रिका वाचताना विद्यार्थ्यांवर मानसिक दडपण येते, वेळ वाया जातो आणि गोंधळ उडतो. शिवाय छपाईचा खर्चही गगनाला भिडला आहे. प्रश्नपत्रिकांच्या छपाईवर बोर्डाला दरवर्षी तब्बल ३० कोटी रुपये खर्च करावे लागतात. हा खर्च व विद्यार्थ्यांचा ताण कमी करण्यासाठी विशेष समिती नेमली होती. समितीच्या शिफारशीनुसार आता नवीन प्रश्नपत्रिका अवघ्या ३ ते ४ पानांची असेल. यामुळे छपाई खर्चात जवळपास ६० टक्के बचत होईल म्हणजेच दरवर्षी सुमारे १८ कोटी रुपये वाचतील. कायद्यातील दुरुस्तीचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठवला असून विधिमंडळाच्या आगामी अधिवेशनात त्यावर मंजुरी घेतली जाणार आहे. बोर्डाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, फेब्रुवारी-मार्च २०२७ च्या परीक्षेपासून नवीन स्वरूपाची प्रश्नपत्रिका लागू होण्याची शक्यता आहे. *(तभा वृत्तसेवा)*



#### प्रश्नपत्रिकेचे नवे स्वरूप कसे असेल?

१. **एकाच पानावर प्रश्न** : मुख्य प्रश्न आणि त्याचे उपप्रश्न एकाच पानावर एकत्र दिले जातील. त्यामुळे विद्यार्थ्यांची लिंक तुटणार नाही.
२. **स्पष्ट गुणविभागणी** : कोणत्या प्रश्नाला किती गुण याची विभागणी अधिक ठळक व स्पष्ट असेल.
३. **सुटसुटीत मांडणी** : बहुपर्यायी प्रश्न, जोड्या लावा, एका वाक्यात उत्तरे यांचा क्रमांक व रचना गोंधळ होणार नाही अशा पद्धतीने मांडली जाईल.
४. **वाचनास सोपे** : फॉन्ट, मार्जिन व मोकळी जागा यांचे नवे निकष ठरवून वाचनाचा ताण कमी केला जाईल.

#### नव्या दुरुस्तीत काय?

- **दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा** : उत्तरपत्रिकेशी छेडछाड करणे हा दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा ठरणार आहे.
- **कठोर शिक्षा** : दोषी आढळल्यास ३ ते ५ वर्षे तुरुंगवास व दंडाची तरतूद केली जाणार आहे.
- **सर्वांवर कारवाई** : विद्यार्थी, पालक, शिक्षक, मॉडरेटर, कस्टोडियन यापैकी कोणीही सहभागी आढळल्यास त्याच्यावर गुन्हा दाखल होईल.

#### उत्तरपत्रिकेतील घोटाळा; आता थेट जेल



**दुसरा व सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे उत्तरपत्रिकांशी छेडछाड करणाऱ्यांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल होणार आहेत. सध्या ‘महाराष्ट्र गैरप्रकार प्रतिबंधक कायदा, १९८२’ नुसार केवळ पेपरफुटी, प्रश्नपत्रिकेतील छेडछाड व परीक्षा केंद्रांवरील कॉपी यावरच कारवाई होते. परंतु गेल्या काही वर्षांत परीक्षा संपल्यानंतर उत्तरपत्रिका बदलणे, बेकायदेशीरपणे गुण वाढवणे, पुनर्मूल्यांकनात घोटाळे करणे अशा नव्या पद्धती समोर आल्या आहेत.**

---



## पहिल्या बुलेट ट्रेनचे छायाचित्र जारी

**नवी दिल्ली** : मुंबई अहमदाबाद दरम्यान धावणाऱ्या देशातील पहिल्या अति वेगवान बुलेट ट्रेनचे छायाचित्र रेल्वे मंत्रालयाने सोमवारी जारी केले.

रेल्वे मंत्रालयाच्या ४ क्रमांकाच्या प्रवेशद्वारावर नव्या बुलेट ट्रेनचे छायाचित्र पहिल्यांदाच प्रदर्शित करण्यात आले. मुंबई अहमदाबाद या ५०८ किमी लांबीच्या मार्गावर ३२० किमी प्रतितास या वेगाने ही बुलेट ट्रेन धावणार आहे. दोन तासात ही गाडी हे अंतर पार करणार आहे. सध्या एवढ्या अंतरासाठी अन्य रेल्वे गाड्यांना ६ ते ८ तासाचा अवधी लागतो.

जपानच्या तंत्रज्ञानाने आणि आर्थिक मदतीने ही बुलेट ट्रेन धावणार आहे. या मार्गावर १२ रेल्वेस्थानक राहणार आहेत. *(तभा वृत्तसेवा)*

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# शब्द वाटू धन, जनलोकां

शब्द हे शस्त्रासारखे असतात. जर एखाद्या बलवानाने हाती असलेल्या शब्दांचे शस्त्र उगारले तर त्याचा घाव अधिक खोलवर रुततो. ज्यांच्या हाती ते शस्त्र द्यावयाचे तो केवळ बलवान असून चालत नाही, तर शस्त्र चालविण्याची विवेकी विचारशक्ती त्याच्याकडे असावी लागते. शब्दांचे शस्त्र कुठे चालवायचे, केव्हा म्यान करायचे याचे भान राखावे लागतेच; पण काही वेळा गरज नसताना परजलेले शस्त्र अकारण कुठे तरी घाव घालून जाते. मुळात शब्द स्वभावतः संयमीच असतात. कोणत्याही शस्त्रात ठासून भरले तरी ते स्वतःहून चाल करून जात नाहीत. जीभ सैल असेल तरच ते जिभेवरून घसरतात. अशा रीतीने घसरल्यामुळे बाहेर पडलेल्या शब्दांचीच पंचाईत होते. कारण बाहेर पडलेला शब्द पुन्हा माघारी येत नसतो. मग सुरू होते शब्दांना सावरण्याची कसरत. नवनवे वादन निर्माण होऊ लागतात. त्यामुळे शब्दांचा शस्त्र म्हणून वापर करावयाचा की शब्द हे विचारांची रत्ने आहेत असे समजून त्यांचा सांभाळ करावयाचा हे ज्याचे त्याने ठरवायचे असते. कधी कधी शब्दांची जिभेवरून बाहेर पडण्याची प्रक्रिया ठरल्याप्रमाणे पार पडली, तरी जीभ जाणीवपूर्वक सैल सोडली जाते आणि शब्दांच्या खेळांची मजा अनुभवल्यानंतर त्यांनाच दोष देत सारवासारव सुरू होते. 'माझ्या बोलण्याचा विपर्यास केला', 'मला असे म्हणावयाचे नव्हते', 'मी तर असे बोललोच नव्हतो'' अशी वाक्ये अलिकडे अधूनमधून कानावर येतात; तो या शब्दांच्या खेळाचाच पुढचा टप्पा असतो. अशा वाक्यांतून शब्दांची विश्वासार्हता तर संपतेच, पण ज्याच्या जिभेवरून ते बाहेर पडलेले असतात, त्यांच्यावरील विश्वासही पणाला लागलेला असतो. विशेषतः राजकारणात शब्दांचा हा 'बोललो होतो-नव्हतो' खेळ कमालीचा लोकप्रिय असल्याचे अनेकवार दिसून आले आहे. आधी बेफिकीरपणे शब्द सोडून द्यायचे आणि नंतर त्यांची जबाबदारी झटकून टाकावी, असे राजकारणात अनेकदा घडलेले आहे. काही दशकांपूर्वी, जेव्हा शब्द केवळ कागदावरच टिपून घेतले जायचे, तेव्हा ते मागे घेणे किंवा त्यांची जबाबदारी झटकून टाकणे फारसे कठीण काम नव्हते. आपण असे बोललोच नव्हतो, असे बिनदिक्कतपणे सांगणे सोपे होते. माझ्या बोलण्याचा विपर्यास केला, असे सांगून बचाव करणारे राजकारणी नेते हे तेव्हा खरेखुरे धुरंधर मानले जात असत. पुढे माध्यमविश्वात प्रगती झाली, तंत्रज्ञानाचा भक्कम आधार माध्यमांना मिळाला आणि जिभेवरून बाहेर पडलेले किंवा शब्दशः 'घसरलेले' शब्द साठविण्याची व जतन करून ठेवण्याची सोय झाली. आजही आपल्या जिभेवरून घरंगळत बाहेर पडलेल्या किंवा घसरलेल्या शब्दांची जबाबदारी झटकण्याचे केविलवाणे प्रयत्न होताना दिसतातच. याला सारवासारव करणे असे म्हटले जाते. असे केल्याने शब्दांची विश्वासार्हता डळमळीत झाली, तरी ते उच्चारणाऱ्या जिभांना संरक्षण मिळते असे काही क्षेत्रांत विश्वासाने मानले जाते.

गेल्या अनेक वर्षांत अशारीतीने आपल्या तोंडून बाहेर पडलेल्या शब्दांची हत्यारे आपल्यावर उलटल्याचे दिसून आल्यानंतर बचावाचे साधन म्हणून जबाबदारी झटकण्याचे जे प्रकार घडले, त्यामध्ये पुढे कोणतेच क्षेत्र मागे राहिलेले नाही असे दिसते. राजकारणात नेहमी वापरला जाणारा हा बचावाचा उपाय अन्य अनेक क्षेत्रांत वापरला जाऊ लागला आणि जीभ घसरली तरी फारसा फरक पडत नाही, असेही अनेकांस वाटू लागले. आपल्या शब्दांचा वाद निर्माण झाला असे दिसू लागले तरी तोवर ते बोलणाऱ्या व्यक्तीचे मूळ उद्दिष्ट साध्य झालेले असल्याने, विपर्यास झाल्याचे खापर बरेचदा माध्यमांवर फोडले जाते. अध्यात्म क्षेत्राशी संबंधित असलेल्या लोकांमध्ये प्रसिद्ध असलेल्या धीरेंद्र शास्त्री नावाच्या एका व्यक्तीने छत्रपती शिवाजी महाराजांविषयी अलिकडेच केलेल्या एका वक्तव्यावरून वाद भडकल्यानंतर सारवासारवीचा हाच उपाय वापरला होता, हे अनेकांस आठवत असेल. माझ्या वक्तव्याचा विपर्यास करण्यात आला असून मोडतोड केलेले वक्तव्य प्रसृत करण्यात आले, हाच बचाव त्यांनीही केला होता. आपल्या वक्तव्याची केवळ एकच बाजू दाखवून विपर्यास केला गेला, असा बचावही काहींनी केल्याची उदाहरणे आहेत. आपल्या बोलण्याचा नेहमीच विपर्यास केला जातो असे सांगत लोकांचा विश्वास जपण्याचे व सहानुभूती मिळविण्याचे प्रयत्न काही करतात. आता माध्यमांसमोर व्यक्त केलेल्या विचारांची जबाबदारी टाळली तर पुराव्यानिशी ती माथी मारलीच जाते हे स्पष्ट होऊ लागल्यामुळे राजकीय क्षेत्रातील कोणासही अशी वक्तव्ये करताना अनेकदा विचार करावा लागत असल्याने, अशी काही वादग्रस्त वक्तव्ये कुणी केलीच, तर जाणीवपूर्वक वाद निर्माण करण्याचा त्यामागे हेतू असावा, असा समाजाचा समज पक्का होत असतो, हे लक्षात घेऊन वक्तव्ये करताना भान ठेवावे लागतेच, पण अशा वक्तव्यांची खरोखरीच मोडतोड किंवा विपर्यास झाला असेल, तर तसे करणाऱ्यांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उमटत असते. असा मोठा नाजूक आणि संवेदनशील काळ सध्या आलेला असल्याने कोणतेही वक्तव्य केल्यानंतर त्यांचे बरे-वाईट परिणाम आपल्याला भोगावे लागणारच, याची जाणीव ठेवणे आवश्यक असते. कारण अशा वक्तव्यांतून निर्माण होणाऱ्या विश्वासार्हतेवरील प्रश्नचिन्हे केवळ त्या व्यक्तीभोवती केंद्रित न राहता त्याच्याशी संबंधित असलेल्या व्यवस्थेवरही उमटत असतात. राजकीय नेत्यांच्या अशा सवयीमुळे संपूर्ण राजकारणाच्या विश्वासार्हतेवर उमटलेली प्रश्नचिन्हे आपण अनेकदा पाहिली आहेत. चित्रपटसृष्टीतील वक्तव्यांकडे तर कुजबुज किंवा गॉसिप म्हणूनच पाहिले जात असल्याने त्यांची विश्वासार्हता शंकास्पदच असते, हे समाजानेही स्वीकारलेले आहे. म्हणूनच ज्या व्यवस्थांकडे विश्वासाने पाहिले जाते अशा व्यवस्थांमध्ये अशा वक्तव्यांना जागा असू नये, अशी समाजाची अपेक्षा असते. न्यायव्यवस्थेविषयी ही अपेक्षा काहीशी अधिक असते. कारण ही व्यवस्था संपूर्णपणे समाजाच्या विश्वासावर उभी राहिलेली असते. इथे उमटणारा प्रत्येक शब्द हा अंतिम असतो, अशी समाजाची श्रद्धा असते आणि अशा प्रत्येक शब्दाला न्याय मानून तो स्वीकारण्याची समाजाची मानसिकताही असते. न्यायव्यवस्थेतील शब्द हे केवळ शस्त्रे नव्हेत तर रत्ने असतात. शब्द हा देव असतो, अशी आपल्या संतांची शिकवण आहे. शब्द हेच जिवांचे जीवन असते, ते वाटल्यास वाढतात, असे संतपरंपरा मानते. याच संतपरंपरेचे पाईक असलेल्या समाजात शब्दांची ही महती मान्य असल्यामुळे त्यांची पूजा केली जाते. म्हणून ज्या व्यवस्थांमध्ये शब्द हे प्रमाण असते, तेथे विपर्यासास वाव असता नये.

भारताचे सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी एका प्रकरणावरील सुनावणीदरम्यान केलेल्या वक्तव्यांमुळे उफाळलेल्या वादातून पुन्हा एकदा शब्दांच्या पावित्र्याची कसोटी लागणार आहे. विधि क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बनावट पदव्या मिळविल्या जात असल्याच्या मुद्द्यावर चिंता व्यक्त करताना सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी वापरलेल्या काही कथित शब्दांवरून गदारोळ माजला आणि त्यावर स्पष्टीकरण करण्याची वेळ सरन्यायाधीशांवर आली. आजचा तरुण हा विकसित भारताचा आधारस्तंभ आहे; त्याचा मला अभिमान आहे, असा खुलासा करताना, आपल्या वक्तव्याचा विपर्यास झाल्याची खंत त्यांना व्यक्त करावी लागली. न्यायसंस्थेतील सर्वोच्च पदावरील व्यक्तीच्या तोंडून उमटलेले कथित शब्द वादग्रस्त ठरून त्याच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उमटल्याने पुन्हा एकदा शब्दांचा वापर करण्याच्या विवेकाचा मुद्दा ऐरणीवर आलाच आहे. न्यायालयीन प्रक्रियेत आणि लोकशाहीत न्यायाधीशांच्या वक्तव्यांना अनन्यसाधारण महत्त्व असते. न्यायाधीशांनी युक्तिवादादरम्यान नोंदविलेली तोंडी निरीक्षणे अनेकदा चर्चेचा मुद्दा ठरतात आणि त्याचे सामाजिक पडसादही उमटतात. कारण अशा वक्तव्यांचे परिणाम केवळ तात्कालिक न राहता, व्यवस्थेच्या तटस्थ प्रतिमेवरही होत असतात. वस्तुतः ही वक्तव्ये म्हणजे निवाडा नसतो; तथापि त्याची नोंद घेतली जात असते. काही वक्तव्ये केवळ वैयक्तिक मतप्रदर्शन नव्हे, तर संविधानाच्या चौकटीच्या मर्यादा दाखविणारी असतात. म्हणूनच या व्यवस्थेतील शब्द हे शस्त्रे नव्हे तर रत्ने असतात. समाजाच्या मनात असलेली ही भावना संवेदनशीलतेने जपली गेली पाहिजे इतकेच!

## आंतरराष्ट्रीय

# मजूर पक्षाच्या अस्तित्वाचा लढा

**प्रा. जयसिंग यादव**

ब्रिटनमध्ये जिमी कार्बिन यांच्या यांच्या नेतृत्वाखाली मजूर पक्षाने पुन्हा डावीकडे झुकण्याचा प्रयत्न केला. कार्बिन यांनी सामाजिक न्याय, सरकारी गुंतवणूक आणि युद्धविरोधी भूमिका यावर भर दिला; पण त्याच वेळी त्यांच्यावर अतिडावे, अव्यवहार्य आणि राष्ट्रीय सुरक्षेबाबत कमकुवत असल्याचे आरोप झाले. ब्रिटिश जनतेने त्यांना पूर्णपणे स्वीकारले नाही. त्या पराभवानंतर कीर स्टार्मर यांना पुढे आणण्यात आले. त्यांनी पक्षाला 'विश्वासार्ह' आणि 'सत्तेसाठी योग्य' बनवण्याचे आश्वासन दिले. प्रत्यक्षात त्यांनी कार्बिन युगातील अनेक नेत्यांना बाजूला केले. पक्षातील डाव्या गटाची ताकद कमी केली आणि मजूर पक्षाला पुन्हा मध्यवर्ती राजकारणाकडे आणले; पण इथेच स्टार्मर यांची खरी अडचण सुरू झाली. निवडणूक जिंकली खरी; पण ते पक्षाची स्पष्ट वैचारिक ओळख निर्माण करू शकले नाहीत. ते ना पूर्णपणे ब्लेअरवादी मध्यममार्गी ठरले, ना पारंपरिक समाजवादी. परिणामी, मजूर पक्षात एक प्रकारची वैचारिक पोकळी निर्माण झाली. सामान्य मतदारांना हा पक्ष नेमका कोणासाठी आहे, हेच समजेनासे झाले. स्थलांतराच्या प्रश्नावर पक्षाची भूमिका सतत बदलत राहिली. आर्थिक धोरणांमध्ये काटकसरीची भाषा आणि कल्याणकारी राज्याची आश्वासने यांचा विचित्र मेळ दिसला. पर्यावरण, ओळख राजकारण आणि अल्पसंख्यकांवरील प्रश्नांवर भर देताना पारंपरिक कामगार वर्गाच्या आर्थिक असुरक्षिततेकडे पुरेसे लक्ष दिले गेले नाही, अशी भावना वाढली. या पृष्ठभूमीवर ब्रिटनच्या कामगार वर्गातील अनेक मतदारांना मजूर पक्ष आता आपला राहिला नाही, असे अनेकांना वाटू लागले.

स्थलांतर, राष्ट्रीय ओळख आणि सांस्कृतिक बदलांविषयी अस्वस्थ असलेला पारंपरिक मतदार अलिकडे 'रिफॉर्म यूके'कडे आकर्षित होऊ लागला. हे केवळ निवडणूक गणिताचे बदल नाहीत, तर ब्रिटनच्या सामाजिक मानसिकतेतील मोठा बदल आहे. पूर्वी आर्थिक विषमता हा डाव्या राजकारणाचा केंद्रबिंदू होता. आता सांस्कृतिक असुरक्षितता आणि राष्ट्रीय ओळख यांसारखे प्रश्न अधिक प्रभावी ठरत आहेत. स्टार्मर आणि मजूर पक्ष या बदलाचे अचूक वाचन करण्यात अपयशी ठरताना दिसतात. स्टार्मर यांच्या नेतृत्वशैलीनेही ही समस्या अधिक गंभीर केली. ते मुळात वकील आणि अभियोजक आहेत. त्यामुळे त्यांची राजकीय शैलीही अत्यंत नियंत्रित, सावध आणि व्यवस्थापकीय स्वरूपाची आहे; पण ब्रिटिश राजकारणात केवळ प्रशासकीय क्षमता पुरेशी नसते. लोकांना भावनिक संवाद साधणारा, संकटात स्पष्ट दिशा देणारा आणि संघर्षाला सामोरे जाणारा नेता हवा असतो. बोरिस जॉन्सन यांच्याभोवती अनेक वाद होते; पण त्यांच्याकडे जनतेशी थेट जोड निर्माण करण्याची क्षमता होती. फरागे यांच्याकडेही ती आहे. स्टार्मर मात्र अजूनही प्रशासकीय अधिकाऱ्यासारखे वाटतात. त्यामुळे आर्थिक संकट,



स्थलांतर प्रश्न किंवा पक्षांतर्गत बंडखोरी यासारख्या प्रसंगी ते जनतेमध्ये आत्मविश्वास निर्माण करू शकत नाहीत.

स्टार्मर यांच्याभोवती निर्माण झालेले वादही या प्रतिमेला अधिक हानी पोहोचवत आहेत. पीटर मंडेल्सन यांच्यासारख्या जुन्या ब्लेअरवादी नेत्यांना पुन्हा महत्त्व देणे, निकटवर्तीय सल्लागारांचा वाढता प्रभाव, पक्षातील मतभिन्नतेबाबत असहिष्णुता अशा अनेक बाबींमुळे स्टार्मर यांच्यावर 'नियंत्रणप्रिय' नेतृत्वाचा आरोप होतो आहे. भारतीय संदर्भात पाहायला मिळणारा घराणेशाहीचा आरोप इथे नसला, तरी आपल्या गटातील लोकांनाच पुढे आणणे ही भावना पक्षात नाराजी वाढवत आहे. परिणामी, मजूर पक्षात अस्वस्थता वाढली आहे. हे संकट केवळ स्टार्मर यांच्यापुरते मर्यादित नाही. संपूर्ण युरोपमध्ये डाव्या पक्षांसमोर असेच प्रश्न उभे आहेत. फ्रान्समध्ये समाजवादी पक्ष कोसळला. जर्मनीतील सोशल डेमोक्रॅट्स संघर्ष करत आहेत. इटलीमध्ये उजव्या राष्ट्रवादी शक्ती मजबूत झाल्या. कारण पारंपरिक डावे पक्ष जागतिकीकरणानंतरच्या नव्या वास्तवाला ठोस उत्तर देऊ शकले नाहीत. आर्थिक समानतेची भाषा अजूनही आहे; पण राष्ट्रीय ओळख, सांस्कृतिक बदल आणि स्थलांतर यांसारख्या प्रश्नांवर बचावात्मक दिसतात. परिणामी कामगारवर्गातील मोठा भाग उजव्या राष्ट्रवादी राजकारणाकडे झुकतो आहे. स्टार्मर यांचे आजचे संकट म्हणजे या व्यापक बदलाचे ब्रिटिश रूप आहे. त्यांनी मजूर पक्षाला निवडणूक जिंकून दिली; पण त्याला आत्मा देऊ शकले नाहीत. पक्षाला सत्तेत आणणे आणि दीर्घकालीन वैचारिक दिशा देणे या दोन वेगळ्या गोष्टी असतात. पहिली गोष्ट स्टार्मर यांनी साध्य केली; दुसऱ्यात मात्र ते अपयशी ठरताना दिसतात. म्हणूनच आज ब्रिटनमध्ये विचारला जाणारा खरा प्रश्न 'स्टार्मर राहतील की जातील?' हा नाही.

प्रश्न असा आहे की आधुनिक डावे राजकारण स्वतःची नवी ओळख निर्माण करू शकेल का? कामगारवर्ग, तरुण उदारमतवादी आणि सांस्कृतिकदृष्ट्या अस्वस्थ मध्यमवर्ग या परस्परविरोधी गटांना एकत्र ठेवणारी नवी राजकीय चौकट तयार होऊ शकेल का? स्टार्मर यांचे भवितव्य या प्रश्नांच्या उत्तरांशी जोडले गेले आहे. केवळ पद टिकवण्याची धडपड केली आणि व्यापक वैचारिक संकटाकडे दुर्लक्ष केले, तर त्यांचे नेतृत्व फार काळ टिकणार नाही; पण मजूर पक्षाला नव्याने परिभाषित करण्याचा प्रयत्न केला, तर कदाचित ते आजच्या संकटातून बाहेर पडू शकतील; मात्र त्यासाठी त्यांना प्रशासकीय नेत्यापासून राजकीय नेत्यामध्ये रूपांतर करावे लागेल आणि नेमके तेच त्यांना आजपर्यंत जमलेले नाही. आजची परिस्थिती अशी आहे की स्टार्मर यांचे राजकीय भवितव्य केवळ विरोधकांच्या हल्ल्यांवर अवलंबून नाही, तर ते त्यांच्या पक्षातील सहकाऱ्यांच्या संयमावर अवलंबून आहे.

हिवाळ्यातील इंधन भत्त्यात केलेली कपात हा स्टार्मर यांच्यासाठी राजकीय आत्मघात ठरताना दिसत आहे. यामुळे लाखो ज्येष्ठ नागरिक संकटात सापडले असून पक्षाच्या अनेक खासदारांनी उघडपणे या विरोधात मतदान केले किंवा गैरहजर राहिले. ही स्टार्मर यांच्या अधिकाराला दिलेली पहिली मोठी चपराक होती. स्टार्मर यांच्यावर सध्या सर्वांत जास्त टीका होत आहे ती म्हणजे त्यांनी घेतलेल्या महागड्या भेटवस्तू आणि देणग्यांवरून. ज्या नेत्याला 'मिस्टर क्लीन' म्हणून ओळखले जायचे, त्यांच्यावर आता 'क्रोनिझम' (नातेवाईक आणि मित्रत्वाचे हितसंबंध जोपासणे) चे आरोप होत आहेत. हे प्रकरण बाहेर आल्यावर स्टार्मर हे श्रीमंतांच्या तालावर नाचणारे बाहुले आहेत का? असा प्रश्न विचारला जात आहे. सुरुवातीला या देणग्यांची माहिती दडवून ठेवल्याने स्टार्मर यांची नैतिक बाजू कमकुवत झाली आहे. ब्रिटनची जनता आर्थिक टंचाईचा सामना करत असताना पंतप्रधान मात्र आलिशान जीवनशैली जगत असल्याचा नकारात्मक संदेश लोकांमध्ये गेला आहे. महत्त्वाच्या पदांवर स्टार्मर यांनी केलेल्या नियुक्त्यांवरून प्रशासकीय वर्तुळात मोठी नाराजी आहे. कॅबिनेटमधील प्रभावशाली अधिकारी सु ग्रे यांची नियुक्ती आणि त्यांच्या पगारावरून झालेला वाद यामुळे सरकारची नाचक्की झाली. प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मते स्टार्मर हे अनुभवी लोकांपेक्षा आपल्या मर्जीतील लोकांना पदे देऊन 'राजकीय इको-सिस्टिम' तयार करत आहेत. सरकार आणि नोकरशाहीमध्ये संघर्षाची ठिणगी पडते, तेव्हा प्रशासनाची चाके मंदावतात. स्टार्मर यांना सध्या याच गतिरोधकाचा सामना करावा लागत आहे.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**नितीन शिरसाट**

# 'एक झाड आईच्या नावे' उपक्रमाचा बोजवारा

दरवर्षी वृक्षारोपण, पर्यावरण जनजागृती, संवर्धन आणि हरित क्रांतीला चालना देण्यासाठी राज्यभरातील प्रशासन, विविध संघटना, शाळा व ग्रामपंचायतींच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण कार्यक्रम राबविण्यात येतात. पावसाळ्याच्या प्रारंभी विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थ, महिला बचतगट, निसर्गप्रेमी, युवक मंडळांच्या सहभागातून गावोगावी वृक्षलागवड केली जाते. यामुळे पर्यावरण संरक्षणाबरोबरच नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासही मदत होते. शाळांमध्ये विद्यार्थ्यांना झाडांचे महत्त्व समजावून सांगण्यासाठी विशेष उपक्रम घेतले जातात. एक विद्यार्थी एक झाड, माझे झाड माझी जबाबदारी, एक पेड माँ के नाम यांसारख्या मोहिमांद्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष झाडे लावण्यास प्रोत्साहन दिले जाते. अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना लावलेल्या झाडांची नियमित निगा राखण्याची जबाबदारीही दिली जाते. त्यामुळे लहान वयातच पर्यावरणाबाबत संवेदनशीलता निर्माण होत आहे. ग्रामपंचायतींकडून गावातील सार्वजनिक जागा, स्मशानभूमी परिसर, रस्त्यांच्या बाजूची जागा, शाळा परिसर, शेतरस्त्यांवर वृक्षारोपण केले जाते. सकाळी भ्रमंतीला जाणाऱ्या महिला व निसर्गप्रेमी नागरिकांकडून विविध बियांचे जंगल परिसरात रोपण केले जाते. काही गावांमध्ये ग्रामसभेत विशेष ठराव करून वृक्षसंवर्धनाची जबाबदारी निश्चित करण्यात येते.

पर्यावरण तज्ज्ञांच्या मते, केवळ झाडे लावणे पुरेसे नाही. त्यांचे संगोपन महत्त्वाचे आहे. त्यामुळे अनेक शाळा व ग्रामपंचायती आता वृक्षसंवर्धन या संकल्पनेवर भर देत आहेत. झाडांना नियमित पाणी देणे, जनावरांपासून संरक्षण करणे, मृत झालेल्या रोपांच्या जागी नवीन रोपे लावणे याकडे लक्ष दिले जात आहे. ग्रामीण भागात पर्यावरण संरक्षणाची प्रभावी चळवळ ठरत आहेत. राज्यात विविध राज्य मार्गांच्या रुंदीकरणाचे काम वेगाने सुरू असताना अनेक ठिकाणी रस्त्यालगतची जुनी व शेकडो वर्षांची वृक्षसंपदा धोक्यात आली आहे. स्थानिक नागरिक व पर्यावरणप्रेमींनी वृक्षतोडीबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. रस्ते सुरक्षितता व वाहतूक सुलभतेसाठी रुंदीकरण गरजेचे असले तरी पर्यायी वृक्षारोपण, वृक्षांचे पुनर्स्थापन, कमी प्रमाणात वृक्षतोड यावर भर देण्याची मागणी होत आहे. तोडण्यात येणाऱ्या प्रत्येक वृक्षाच्या बदल्यात अनेक नवीन झाडे लावण्याचा दावा प्रशासनाने केला आहे. धाराशिव जिल्ह्यात 'एक पेड माँ के नाम' या राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत राबविण्यात आलेल्या या मोहिमेची गिनीज बुकमध्ये नोंद झाल्यानंतर जिल्ह्याचे नाव राज्यभर चर्चेत आले. प्रशासन, लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था, विद्यार्थी आणि नागरिकांच्या सहभागातून हा विक्रम घडविण्यात आला. मात्र विक्रमाची नोंद झाल्यानंतर आता या झाडांच्या संवर्धनाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याची टीका पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांकडून होत आहे. आईच्या नावाने एक झाड हा भावनिक संदेश देत हजारो नागरिकांना या उपक्रमाशी जोडण्यात आले. शासनाच्या विविध विभागांनी लक्ष्य निश्चित करून मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड केली. अनेक ठिकाणी शासकीय कार्यालये, शाळा, मोकळी मैदाने, रस्त्यांच्या कडेला आणि गाव परिसरात झाडे लावण्यात आली. वृक्षारोपणावेळी मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धीही करण्यात आली. मात्र प्रत्यक्ष परिस्थिती पाहता अनेक ठिकाणी लावलेली झाडे कोमेजल्याचे चित्र समोर येत आहे. उन्हाळ्याच्या तीव्र झळांमध्ये झाडांना पाणी मिळत नसल्याने अनेक रोपे सुकण्याच्या मार्गावर आहेत. काही ठिकाणी झाडांभोवती संरक्षक जाळी नाही, तर काही ठिकाणी जनावरांमुळे रोपांचे नुकसान झाले आहे. राज्यात २०४७ पर्यंत ३०० कोटी वृक्ष लागवडीचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट साध्य करण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाने हरित महाराष्ट्र आयोग स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. हा आयोग पर्यावरण संवर्धन, जलसंधारण आणि हवामान बदलाच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी व्यापक लोकचळवळ म्हणून काम करेल.

राज्यातील वनाच्छादन वाढवण्यासाठी, वृक्षारोपण मोहिमेचे नियोजन करण्यासाठी महसूल व वन विभागाने मान्यता दिली आहे. राष्ट्रीय वन धोरणानुसार, कोणत्याही राज्याचे किमान ३३ टक्के क्षेत्र वनाच्छादित असणे आवश्यक आहे. महाराष्ट्राचे सध्याचे वनाच्छादन २१.२५ टक्के असून ते ३३ टक्क्यांपर्यंत नेण्याचे मोठे उद्दिषष्ट आयोगाला दिले आहे. केवळ वृक्षारोपणच नाही तर लावलेली झाडे जगवणे आणि त्यांच्या संवर्धनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे ही या आयोगाची मुख्य जबाबदारी असेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील हा आयोग राज्याच्या पर्यावरण संवर्धनाला नवी दिशा देणार आहे.

९८८१७१७८२८

## इतस्तत:

# युद्धसंघर्ष आणि भारतीय अर्थव्यवस्था

**दत्तात्रेय आंबुलकर**

सुरुवातीला इराण-इस्रायल व त्यानंतर लगेच अमेरिकेसह सर्वच आखाती देशांना या भीषण युद्धाची झळ बसली. आता दोन महिने उलटून गेले तरी, या युद्धाची व्यापकता वाढतीच आहे. उभयपक्षी घेण्यात आलेल्या आक्रस्ताळ्या महत्त्वाकांक्षेपोटी या कालावधीत नागरी परिसर-शहरांपासून शस्त्रास्त्रसाठे-अण्वस्त्र केंद्रांना लक्ष्य करण्यात आले. त्याचे स्वाभाविक परिणाम मानवीहानीपासून विध्वंसापर्यंत झाले. यातून व्यापारी-व्यावसायिक व आयात-निर्यात क्षेत्रदेखील जागतिक पातळीवर प्रभावित झाले. युद्धाशी संबंधितच नव्हे, तर त्याच्याशी दूरान्वयानेसुद्धा संबंध नसलेल्या देशांच्या आर्थिक व्यापार-व्यवहारांवर यामुळे स्वाभाविकपणे विपरीत परिणाम झाले. या मोठ्या विपरीत आर्थिक उलाढालींना भारत आणि भारतीय अर्थव्यवस्था अपवाद ठरली, ही बाब आज जगातील मुत्सद्यांपासून अर्थतज्ज्ञांपर्यंत मान्य करण्यात येत असून, त्याची कारणमीमांसा करतानाच, या पृष्ठभूमीचा धांडोळा घेणे म्हणूनच महत्त्वाचे ठरते.

दोन महिन्यांहून अधिक काळ सुरू असलेल्या या युद्धानंतर सुमारे १५ दिवसांच्या सशर्त युद्धबंदीनंतरच्या काळात, या युद्धाचे भारत आणि भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेले अथवा होऊ घातलेले परिणाम, हा विविध संदर्भात चर्चिला गेलेला विषय ठरला. युद्धग्रस्त आखाती देशांतील तेलसाठे व अण्वस्त्र केंद्रांच्या पृष्ठभूमीवर आर्थिकसंदर्भात सांगायचे म्हणजे, पाकिस्तानसारख्या शेजारी व कर्जबाजारी देशांसह आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेकार्थांनी आर्थिक अस्थिरतेवरील भारताची भूमिका व कारवाई उजवी ठरली. त्यातही महत्त्वाचे म्हणजे, भारत सरकारने तातडीचे व धोरणात्मक निर्णय घेत, तेलसाठे व त्याचा संग्रह करण्यावर सातत्याने भर देतानाच, चलनवाढीवर नियंत्रण ठेवण्याचे महत्त्वपूर्ण व उल्लेखनीय काम केलेले आहे.

भारताचे मुख्य आर्थिक सल्लागार अनंत नागेश्वरन् यांच्या मते, प. आशियातील युद्ध, त्यानंतरची स्थिती व सध्याची परिस्थिती या साऱ्याचा एकत्रित परिणाम प्रचलित आर्थिक वर्षात होणार असून, पूर्वी अनुमानित वार्षिक ६.६ टक्के विकासदराचे त्यानुसार फेरअवलोकन करणे अपरिहार्य ठरणार आहे. त्यांच्या मते, सध्याची जागतिक स्तरावरील आर्थिक अस्थिरता पाहता, सध्याच याविषयी टिप्पणी करणे घाईचे व धाडसाचे ठरेल. दरम्यान, गोल्डमन अॅण्ड मूडीजच्या नव्या आर्थिक अभ्यासानुसार, या युद्धाच्या पृष्ठभूमीवर भारतात नवा आर्थिक विकासदर ५.९६ टक्के ठरण्याचा अंदाज वर्तविला आहे. हे अंदाज भारताच्या अर्थव्यवस्थेवर युद्धामुळे होणारे संभाव्य आर्थिक परिणाम दर्शवितात.

तुलनात्मकदृष्ट्या गेल्या वर्षी अनंत नागेश्वरन् यांच्या आर्थिक अंदाजानुसार, डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केलेल्या ५० टक्के अतिरिक्त अधिभारामुळे भारताच्या गेल्यावर्षीच्या आर्थिक विकासदरात ०.०५ ते ०.०६ टक्के घसरण होईल, असे स्पष्ट केले होते. गोल्डमन अॅण्ड मूडीजने गेल्या वर्षीच्या त्यांच्या अभ्यासानुसार, भारताच्या आर्थिक विकासदरात सुमारे एक टक्क्याची घट नमूद केली होती. दोन्ही परिस्थितींमध्ये भारताच्या आर्थिक विकासदरावर विपरीत परिणाम व्यक्त केला होता.

आर्थिक जाणकारांच्या मते, इराण-इस्रायल युद्धाचे भारतावर चार प्रकारे परिणाम होऊ शकतील. यामध्ये भारताला होणाऱ्या तेल-वायूच्या पुरवठ्यामध्ये मोठ्या प्रमाणावर विलंब वा व्यत्यय येणे, खत-निर्यातीला होणाऱ्या विलंबित आयातीमुळे भारतीय शेती आणि शेतकऱ्यांवर परिणाम होणे, एकूणच आयात खर्चामध्ये अस्थिरता, विलंब व वाढ होणे व वाहतूक खर्चात प्रचंड वाढ होणे यांचा प्रामुख्याने उल्लेख करण्यात येतो. या साऱ्यांचा एकत्रित व अपरिहार्य परिणाम म्हणून एकूणच आर्थिक व्यवहार विलंबाने होऊ शकतात व त्याचा अपरिहार्य फटका भारताच्या अर्थव्यवस्थेला बसणार आहे. रुपयाचे अवमूल्यन व भारतीय शेअर बाजारात अस्थिरतेसह घसरण इ. सुद्धा होऊ शकते.

या प्रमुख आव्हानात्मक परिस्थितीतसुद्धा अनंत नागेश्वरन् यांच्यानुसार, भारताची अर्थव्यवस्था ही आजही सक्षम समजली जाते. त्यामुळे भारत आणि भारताच्या अर्थव्यवस्थेला युद्ध व त्यानंतर निर्माण झालेली अथवा निर्माण होऊ शकणारी आव्हाने कठीण असली, तरी अशक्य ठरणारी नाहीत. यासंदर्भातील लक्षणीय बाब म्हणजे, युद्धपूर्व काळात व ट्रम्पच्या आर्थिक मनमानीला तोंड द्यावे लागले असतानासुद्धा भारताची अर्थव्यवस्था भक्कम होती. तशातच भारताला अमेरिकेशिवाय युरोपीय देशांचे पाठबळ मिळाल्याने देशांतर्गत मुद्रास्फीती सुमारे १.३ टक्क्यांवर येण्याचे आर्थिक आक्रित घडले होते.

तुलनेने दीर्घकाळ चाललेले युद्ध, त्यावर पाकिस्तानने केलेली अपूर्ण व अपरिपक्व मध्यस्थी व अखेरीस युद्धबंदी दृष्टिक्षेपात न येण्याच्या पृष्ठभूमीवर, जगातील अन्य देशांप्रमाणेच भारताच्या परराष्ट्रीय धोरणासोबतच आर्थिक ऊर्जाविषयक संकटे कायमच आहेत. जनसामान्यांपासून व्यापार-उद्योगापर्यंत युद्धाची झळ लागण्याच्या पृष्ठभूमीवर भारताची भूमिका आणि बाजू अनेकार्थांनी वरचढ ठरली आहे.

या संदर्भात जागतिक पातळीवर तुलना करता, भारताने आपला ऊर्जा क्षेत्रासाठी आवश्यक असणाऱ्या तेल व वायूचा साठा-पुरवठा कायम राखण्याचे आव्हान यशस्वीपणे पेलले आहे. इतर अनेक मोठ्या देशांसाठी युद्धकाळात अशक्यप्राय ठरलेली अशी देशपातळीवर सुमारे दोन महिन्यांसाठी आवश्यक असा इंधनसाठा भारताने कायम तर राखलाच व तेही तेल-इंधनदरात नियंत्रण राखून. भारतीय अर्थव्यवस्थेची सद्य:स्थितीतील ही मोठी जमेची बाजू व ऐतिहासिक कामगिरी ठरली. यालाच जोड मिळाली ती इराणच्या प्रभावाखाली असणाऱ्या क्षेत्रातून भारतीय जहाजांच्या सफल व सुरक्षित वाहतुकीची. भारताचे हे मोठे आंतरराष्ट्रीय धोरणात्मक यश अर्थव्यवस्थेसाठीसुद्धा मोठे पाठबळ ठरले आहे.

हीच बाब घरगुती गॅसच्या संदर्भातपण सांगता येईल. गॅस सिलेंडरच्या पुरवठ्यात संथगती निर्माण झाल्याने गॅसधारकांच्या रांगा अपरिहार्यपणे लागल्या. त्यात भर पडली ती, यानिमित्त झालेल्या अफवांच्या बाजाराची. गॅस सिलेंडर्सची टंचाई वा विलंब या कारणांनी खाद्यान्न पदार्थांची व्यापाऱ्यांनी दरवाढ करून घेतली व त्याचा हकनाक फटका ग्राहक म्हणून जनसामान्यांना बसला.

ऊर्जा क्षेत्रातील या जागतिक संकटावर आर्थिक उपाययोजना म्हणून जगातील अधिकांश मोठ्या देशांनी दरवाढ-करवाढ अशा तातडीच्या आर्थिक उपाययोजनांचा पिढीजात आधार घेऊन उद्योग-अर्थव्यवस्थेला सावरण्याचा प्रयत्न केला असला, तरी भारताने युद्धपूर्व काळापासूनच तेल-आयातीच्या विविध पर्यायांचा परिणामकारक वापर करून केलेल्या उपाययोजनेला युद्धकाळात मुत्सद्देगिरीसह घेतलेल्या निर्णयांमुळे आपल्या अर्थव्यवस्थेला त्याचा नेमक्या व निर्णायकक्षणी फायदा झाला, हे विशेष!

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### आम्ही देशाकरिता काय करू शकतो?

आपण नेहमीच देश आमच्याकरिता काय करतो विचारत असतो. जनतेला शत्रूपासून, गुन्हेगारांपासून वाचवणे, रोजगार उपलब्ध करून देणे, दळणवळणाची साधने, रस्ते, रेल्वे, हवाई प्रवास आणि आवश्यक त्या सोयी सुविधा पुरवणे, घर, धान्य, कपडे, शौचालय, वैद्यकीय सुविधा, स्वछता आदी बाबी पुरवणे इत्यादी ही यादी बरीच मोठी आहे. आपल्याकरिता देशाने हे केलेच पाहिजे अशी आपली साधारण अपेक्षा असते व त्यात चूक काहीच नाही.

पण... जेव्हा देशावर संकट येते, शत्रू हल्ला करतो, दहशतवादी कारवाया वाढतात, कोरोनासारखी महामारी येते, दंगली, जाळपोळ होते, आंतरराष्ट्रीय आर्थिक स्थिती युद्धजन्य परिस्थितीमुळे डळमळीत होते आदी... त्यावेळी आपण काय केले पाहिजे? १९६५च्या युद्धाच्या वेळेस लालबहादूर शास्त्रींनी सोमवारी भात खाऊ नये असे आवाहन केले व स्वतः ते अमलात आणले. अजूनही त्या पिढीतील काही लोक सोमवारी भात खात नाहीत. १९६७ मध्ये इंदिरा गांधींनी जनतेने किमान वर्षभर सोने विकत घेऊ नये व सरकारला म्हणजेच देशाला सहकार्य करावे अशी विंनती केली व देशप्रेमी नागरिकांनी त्याला सकारात्मक प्रतिसाद दिला. आज परत जागतिक महायुद्धाची परिस्थिती जगासमोर ठाकली आहे.

इंधनाचा पुरवठा विस्कळीत झाला आहे, सोन्याचे भाव आकाशाला भिडत आहेत, परकीय चलन व गंगाजळीच्या समस्या वाढत आहेत. अशा प्रसंगी आपले सरकार देशाकरिता एक वर्ष सोने विकत घेऊ नका, परदेशी प्रवास टाळा, विदेशी वस्तू विकत घेऊ नका असे आवाहन करते तर त्याला सकारात्मक प्रतिसाद देणे हे देशातील जनतेचे कर्तव्यच आहे. अशा बिकट प्रसंगी देखील या गोष्टीचे गलिच्छ राजकारण करणारेही आहेत, त्यांचा विचार न करता आपण देशाकरिता काय करू शकतो ते आपण केलेच पाहिजे.

**रवी वाघमारे**/नागपूर

## वाचक पत्रे

### वैनगंगा-नळगंगा प्रकल्प लाभदायक

उपरोक्त बातमी तरुण भारतात वाचण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा हा ड्रीम प्रोजेक्ट आहे, तो यशस्वी व्हावा यासाठी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक जयंत गवळी, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक राजेश सोनटक्के, अधीक्षक अभियंता महादेवराव कदम, कार्यकारी अभियंता जितेंद्र तुरखेडे रात्रंदिवस मेहनत घेत आहेत. वैनगंगा नळगंगा हा नदीजोड प्रकल्प अस्तित्वात येत असल्याने विदर्भातील अन्नदाता शेतकरी सुखी समृद्ध होणारच यात शंका नाही. या प्रकल्पासाठी गोसीखुर्द धरणातून १२ जुलै ते २० सप्टेंबर या ७० दिवसांच्या मान्सून कालावधीत सुमारे ६३.६६ टीएमसी अतिरिक्त पाणी येते आणि साठवण क्षमता नसल्याने वाहून जाते. हेच अतिरिक्त पाणी उचलून त्यावरच नदी जोड प्रकल्प उभारला जाईल, अशी माहिती गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक जयंत गवळी यांनी दिली. या प्रकल्पामुळे ४ लाख ४ हजार २८१ हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. वैनगंगा नळगंगा नदी जोडण्यासाठी ३४ नवीन धरणे बांधण्यात येणार आहेत. गोसीखुर्दपासून नळगंगा धरणापर्यंत ३२८.२८ किलोमीटर लांबीचे कालवे तयार केले जातील. त्याकरिता ३१ हजार ४९५ हेक्टर जमीन लागेल. त्या पोटी ४७.१७ टीएमसी पाणी सिंचनासाठी उपयोगी आणले जाईल. नदीजोड प्रकल्पात २८ हजार ३०६ हेक्टर जागा बुडीत क्षेत्रात जाईल, त्याकरिता ३९ गावांतील ७३१६ कुटुंबाचे पुनर्वसन केले जाणार आहे. प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम सुरू करण्याअगोदर पुनर्वसनाच्या कामांना प्राधान्य देण्यात यावे असे वाटते. सोबतच हा प्रकल्प वेळेत पूर्ण व्हावा अशी अपेक्षा आहे.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

### जलसंवादावरचा वाचनीय अग्रलेख

सोमवार १८ मे च्या अंकातील 'जलसंवाद आणि टीआरपीच्या पल्याडचे गडकरी' हा अतिशय नाजूक विषयावरचा अग्रलेख वाचला. भूजल संवर्धन व एकूणच पाण्याची समस्या गंभीर आहे. हल्ली राजकारणात प्राधान्यक्रम ठरवताना गंभीर विषयांकडे दुर्लक्ष होते आणि म्हणूनच नितीन गडकरींसारखा राष्ट्रीय पातळीचा नेता जलसंवाद व जलक्रांती यावर परिषद घेतो ही कौतुकास्पद बाब आहे.

महाराष्ट्रामध्ये कित्येक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या अतिशय बिकट आहे. विहिरीच्या पुनर्भरणाचा प्रश्न कोणीही गांभीर्याने घेत नाही. त्यामुळे पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्था किंवा जलतारा या प्रकल्पाचे जनक डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांच्या अशा प्रकारच्या सामाजिक कार्याचे कौतुक वाटते. ही लोकचळवळ होणे गरजेचे आहे, असे वाटते.

**सुरेश पंदारे**/पुणे. ९३७२१९९१००

## महत्वाचे...



### एसएनव्ही रॉयल्स विजेता : पीएमपीएल क्रिकेट स्पर्धेत भूविंगल इलेव्हन उपविजेता

**सोलापूर, दि. १८ मे-**

पीएमपीएल सीझन २० क्रिकेट स्पर्धेत संघमालक शुभम टंकाळे यांच्या नेतृत्वाखाली एसएनव्ही रॉयल्स संघाने विजेतेपद पटकाविले. संघमालक वैभव कांबळे यांच्या भूविंगल इलेव्हन संघास उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

या स्पर्धेचे उद्घाटन महापालिका सभागृह नेते नरेंद्र काळे, शिवसेना नगरसेवक प्रियदर्शन साठे, शिव संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजकुमार सारणे, पत्रकार अप्पासाहेब लंगोटे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यात संघमालकांमध्ये श्रीकांत पाटील (Shree Warriers), प्रतीक सोनवणे (Royal Challengers), वैभव कांबळे (Bhuvingel 11) आणि शुभम टंकाळे (SNV Royals) यांनी सहभाग घेतला.

पारितोषिके भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, सोलापूरच्या उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांच्या हस्ते देण्यात आली. यावेळी नगरसेवक दिपक जमादार पी एम सी सी चे संस्थापक परमेश्वर माळगे, अॅड. विजय कोनापुरे, काशिनाथ औरसंग, अप्पा रामदासी, प्रकाश स्वामी, लक्ष्मण कावळे, अविनाश बोधले, विशाल पाटील,लक्ष्मण काळजे, श्रीकात जमादार,सचिन कुसेकर, शोयब सय्यद ,नितीन काबळे, सनी कीर्तने, दिपक भोसले, कौस्तुभ स्वामी, धर्मराज नाशी, कुमार केगणाळकर, शेखर कदम, अजिंक्य उप्पीन व प्रथमेश माळगे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### राज्यस्तरीय शूटिंग स्पर्धेत सुर्डीचा रोहित शेळके द्वितीय

**वैराग, दि. १८ मे-**



राज्यस्तरीय शूटिंग स्पर्धेत सुर्डी (बार्शी) येथील रोहित सत्यवान शेळके याने ४०० पैकी ३८० गुण मिळवित द्वितीय उत्तेजणार्थ स्थान मिळविले. माढा येथील 'लक्षवेध रायफल व पिस्तूल शूटिंग अॅकॅडमी'चा इयत्ता नववीतील रोहित याने एस. व्ही. जे. सी. टी. चिपळूण (डेरवण) येथे झालेल्या या स्पर्धेत ही कामिगरी केली. त्यास लक्षवेध अॅकॅडमीचे अध्यक्षा उज्वला जाधव, डायरेक्टर व मार्गदर्शक उदय जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

# 'शिरसी'चा पैलवान महेंद्र गायकवाड हिंद केसरी

### पृथ्वीराज मोहोळची दुखापतीनंतर माघार

### देशातील ३९वा, महाराष्ट्रातील १०वा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मे-**

जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यातील शिरसी गावचा सुपुत्र आणि नामवंत पैलवान महेंद्र गायकवाड याने कुस्ती क्षेत्रात ऐतिहासिक कामगिरी केली आहे. साताऱ्यातील छत्रपती शाहू स्टेडियमवर पार पडलेल्या ५२व्या हिंदकेसरी कुस्ती स्पर्धेत मूळच्या मंगळवेढयाच्या महेंद्र गायकवाडने मानाची हिंदकेसरी गदा पटकावली आहे. तीनवेळा उपमहाराष्ट्र केसरी राहिलेला महेंद्र गायकवाड अखेर देशाचा ३९वा आणि महाराष्ट्राचा १०वा हिंदकेसरी ठरला आहे.

भारतीय शैली कुस्ती महासंघ, राजेश्वर प्रतिष्ठान आणि तालीम संघ (सातारा) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या हिंदकेसरी कुस्ती स्पर्धेत देशभरातील २८ राज्यांतील सुमारे ८५० महिला व पुरुष मल्ल सहभागी झाले होते. महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज मोहोळ आणि महेंद्र गायकवाड यांच्यात ही लढत झाली. कुस्ती सुरू झाल्यानंतर उपमहाराष्ट्र केसरी महेंद्र गायकवाडने डाव टाकला तेव्हा पृथ्वीराजच्या हाताला इजा झाली. त्याला हात हलवताही येत नसल्याने त्याने माघार घेतली. त्यानंतर बाहुबली म्हणून नावलौकिक असलेला महेंद्र हिंद केसरीचा मानकरी ठरला.



यंदा अंतिम फेरीत दोन्ही पैलवान महाराष्ट्राचेच आमनेसामने असल्याने ही मानाची गदा राज्यातच येणार हे आधीच निश्चित झाले होते. मात्र लढती दरम्यान झालेल्या प्रकारामुळे कुस्तीशौकिनांना हवी तशी लढत पाहायला न मिळाल्याने त्यांची काहीशी निराशा झाली. अखेर विजयी घोषित होताच महेंद्रला आपले अश्रू अनावर झाले आणि या ऐतिहासिक विजेतेपदासह त्याने मानाची हिंदकेसरी गदा व एक थार गाडी आपल्या नावावर केली.

अंतिम लढतीत महेंद्रने सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेत पृथ्वीराजवर चढाई केली आणि सुरुवातीलाच दोन गुणांची कमाई केली. पृथ्वीराज खाली असताना महेंद्रने त्याचा उजवा हात पकडून डाव टाकण्याचा प्रयत्न केला, पण याच दरम्यान पृथ्वीराजचा हात उलटा फिरल्याने सामन्यात आक्षेप घेतला गेला आणि कुस्ती थांबवण्यात आली. विशेष म्हणजे, इतकी मोठी दुखापत झाली असतानाही पृथ्वीराज जिद्दीने पुन्हा लढण्यासाठी तयार झाला होता, मात्र त्याचा हात अजिबातच हलत नसल्याने वैद्यकीय कारणास्तव कुस्ती थांबवून अखेर महेंद्र गायकवाडला विजयी घोषित करण्यात आले.



#### तीन पिढ्यांची कुस्ती परंपरा

महेंद्र गायकवाडच्या घराला तीन पिढ्यांची कुस्ती परंपरा आहे. मंगळवेढा तालुक्यातील शिरसी हे त्यांचे गाव. शेती हा त्यांच्या कुटुंबांचा मुख्य आधार. घराला वारीची आणि लाल मातीची परंपरा. आजोबा शंकर, वडील बाबासाहेब, चुलते काकासाहेब आणि महेंद्र अशी लालमातीत झुंजणाऱ्या पिढीची नावे. पावसावर अवलंबून असणाऱ्या शेतीत राबवणाऱ्या गायकवाड यांच्या शिरसी गावात १९६६ मध्ये तालमीची स्थापना झाली. याच तालमीत महेंद्रने कुस्तीचे धडे गिरवण्यास सुरुवात केली. येथेच चुलते काकासाहेब आणि वडील बाबासाहेब कुस्ती खेळत. आईवडील, चुलते, भाऊ आणि इतरांच्या देखरेखीखाली महेंद्रची कुस्ती क्षेत्रातील वाटचाल सुरू राहिली आहे. दहावीपर्यंत तो याच तालमीत होता.

# सिंहगड स्कूलमधील विद्यार्थ्यांच्या आंतरराष्ट्रीय सुवर्ण कामगिरीबद्दल गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मे -**

श्रीलंकेची राजधानी कोलंबो येथे पार पडलेल्या साउथ एशियन गोल शॉट बॉल चॅम्पियनशिप २०२६ स्पर्धेत भारतीय संघाने चारही गटांमध्ये विजेतेपद पटकावत अभूतपूर्व कामगिरी केली.

या विजयी संघात सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, केगाव येथील जानवी बुराडे, श्रद्धा चव्हाण,आर्या पाटणे, आदित्य गुंड, आशिष बनसोडे व समर्थ मगर, अथर्व गुर्रम व वरुण सरडा येथील तब्बल ८ विद्यार्थ्यांचा समावेश होता. या यशामागे भारतीय संघाचे प्रशिक्षक व क्रीडाशिक्षक राजू ठाकूर यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. या ऐतिहासिक यशानंतर सोलापूर महानगरपालिकेचे उपमहापौर ज्ञानेश्वर देवकर आणि पर्यावरण दूत मनोज देवकर यांनी विद्यार्थ्यांना महापालिकेत बोलावून झाडांचे रोपटे देत विशेष सत्कार केला. तसेच सरस्वती चौक येथील कॅनरा बँक शाखेतर्फेही यशस्वी विद्यार्थ्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी शाखा व्यवस्थापक शैलजा हिरेमठ, विनायक दुमालदार, ऋषिकेश होनमाने आणि प्रवीण पंडित यांची उपस्थिती होती. या प्रसंगी सिंहगड इन्स्टिट्यूटचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांनी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले



# प्रखर राष्ट्रवादी व्यक्तिमत्व गमावले

### एस.के. कुलकर्णी यांना मान्यवरांची श्रध्दांजली



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मे -**

एस. के. कुलकर्णी हे प्रखर राष्ट्रवादी विचारसरणीचे, सावरकर प्रेमी आणि विज्ञानाप्रती कायम निष्ठेने काम करणारे, विद्यार्थी प्रिय हाडाचे शिक्षक होते, अशा शब्दात सुधाकर केशव तथा एस के कुलकर्णी यांना मान्यवरांनी श्रद्धांजली अर्पण केली.

विद्यार्थी परिषदेचे माजी अध्यक्ष एस. के. कुलकर्णी यांचे ९ मे रोजी बंगळूर येथे निधन झाले. त्यानंतर त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी सोमवार १८ मे रोजी सायंकाळी शिवस्मारक सभागृहात विद्यार्थी परिषदेचे माजी कार्यकर्ते आणि एस. के. कुलकर्णी मित्र परिवाराच्यावतीने श्रद्धांजली सभा झाली. याप्रसंगी व्यासपीठावर मिलिंद कुलकर्णी, शहर संघचालक राजेंद्र काटवे, विद्यार्थी परिषदेचे जिल्हा सहप्रमुख धन्यकुमार बिराजदार, सभेचे संयोजक महादेव न्हावकर, सुधीर देव होते.

राजेंद्र काटवे म्हणाले, एस. के. कुलकर्णी हे निष्ठावान कार्यकर्ते होते. माजी महापौर किशोर देशपांडे म्हणाले, आम्ही दोघांनी एकत्रित अनेक संस्थावर काम केले. आणीबाणीमध्ये एकाच वेळी कारागृहात होतो. एस.के.नेहमी अभ्यासपूर्व मुद्दे काढून बोलायचे.

नगरसेविका रोहिणी तळवळकर म्हणाल्या, एस. के. सरांचे संस्कार आणि शिकवण आम्हाला जीवनात उपयोगी ठरत आहे. सरस्वती मंदिर प्रशालेचे कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष अॅड. पांडुरंग देशमुख म्हणाले, एस के कुलकर्णी हे विद्यार्थी प्रिय, समाजप्रिय व्यक्तिमत्व होते.

विश्व हिंदू परिषदेचे प्रांत अध्यक्ष गजानन धरणे म्हणाले, विद्यार्थी परिषदेच्या कामाला त्यांचे कायम प्राधान्य असायचे. विद्यार्थी परिषदेचे जिल्हा सहप्रमुख प्रा. धन्यकुमार बिराजदार म्हणाले, सरांनी विज्ञान, गणिताची आवड विद्यार्थी विद्यार्थिनींमध्ये रुजवली.

श्रीकृष्ण वैद्य म्हणाले एस के यांनी अनेक यातना सहन करीत संघ परिवारातील अनेकांना आधार दिला आहे. लोकतंत्र सेनानी संघटनेचे अध्यक्ष गुरुराज कुलकर्णी म्हणाले, आणीबाणीत कारागृह भोगलेल्या सत्याग्रहींचे संघटन करण्याच्या कामांमध्ये एस. के. यांनी खूप मोठे कार्य केले.

माजी नगरसेवक विश्वनाथ बेंद्रे म्हणाले, सोलापुरात सावरकरांचा पुतळा असो, स्मरणिका काढणे असो, चित्रपटासाठी काम करणे असो अशा सगळ्या कामात एस. के. नी कायम मदत केली आहे.

विद्यार्थी परिषदेच्या माजी पूर्ण वेळ कार्यकर्त्या सुवर्णा गोगटे - घैसास म्हणाल्या, एस. के. सर सामाजिक कार्यात असले तरी कौटुंबिक समतोलही उत्तम साधला होता. त्यांचा आदर्श कौटुंबिक जीवनासाठी एक मार्गदर्शक आहे.

सरस्वती मंदिर प्रशालेतील पर्यवेक्षक मुकुंदगिरी म्हणाले, एस. के. यांचे जाणे म्हणजे आमचे मार्गदर्शक हरपले आहेत. त्यांनी शिक्षकांचे अनेक प्रश्न सोडविले आहेत.

प्रा. मोहन भालेराव म्हणाले, त्यांना संस्कृतीबद्दल खूप आस्था होती. त्यातूनच त्यांनी सांस्कृतिक ज्ञान परीक्षा घेण्याचा आग्रह ठेवलेला होता. विलास पाटील म्हणाले, एस. के. हे मिरी वटवटे भागातील असल्याने त्यांनी कायम ग्रामीण भागातील प्रश्नासाठीही वृत्तपत्राच्या माध्यमातून वाचा फोडली. ण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांनी मांडलेले प्रश्न सोडवणे हीच त्यांना श्रद्धांजली आहे.

सभेचा समारोप करताना सुधीर देव यांनी एस.के. कुलकर्णी मी काम करतो असे म्हणून राष्ट्रासाठी कार्य करीत राहिले. प्रास्ताविक महादेव न्हावकर यांनी केले. सूत्रसंचालन आभार प्रदर्शन डॉ. अजितकुमार देशपांडे यांनी केले.

सभेला एस के कुलकर्णी यांच्या पत्नी वसुंधरा कुलकर्णी, पुत्र मिलिंद कुलकर्णी, कन्या न्याती अय्यर, स्नुषा श्रद्धा कुलकर्णी आदींसह संघ परिवारातील कार्यकर्ते एस.के. कुलकर्णी यांचे नातेवाईक उपस्थित होते.



### लातूरसह मुंबई, कोल्हापूर, पुणेला विजेतेपद

#### छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्य व्हॉलीबॉल स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**बदलापूर, दि. १८ मे-**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, कुळगाव-बदलापूर नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्य व्हॉलीबॉल स्पर्धेत मुंबई, कोल्हापर, पुणे, लातूर विभागाने विजेतेपद पटकावले.

बदलापूर जिमखाना मैदानावर संपलेल्या या स्पर्धेचे बक्षिस वितरण आमदार किसन कथोरे व कुळगाव-बदलापूर नगरपरिषदच्या नगराध्यक्षा रूचिता घोरपडे यांच्या हस्ते झाले. विजेत्यांना २३ लाख ३५ हजारांची रोख बक्षिसे व करंडक, पदक देण्यात आले.

रात्री अडीच वाजेपर्यंत रंगलेल्या २१ वर्षांखालील मुलांच्या गटातील विजेतेपदाची लढत लातूरने जिंकली. चार सेटपर्यंत रंगलेल्या लढतीत लातूरने २५-१६,१५-२५, २५-२१,२५-१९ गुणांनी मुंबईचा पराभव केला. निर्भय देशमुख, शेहराज खान, आफताब कुरेशी या खेळाडूंनी आक्रमक झुंज देत तिसऱ्यांदा विजेतेपदाला गवसणी घातली. दुसरा सेट गमविल्यानंतर पुन्हा आघाडी घेत लातूरने बाजी मारत उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली.

मुलींच्या पराभवानंतर सलग ३ सेट जिंकून मुंबईने नाशिकला १६-२५, २५-१८,२५-१९, २५-२१ गुणांनी हरविले. शिवप्रिया पनीकर, दिव्या मेहता व वेदिका सामगिर या खेळाडुंनी दुसऱ्या सेटमध्ये पिछाडीवर असलेल्या संघाला एकहाती सेट जिंकून दिला. मुलींच्या गटात पुणे संघाने नागपूरवरच मात करीत तिसरे स्थान संपादन केले.

१८ वर्षांखालील मुलांच्या गटात कोल्हापूरने नागपूरचा २३-२५, २७-२५,२१-२५, २५-२० व १५-१२ गुणांनी पराभव केला.

मुलींच्या गटात पुणे विभागाने नागपूरचा २५-१९,२५-१८, २५-१६ गुणांनी मात केली. साक्षी साळुंखे, वैष्णवी अडलिंगे व श्रेया चव्हाणने आक्रमण करीत पुणे संघाला विजयश्री बहाल केली.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-Tender Notice**

Digitally signed online bids are invited through E-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No.7000039953 E-Tender No.:** SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender: 02/2026-27, **Particulars:** Work of providing services of skilled and unskilled manpower ( Non-Technical) on outsource basis at the various division offices under EHV O&M Circle, Solapur. **Estimated cost:** Rs. 1,13,50,231/- **E.M.D. (Approx. 1% of est. cost):** Rs 1,13,502/- **Tender cost** in Rs. 5000/- + GST, **Sale period:** 18.05.2026 to 03.06.2026 **Last Date of Submission:** 03.06.2026 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 04.06.2026 at 12:00 Hrs. (If possible). **Contact person:** Superintending Engineer - 7447440608 For further details. **Subsequent call intimations (2nd/3rd calls, if any) will not be re-published in newspapers and will only be available on the e-tender portal: please visit.**
**1) https://srmetender.mahatransco.in.**
**2) https://mahatransco.in**
**Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Superintending Engineer,**
**EHV O&M Circle Solapur**

अुत्तम सेवा

मंगळवार
दि. १९ मे २०२६

## नोकरीच्या शोधात

उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| १) | रेल्वे रिक्रुटमेंट बोर्ड RRB | | | |
| | असि. लोको पायलट (११,१२७) | ITI/डिप्लोमा/B.E. उत्तीर्ण असावे. | ३० पर्यंत | १४/०७/२६ |
| २) | केंद्रीय शिक्ष पात्रता परीक्षा, CTRT | | | |
| | शिक्षक | दहावी/बारावी व D.Ed/ B.Ed उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | ३० पर्यंत | १०/०६/२६ |
| ३) | आदिवासी विकास विभाग (मुदतवाढ) | | | |
| | चौकीदार (४१६ पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | ३८ पर्यंत | २७/०५/२६ |
| ४) | राष्ट्रीय पात्रता चाचणी परीक्षा, NET | | | |
| | सहा. प्राध्यापक | पदव्युत्तर पदवी किंवा ऑपिअर असणारे स्त्री/पुरुष उमेदवार | - | २०/०५/२६ |
| ५) | रिझर्व बँक ऑफ इंडिया, RBI | | | |
| | ऑफिसर (६० पदे) | पदवी (६०%) गुणांसह उत्तीर्ण असावे | ३० पर्यंत | २०/०५/२६ |
| ६) | युनियन बँक ऑफ इंडिया, UBI | | | |
| | अॅप्रेंटिस (१८६५ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार | २८ पर्यंत | १९/०५/२६ |

✻ मोफत सरकारी अपडेट ✻
सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्अॅपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला "जॉईन" असा मेसेज व्हॉटस्अॅप करावा.

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| ७) | केंद्रीय राखीव पोलीस बल CRPF | | | |
| १ | वाहन चालक (३१७६ पदे) | दहावी व जड वाहन परवाना असावे | २७ पर्यंत | १९/०५/२६ |
| २ | ट्रेडसमन (५९२० पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | २३ पर्यंत | |
| ८) | चलन नोट मुद्रणालय | | | |
| १ | ऑफिस असिस्टंट (२२ पदे) | पदवी व इंग्रजी टायपिंग असावे | २५ पर्यंत | १९/०५/२६ |
| २ | ज्युनियर टेक्निशियन (४०८) | ITI (इले/इलेक्ट्रॉ /मशिनिस्ट / एसी / फिटर / प्रिंटींग / प्लेट मेकर / केमिकल) | २५ पर्यंत | |
| ३ | सुपरवायझर (९९ पदे) | पदवी/पदविका (६०%) (कॉम्प्यु/ आय.टी / मेकॅ/ एसी/ इले/ इलेक्ट्रॉ/ सिव्हील) | ३० पर्यंत | |

सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.
२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)
३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

अुत्तम सेवा
१) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर.
वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१.
www.uttamseva.org





## महत्त्वाचे

### ... तर महेंद्र सिंह धोनी पुढच्या वर्षी परत येईल : हरभजन



**नवी दिल्ली** : आयपीएल २०२६ हंगामातील चेन्नई सुपर किंग्जच्या घरच्या मैदानावर होणाऱ्या शेवटच्या सामन्यापूर्वी, भारताचा माजी क्रिकेटपटू हरभजन सिंगने एम.एस. धोनीला एक भावूक आवाहन केले आहे. त्याने धोनीला हा सामना खेळण्याची विनंती केली आहे. एम.ए. चिदम्बरम् स्टेडियमवर आपल्या कारकिर्दीतील शेवटचा सामना खेळून धोनी चाहत्यांना दिलेले वचन पूर्ण करेल, असेही हरभजनने नमूद केले आहे. जर सीएसकेचा हा माजी कर्णधार सोमवारी खेळला नाही, तर याचा अर्थ असाही होऊ शकतो की, आपले वचन पाळण्यासाठी तो २०२७ च्या हंगामात पुन्हा परत येईल. पायरीच्या स्नायूंच्या दुखापतीमुळे धोनी या हंगामात एकही सामना खेळलेला नाही; परंतु सोमवारी चेन्नईमध्ये सीएसकेचा सामना सनरायझर्स हैदराबादशी होणार असल्याने धोनीचा हा कदाचित निरोप समारंभाचा सामना ठरू शकतो, याबद्दलच्या चर्चा पुन्हा एकदा जोर धरू लागल्या आहेत.

### फिफाचे पदाधिकारी भारतात येणार



**नवी दिल्ली** : पुढील महिन्यात होणाऱ्या विश्वचषक स्पर्धेच्या पृष्ठभूमीवर फिफाचे माध्यम हक्क अधिकारी या आठवड्यात भारतात येणार आहेत, असे तीन सूत्रांनी सांगितले. या स्पर्धेसाठी फुटबॉलच्या नियामक संस्थेने दरांवरून मतभेद झाल्यामुळे भारतासोबत प्रसारण करार केलेला नाही. प्रसारण हक्कांबाबतच्या कोंडीमुळे भारतातील लाखो फुटबॉल चाहत्यांना ही स्पर्धा पाहता न येण्याचा धोका आहे. चीनच्या सरकारी प्रसारकाची मूळ कंपनी असलेल्या चायना मीडिया ग्रुपने, तेथील टीव्ही हक्कांबाबतचा तिढा संपवण्यासाठी गेल्या आठवड्यात विश्वचषक प्रसारण कराराला सहमती दर्शविली. फिफाचे माध्यम हक्क अधिकारी भारतात येत आहेत, मात्र ते कोणाला भेटणार आहेत आणि नेमका अजेंडा काय आहे याचा तपशील स्पष्ट नाही. फिफाने १८० हून अधिक प्रदेशांमधील प्रसारकांसोबत करार पूर्ण केले आहेत आणि भारतात माध्यम हक्कांच्या विक्रीसंदर्भात चर्चा सुरू असून 'या टप्प्यावर ती गोपनीय ठेवली पाहिजे, असे फिफाने म्हटले आहे.

### विजय हजारे करंडकात राहुल, कृष्णा कर्नाटकचे प्रतिनिधित्व करणार

**बंगळुरू** : भारताचा स्टार फलंदाज के.एल. राहुलने ३ आणि ६ जानेवारी रोजी होणाऱ्या विजय हजारे करंडकातील सामन्यांसाठी कर्नाटक संघाकडून खेळण्यास आपली उपलब्धता निश्चित केली आहे. दुसरीकडे, वेगवान गोलंदाज प्रसिद्ध कृष्णानेही, न्यूझीलंडविरुद्धच्या आगामी एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेपूर्वी, या स्पर्धेतील तीन सामने खेळण्याची तयारी दर्शविली आहे. अ गटात स्थान मिळालेला आणि गतविजेता असलेला कर्नाटक संघ २९ डिसेंबर रोजी आपला कट्टर प्रतिस्पर्धी असलेल्या तामिळनाडूचा सामना करेल. त्यानंतर ३ जानेवारी रोजी त्रिपुरा आणि ६ जानेवारी रोजी राजस्थानविरुद्ध खेळेल. हो, मी ३ आणि ६ जानेवारी रोजी खेळेल असा केएलने दुजोरा दिला आहे. प्रसिध कृष्णा हे दोन्ही सामने, तसेच २९ डिसेंबर रोजी होणारा आणखी एक सामनाही खेळेल, असे निवड समितीचे नवनियुक्त अध्यक्ष अमित वर्मा यांनी सांगितले.

### कर्मन कौरला फ्रेंच ओपन एकेरी पात्रता फेरीत स्थान

**चंदीगड** : राऊंडग्लास टेनिस अकादमीची खेळाडू कर्मन कौर थंडीने सोमवारी सुरू झालेल्या फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धेच्या महिला एकेरीच्या पात्रता फेरीत स्थान मिळविले आहे. उद्या पहिल्या पात्रता फेरीत तिचा सामना हार्मोनी टॅनशी होईल. या स्पर्धेत दोन्ही खेळाडूंना मानांकन नाही. कर्मनने तिच्या २३८ च्या प्रोटेक्टेड रँकिंगमुळे (पीआर) एलिट पात्रता फेरीत आपले स्थान मिळविले आहे. त्यामुळे तिला अधिकृत प्रवेश यादीत ११९ वे स्थान मिळाले आहे. प्रोटेक्टेड रँकिंग प्रणालीमुळे खेळाडूंना दुखापतीमुळे दीर्घकाळ खेळातून बाहेर राहिल्यानंतर उच्च-स्तरीय स्पर्धांमध्ये पुन्हा प्रवेश मिळतो, त्यामुळे भारताच्या माजी प्रथम मानांकित खेळाडूला जगातील सर्वोत्कृष्ट खेळाडूंमध्ये आपले स्थान पुन्हा मिळविण्यात मदत झाली आहे. ग्रॅण्ड स्लॅम मंचावर कर्मन कौरचे दमदार पुनरागमन हे देशातील या खेळासाठी एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. त्यामुळे ग्रॅण्ड स्लॅम एकेरीमधील भारताची अलीकडील अनुपस्थिती संपुष्टात आली आहे.

# हैदराबादसमोर १८१ धावांचे लक्ष्य



पॅट कमिन्सचे ३ बळी



डेवाल्ड ब्रेव्हिसची ४४ धावांची खेळी

◆ **चेन्नई, १८ मे**

१९ व्या इंडियन प्रीमिर लीग हंगामात सोमवारी एम. ए. चिदम्बरम् स्टेडियमवर सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या आयपीएल सामन्यात डेवाल्ड ब्रेव्हिस (४४) व कार्तिक शर्माच्या (३२) दमदार फलंदाजीच्या बळावर चेन्नई सुपर किंग्सने मर्यादित २० षटकांत ७ बाद १८० धावा उभारल्या आणि सनरायझर्स हैदराबाद संघासमोर विजयासाठी १८१ धावा काढण्याचे आव्हान ठेवले.

चेन्नई सुपर किंग्सजा कर्णधार ऋतुराज गायकवाडने नाणेफेक जिंकले आणि विजय मिळविण्याचे ध्येय ठेवून घरच्या मैदानावर हैदराबादविरुद्ध प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, परंतु अपेक्षेनुसार संजू सॅमसन व ऋतुराज गायकवाड या सलामीची जोडीची फलंदाजी हवी तशी बहरली नाही. पॅट कमिन्सच्या प्रभावी गोलंदाजीने सॅमसन, कार्तिक आणि गायकवाडला तंबूचा रस्ता दाखविला.

सामन्याच्या तिसऱ्याच षटकांत पॅट कमिन्सने वेगवान मारा करून संजू सॅमसनला ईशान किशनकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. सॅमसनने १३ चेंडूत ५ चौकार व एका षट्काराच्या मदतीने २७ धावा केल्या. पुढे ऋतुराज गायकवाडने उर्विल पटेल व कार्तिक त्यागीच्या सहकार्याने संघाची धावसंख्या वाढविण्याचा प्रयत्न केला, परंतु साकिब हुसेनने उर्विल पटेलचा (१३) त्रिफळा उडविला. ऋतुराजला कार्तिक शर्माची उत्तम साथ मिळाली व त्यांनी संघाला ९० धावांवर पोहोचवले, मात्र त्याचवेळी कमिन्सने कार्तिकला नितीश कुमार रेड्डीकडून झेलबाद केले. कार्तिक शर्मानि १९ चेंडूंत ३ चौकार व २ षट्कारांसह ३२ धावांची भर घातली व त्याने ऋतुराजसोबत तिसऱ्या गड्यासाठी ४२ धावांची भागीदारी केली. पुढे ऋतुराजने डेवाल्ड ब्रेव्हिसच्या साथीने संघाला ११.३ षटकांत १०० धावांचा टप्पा गाठून दिला असताना पॅट कमिन्सने ऋतुराजला बाद केले. ऋतुराज गायकवाडने २१ चेंडूंत १५ धावा केल्या.

पुढे डेवाल्ड ब्रेव्हिस व शिवम दुबेने हैदराबादच्या गोलंदाजांचा खरपूस समाचार घेत बहारदार फलंदाजी केली. या दोघांनी पाचव्या गड्यासाठी ५९ धावांची भागीदारी करून चेन्नईला सन्मानजनक धावांवर आणले, याचवेळी ईशान मलिंगाने डेवाल्डचा त्रिफळा उडविला. डेवाल्ड ब्रेव्हिसने २७ चेंडूंत २ चौकार व ४ षट्कारांसह ४४ धावांची खेळी केली. शिवम दुबे प्रशांत वीरच्या मदतीने संघाची धावसंख्या वाढविण्याच्या प्रयत्नात असतानाच साकिब हुसेने दुबेचा त्रिफळा उडविला, नंतर विदर्भाच्या प्रफुल्ल हिंगेनेही आपल्या गोलंदाजीची कमाल दाखवित प्रशांत वीरला झेलबाद केले व येथे चेन्नई सुपर किंग्सचा डाव २० षटकांत ७ बद १८० धावांत आटोपला.

सनरायझर्स हैदराबादाकडून पॅट कमिन्सने ३ बळी, साकिब हुसेनने २ बळी, तर प्रफुल्ल हिंगे व ईशान मलिंगाने प्रत्येकी १ बळी टिपला. (वृत्तसंस्था)

# लखनौ राजस्थानविरुद्ध विजयासाठी उत्सुक

◆ **जयपूर, १८ मे**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात मंगळवारी जयपूर येथील सवाई मानसिंह स्टेडियमवर सायंकाळच्या सत्रात राजस्थान रॉयल्स आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे.

आधीच स्पर्धेच्या बाहेर झालेला लखनौचा संघ सध्या दहा संघांच्या गुणतालिकेत ८ गुणांसह तळाशी आहे, तर राजस्थान रॉयल्स १२ गुणांसह सहाव्या स्थानावर आहे.



चेन्नई सुपर किंग्जवर मिळवलेल्या दणदणीत विजयाच्या जोरावर या सामन्यात उतरताना, लखनौ सुपर जायंट्सचा संघ हंगामाचा शेवट दिमाखात करण्याच्या आपल्या मोहिमेत आणखी एका विजयाची नोंद करण्यास उत्सुक असेल.

चेन्नई विरुद्धच्या सामन्यात आकाश सिंगने आपल्या चार षटकांच्या भेदक गोलंदाजीने (३-२६) प्रतिस्पर्ध्यांच्या आघाडीच्या फळीला हादरवून सोडले होते; त्यानंतर मिचेल मार्शच्या ३८ चेंडूंतील ९० धावांच्या जबरदस्त खेळीच्या जोरावर लखनौ संघाने सात गडी राखून सहज विजय मिळविला.

विजय मिळवणे हे नक्कीच सुखद असते. अशा प्रकारे खेळल्याचा आम्हाला खूप अभिमान वाटतो. आकाश सिंग खूप मेहनत घेत आहे व तो इतरत्र भरकटण्यापेक्षा, आखलेल्या रणनीतीवर ठाम राहण्याला अधिक प्राधान्य देतो. त्याच्या त्या मेहनतीचे फळ त्याला मिळाले. आम्हाला आमच्या कामगिरीचा अभिमान आहे आणि एक संघ म्हणून आम्ही खूप आत्मविश्वास बाळगून आहोत. आमच्याकडे जो संघ आहे, तो खरोखरच अप्रतिम आहे, असे ऋषभ पंत चेन्नईविरुद्धच्या विजयानंतर म्हणाला होता.

दुसरीकडे, राजस्थान रॉयल्सला रविवारी दिल्लीत झालेल्या एका अत्यंत चुरशीच्या आणि मोठ्या धावसंख्येच्या सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला. सलग तीन पराभवांची मालिका घेऊन ते आता आगामी सामन्यासाठी सज्ज झाले आहेत.

ऋषभ पंतच्या नेतृत्वाखालील संघ आपली विजयाची मालिका कायम राखण्याचा आणि या हंगामाच्या सुरुवातीला झालेल्या पराभवाचा वचपा काढण्याचा प्रयत्न करेल. गुणतालिकेत वरचे स्थान गाठून, शक्य तितक्या वरच्या क्रमांकावर हंगामाचा शेवट करणे हे त्यांचे उद्दिष्ट असेल.

त्या सामन्यात, मोहम्मद शमी, प्रिन्स यादव आणि मोहसिन खान यांनी प्रत्येकी दोन बळी घेत, राजस्थान रॉयल्सला २० षटकांत ६ बाद १५९ धावसंख्येवर रोखले होते. मात्र, लक्ष्याचा पाठलाग करताना मिचेल मार्शने ४१ चेंडूंत केलेल्या ५५ धावांच्या संयमी खेळीनंतरही, आम्हाला ४० धावांनी पिछाडीवर राहावे लागले. (वृत्तसंस्था)

**आजचा सामना**
**राजस्थान रॉयल्स वि. लखनौ सुपर जायंट्स**
**स्थळ** : सवाई मानसिंह स्टेडियम, जयपूर
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# बाळगे व शेख यांना आंतरराष्ट्रीय शुडोकान कराटेची ब्लॅक बेल्ट सहावी पदवी

**सोलापूर, दि. १८ मे-**

जपान कराटे डो शुडोकान महाराष्ट्र व बोजु-रीयु मार्शल आर्ट्स स्पोर्ट्स अकॅडमीचे प्रमुख भीमराव बाळगे व इक्बाल शेख यांना जपान कराटे डो शुडोकान आंतरराष्ट्रीय मुख्यालय जपान या संघटनेकडून ब्लॅक बेल्ट सहावी पदवी प्रदान करून गौरविण्यात आले आहे



भीमराव बाळगे



इक्बाल शेख

बाळगे व शेख गेले ३५ वर्षापासून सोलापूर शहर व जिल्ह्यासह संपूर्ण म हाराष्ट्रात कराटे, किकबॉक्सिंग, सिकई, युनिफाईट,बॉक्सिंग व तेंग-सुडो यासारख्या मार्शल आर्टच्या खेळाचा प्रचार व प्रसार करीत आहेत. आजतागायत सोलापूर शहर व जिल्ह्यामध्ये अनेक राज्य व राष्ट्रीय स्पर्धे चे यशस्वीरित्या आयोजन केले आहे. त्याचबरोबर नोएडा (उत्तर प्रदेश) या ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या राष्ट्रीय शालेय कराटे स्पर्धेमध्ये तसेच सोलापूर शहरामध्ये आयोजित राष्ट्रीय शालेय किकबॉक्सिंग स्पर्धा व एशियन इंडोअर गेम किक बॉक्सिंग निवड चाचणी स्पर्धेत पंच म्हणून बाळगे व शेख यांनी काम पाहिले आहे. नॅशनल कराटे फेडरेशन ऑफ इंडियाचे ते संस्थापक व संचालक आहेत मार्शल आर्ट्सच्या विविध प्रकारच्या खेळांमधून आजतागायत अनेक राज्य,राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील मुले व मुली खेळाडू घडविण्याचे काम बाळगे व शेख यांनी केले आहे

या यशाबद्दल जिल्हा ॲम्युचर स्पोर्ट्स कराटे असोसिएशचे अध्यक्ष महादेव चाकोते, आमदार सचिन कल्याणशेट्टी, डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील, उद्योजक मनीष सुरवसे, मुकुंदराव जाधव, जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे, मनपा क्रीडा अधिकारी नजीर शेख, माजी क्रीडा अधिकारी सत्यन जाधव, सुधीर लांडे, सागर कत्ते, सुरेश माळगे, शिवकुमार पाटील, गुरुराज कुलकर्णी, सुरेश पवार, रमेश बसाटे, अनुजा कुलकर्णी आदींनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# सोलापूरचा शोएब कुरेशी भगवंत श्रीचा मानकरी

■ छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त शिवराज्य सेनेची शरीरसौष्ठव स्पर्धा

■ बेस्ट पोझर आकाश वाघमारे, बेस्ट इम्प्रूव्ह वसीम पठाण



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. १८ मे-**

छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त शिवराज्य सेना आयोजित शरीर सौष्ठव स्पर्धेत खुल्या गटात सोलापूरचाच शोएब कुरेशी हा भगवंत श्री चा मानकरी ठरला. त्याला रोख रुपये ११ हजार, मानपत्र, आकर्षक सन्मानचिन्ह आणि भगवंत श्री किताब देऊन सन्मानित करण्यात आले.

या स्पर्धेत ७५ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. यावेळी शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ सचिव बापूसाहेब शितोळे, प्रशांत कथले, कृष्णराज बारबोले, डॉ. किरण देशमुख, मुज्जमिल पठाण, पंकज शिंदे, बाळासाहेब पवार, धनंजय जगदाळे, आकाश राऊत, अनिकेत भोसले, अंकुर मुळे, शिवराज्य सेनेचे संस्थापक हर्षवर्धन पाटील, प्रितम मोरे, विनोद वाणी, दीनानाथ काटकर, दिनेश नाळे, अंकुश नान्नजजकर, सचिन वायकुळे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेत एकूण ७५ हजारांची बक्षिसे, सन्मानचिन्हे व ट्रॉफी देण्यात आले. डॉ. युवराज रेवडकर (वैद्यकीय ), राजेश मुकणे (उद्योग), राम जाधव (शिवकार्य) यांना शिवगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. त्यांना सन्मानचिन्हे, शाल, श्रीफळ देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच मिलिंद सावंत (तलाठी) संजय वायकर (सनदी लेखापाल), अमृत खेडकर, माणिक हजारे, प्रकाश फुरडे , डॉ. नवदीप लोकरे (आयर्न मॅन) यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.

**विविध वजनी गटातील प्रथम चार विजेते**

५५ किलोपर्यंत : काशिनाथ देवकते, तेजस शिंदे, कृष्णा गोरदेवाले, ओंकार शिंदे. ५५ ते ६० किलो: आकाश वाघमारे, निखील सोनकांबळे, राजशेखर श्रीराम, योगेश जाधव. ६० ते ६५ किलो : जावेदअली शेख, सचिन कुर्ले, महेश पुजारी, उमेश जाधव. ६६ ते ७० किलो : वसीम पठाण, रोहित तपासे, रोहित पवार, राज प्रजापती. ७० किलो वरील : निखील चव्हाण, आर्यन शिंदे, अप्पासाहेब भुयारे. ७५ किलो वरील : शोएब कुरेशी, यशपाल वाघमारे, बसय्या मठ.

# कलबुर्गीच्या ख्वाजा बंदेनवाज क्लबची घोडदौड

**७९ वी रेल्वे स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा**

**श्री स्वामी समर्थ, ॲड. इलेव्हन संघांचेही विजय**






सोलापूर : अनिकेत गायकवाड व व्ही. नितीश यास सामनावीर पुरस्कार देताना वैभवी रावती, नेताजी घोडके, सचिन गायकवाड, विक्रांत पवार व राजा पटेल.

**सोलापूर, दि. १८ मे-**

रेल्वेच्या ७९ व्या स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेत कलबुर्गी येथील ख्वाजा बंदेनवाज (केबीएनसीसी) क्रिकेट क्लबने दोन विजय मिळवित विजयी घोडदौड कायम ठेवली आहे. अन्य सामन्यात श्री स्वामी सम र्थ क्रिकेट क्लब व ॲड. इलेव्हन या संघांनीही शानदार विजय नोंदवले.



श्रेयस मालप

येथील रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात झालेल्या सोमवारी झालेल्या सामन्यात श्री स्वामी समर्थ क्लबने सिटी टायटन्स क्लबचा ६४ धावांनी पराभव केला. दुसऱ्या सामन्यात कलबुर्गीच्या ख्वाजा बंदेनवाज (केबीएनसीसी) क्रिकेट क्लबने अभिसिद्ध क्लबवर ३ गडी राखून विजय मिळविला. रविवारी झालेल्या सामन्यात ॲड. इलेव्हन संघाने अभिषेक क्रिकेट क्लबला ३४ धावांनी नमविले. दुसऱ्या सामन्यात ख्वाजा बंदेनवाज क्लबने पॅंकर्स क्लब लातूरला तीन गडी राखून हरविले.

संकेत गायकवाड, व्ही. नितीश, श्रेयस मालप व रितेश वाडेकर हे सामन्याचे मानकरी ठरले. त्यांना वैभवी रावती, नेताजी घोडके, सचिन गायकवाड, विक्रांत पवार, राजा पटेल यांच्या हस्ते सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. या साम न्यासाठी प्रवीण कुलकर्णी, सोहेल शेख, अनिल सलगर आणि चिराग शहा, चंद्रकांत मंजिली व सोहेल शेख, अनिल सलगर आणि अशोक डोंबाळे यांनी पंच म्हणून तर सचिन गायकवाड व शुभम म तुर यांनी गुणलेखक म्हणून जबाबदारी सांभाळली.

**संक्षिप्त धावफलक :**

**श्री स्वामी समर्थ क्लब** : २० षटकांत सर्वबाद १६५ (ऋषी येणारे ५०, अवि फटाटे ३७, संकेत गायकवाड, २८, चेतन पवार ३ बळी, अण्णा पानसे, दीपक काटेवाले व शैलेश कोळी प्रत्येकी १ बळी) **विजयी विरुद्ध सिटी टायटन्स** : १२.२ षटकांत १०३ (दीपक काटेवाले २८, सरफराज शेख १४, विठ्ठल गुंठे ३ बळी, संकेत गायकवाड आणि जफर अत्तर प्रत्येकी २ बळी)

**अभिसिद्ध क्रिकेट क्लब** : १६.४ षटकांत ११९ (प्रेम राठोड २८, निलेश गायकवाड २७, बिरोबा सलगर १८, नितीशने ३, सईद जागीदार व सुहान प्रत्येकी २ बळी) **पराभूत विरुद्ध ख्वाजा बंदेनवाज क्रिकेट क्लब** : १७.३ षटकांत ७ बाद १२३ ( नतीश व्ही. ४०, केदार एन. २८, अजय माळी, बिरोबा सलगर व नितीन गायकवाड प्रत्येकी २ बळी)

**ॲडव्होकेट इलेव्हन** : २० षटकांत ७ बाद १६८ (कुणाल तुपापुरे ३६, प्रवीण ननवरे ३०, सागर स्वामी २३, कृष्णा कुलकर्णी २, अतुल परदेशी व मुकुंद वाघमारे प्रत्येकी १ बळी) **विजयी विरुद्ध अभिषेक क्रिकेट क्लब** : १८ षटकांत १३४ (सुगंधराज कुलकर्णी ४२, अतुल परदेशी २६, शिरीष जगताप, श्रेयस मालप व विवेक वेलान प्रत्येकी २ बळी, सुशांत, ओम आणि चिन्मय प्रत्येकी १ बळी).

**पॅंकर्स क्लब लातूर** : १७ षटकांत सर्व बाद १०६ ( शफीन शेख २१, वेदांत गिरी १९, साक्षी शिंदे १३, इब्राहिम जुनेद व रितेश वाडेकर प्रत्येकी ३ बळी, भुवनेश्वर आणि वाहिद यांनी प्रत्येकी १ बळी) **पराभूत विरुद्ध ख्वाजा बंदेनवाज संघ** : १७ षटकांत ७ बाद ११० (रितेश वाडेकर ४३, कैफ शेख ३३, श्रेयस माळीने ३, माऊली २ बळी).


**आजचे सामने**

✻ **सकाळी** : न्यू लाईफ विरुद्ध मॉडेल क्रिकेट ॲकॅडमी ✻ **दुपारी**: साऊथ सोलापूर आपटे ग्रुप विरुद्ध स्पोर्ट्स प्रमोटिव्ह पंढरपूर

### सोलापूरचे आयकर अधिकारी मनीष रावत यांची आंतरराष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. १८ मे -**

येथील सेंट जोसेफ हायस्कूलचे माजी विद्यार्थी आणि सध्या सोलापूरमध्ये आयकर अधिकारी म्हणून कार्यरत असलेले उत्कृष्ट टेबल टेनिसपटू मनीष रावत यांची आंतरराष्ट्रीय स्तरावर निवड झाली आहे. दक्षिण कोरिया येथे ६ जूनपासून सुरू होणाऱ्या आंतरराष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेत ते भारताचे प्रतिनिधित्व करणार आहेत. २०२५ मध्ये झालेल्या राष्ट्रीय मानांकन टेबल टेनिस स्पर्धेत मनीष रावत यांनी अत्यंत चमकदार कामगिरी केली होती. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत त्यांची या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. त्यांचे सोलापूर जिल्हा टेबल टेनिस संघटनेचे अध्यक्ष डॉ. राजीव प्रधान, सचिव झेड. एम. पुणेकर आणि डॉ. नितीन तोष्णीवाल यांच्यासह जिल्ह्यातील क्रीडाप्रेमींनी अभिनंदन केले असून, आगामी आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील यशासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

### विवाहितेचा छळ; पतीसह सासू-सासऱ्यांवर गुन्हा

**बार्शी, दि १८ मे-**

विवाहानंतर चारित्र्यावर संशय घेऊन मानसिक व शारीरिक छळ केल्याप्रकरणी विवाहितेच्या तक्रारीवरुन पती, सासू आणि सासऱ्यांविरोधात बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. प्रियांका घोंगडे (वय ३२, रा. हनुमान मंदिर, शिंदे ज्वेलर्ससमोर, बार्शी) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. त्यांचा विवाह रोहित राजेंद्र घोंगडे यांच्यासोबत दि. २८ मार्च २०२६ रोजी आळंदी, पुणे येथे नोंदणी पद्धतीने झाला. विवाहानंतर त्या पतीसह सासू-सासऱ्यांसोबत बार्शी येथे राहत होत्या. सुरुवातीला काही दिवस व्यवस्थित वागणूक मिळाल्यानंतर पती, सासू आणि सासरे यांनी घरगुती कारणे तसेच चारित्र्यावर संशय घेत वारंवार शिवीगाळ, दमदाटी व मानसिक त्रास देण्यास सुरुवात केल्याचा आरोप फिर्यादीत केला आहे. दि.१७ मे रोजी सायंकाळी तांदूळ साफ करत असताना काही तांदूळ सांडल्याच्या कारणावरुन सासू सुनंदा राजेंद्र घोंगडे यांनी शिवीगाळ केली. केसाला धरुन गळा दाबत मारहाण केल्याचा आरोप केला आहे. तसेच तुला नांदवायचे नाही, येथून निघून जा, असे म्हणत दमदाटी केली. सासरे राजेंद्र घोंगडे यांनीही शिवीगाळ करुन चापट मारली. पती रोहित घोंगडे यानेही मारहाण करण्यास प्रवृत्त करत नांदवायचे नाही असे म्हटल्याचा आरोप तक्रारीत केला आहे. या प्रकरणी पोलिस तपास करत आहेत.



### दहावीच्या वर्गाला १ लाख १५ हजार रुपयांचा दिला डिजिटल बोर्ड

**सोलापूर, दि. १८ मे-**

तब्बल ३३ वर्षानंतर न्यू हायस्कूल वडाळा या शाळेतील १९९२-९३ च्या दहावीच्या बॅचचा स्नेह मेळावा सोमवारी (दि.१८) झाला. या माजी विद्यार्थ्यांनी दहावीच्या वर्गाला एक लाख पंधरा हजार रुपये किंमतीचा डिजिटल बोर्ड भेट दिला आणि एक नवा आदर्श निर्माण केला. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बळीराम साठे होते. प्रमुख पाहुणे म्हणून न्यू हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वैशाली साठे, माजी प्राचार्य सुधीर पवार, चंद्रकांत साठे उपस्थित होते. मेळाव्यासाठी नाशिक विभागाचे कामगार उपायुक्त विकास माळी, लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्थेच्या सरव्यवस्थापिका अलका देवडकर, मोहोळ पंचायत समितीचे विस्तार अधिकारी नागेश कांबळे, प्रा. वीरेंद्र निकम, संतोष गाडे, हरी घाडगे, मनोज साठे, मोहन लामकाने, राजेंद्र ढवण, विलास साठे, वैशाली देशमुख, कृष्णा गायकवाड यांच्यासह तत्कालिन सर्व माजी विद्यार्थी उपस्थित होते. बऱ्याच माजी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील अनेक गंमती जमती सांगितल्या. या बॅचमधील सर्व विद्यार्थी चांगल्या पदावर काम करतात. कोणी वर्ग एक, कोणी वर्ग दोनचे अधिकारी आहेत. प्राध्यापक, विस्तार अधिकारी, शिक्षक, वकील, कोणी कंपनीत, कोणी उत्कृष्ट व्यवसाय, कोणी उत्कृष्ट शेतकरी, पशुपालक असल्याचे पाहून समाधान वाटत असल्याचे मत बळीराम साठे यांनी व्यक्त केले. मेळाव्याचे औचित्य साधून न्यू हायस्कूल वडाळा या शाळेस डिजिटल बोर्ड देण्यात आला. शाळेत आवश्यक असणाऱ्या अन्य गोष्टींसाठी मदत करण्याचेही ठरवले. चालू वर्षी इयत्ता दहावीमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवलेली विद्यार्थिनी अनुष्का जमदाडे हिला पाच हजार रुपयांचे पारितोषिक व द्वितीय क्रमांक आलेली अक्षता ढवण हिस तीन हजार रुपयाचे, वेदिका मोहिते हिला तृतीय क्रमांक आल्याबद्दल दोन हजार रुपयाचे बक्षीस देण्यात आले. प्रास्ताविक अनंत शितोळे यांनी, आभार प्रदर्शन तनुजा इंगळे यांनी तर सूत्रसंचलन प्रशांत राजपूत यांनी केले.



### दहावी परीक्षेतील यशाबद्दल सृष्टी पटणे हिचा एस.व्ही.सी.एस. प्रशालेत सत्कार

**सोलापूर, दि. १८ मे-**

मार्च २०२६ मध्ये झालेल्या माध्यमिक शालांत परीक्षेत सृष्टी मल्लिनाथ पटणे हिने ९६ टक्के गुण मिळवून प्रशालेत द्वितीय क्रमांक मिळविला. याबद्दल मुख्याध्यापक राम ढाले यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. यावेळी कर्नाटक फाऊंडेशन या संस्थेच्या वतीनेही सृष्टीचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपमुख्याध्यापक झाडे, पर्यवेक्षक वांगीकर, प्रशालेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालकवर्ग व कर्नाटक फाऊंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### चंद्रकांत गुरव

**सोलापूर, दि. १८ मे-**



चंद्रकांत (आप्पा) शंकर गुरव यांचे वयाच्या ८४ व्या वर्षी वार्धक्याने दि. १८ मे रोजी सकाळी निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, एक मुलगा, सुना, नातवंडे असा परिवार आहे. मोदी स्मशानभूमी येथे त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. दै. 'तरुण भारत'चे उपसंपादक यशवंत गुरव यांचे ते आजोबा होत.

## विधानपरिषद निवडणूक

# 'सोलापूर'च्या उमेदवारीविषयी भाजपकडून चाचपणी

## शशिकांत चव्हाण की प्रशांत परिचारक? कोणाला मिळणार संधी

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १८ मे-**

अनेक वर्षे प्रलंबित राहिलेल्या सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीची अखेर घोषणा झाली. आता जिल्ह्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापले आहे. भाजपकडून माजी आमदार प्रशांत परिचारक आणि भाजप जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण ही दोन नावे आघाडीवर असल्याचे चित्र आहे. त्यामुळे ज्येष्ठ नेत्याला की संघटनेतील नेत्याला कोणाला संधी मिळणार याची चर्चा कार्यकर्त्यांमध्ये सुरु झाली आहे.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात आवश्यक मतदारसंख्या उपलब्ध नसल्यामुळे ही निवडणूक वारंवार लांबणीवर पडली होती. मात्र यंदा जिल्हा परिषद, नगरपालिका आणि महानगरपालिका निवडणुकांनंतर मतदारसंघाची आवश्यक रचना पूर्ण झाल्याने निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे आता भाजपसाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची बनली आहे. भाजपमध्ये सध्या अनेक इच्छुकांची नावे चर्चेत असली तरी अंतिम फेरीत प्रशांत परिचारक आणि शशिकांत चव्हाण यांच्यातच खरी स्पर्धा



असल्याचे मानले जात आहे. प्रशांत परिचारक हे जिल्ह्याच्या राजकारणातील प्रभावी आणि अभ्यासू नेतृत्व म्हणून ओळखले जातात. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी मी माझ्या कार्यकर्त्यांना कुणाच्याही दावणीला बांधणार नाही, अशी भूमिका त्यांनी घेतली होती. त्यामुळे ते विधानसभा आखाड्यात उतरणार अशी चर्चा होती. मात्र पक्ष नेतृत्वाने त्यांची समजूत काढल्यावर माघार घेतली. त्यावेळी विधान परिषद उमेदवारी हीच त्या तडजोडीचा भाग आहे का, यावर चर्चा सुरू आहे.



### पालकमंत्री गोरे यांच्या भूमिकेकडे लक्ष

संपूर्ण प्रक्रियेत पालकमंत्री जयकुमार गोरे यांची भूमिका निर्णायक मानली जात आहे. जिल्ह्यातील नव्या भाजप संघटनेचे शिल्पकार म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. त्यामुळे ते कोणत्या नावाला पसंती देतात, यावरच उमेदवारीचे अंतिम चित्र ठरण्याची शक्यता राजकीय वर्तुळातून व्यक्त होत आहे.

दुसरीकडे शशिकांत चव्हाण यांनी सामान्य कार्यकर्त्यापासून जिल्हाध्यक्षपदापर्यंतचा प्रवास केला. संघटनात्मक पातळीवर स्वतःची मजबूत ओळख निर्माण केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आघाडीऐवजी भाजपच्या चिन्हावर निवडणूक लढवण्याची भूमिका त्यांनी सुरुवातीपासून ठामपणे मांडली. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनीही त्यास समर्थन दिले. परिणामी जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगरपालिका आणि महानगरपालिकांमध्ये भाजपला ऐतिहासिक यश मिळाले. त्यामुळे यशस्वी संघटन नेतृत्वाला आता विधान परिषदेत संधी मिळणार का? असा सवाल कार्यकर्त्यांतून उपस्थित होत आहे.

भाजपमध्ये अलीकडे काही नवे चेहरेही दाखल झाले असले तरी पक्ष एवढ्या महत्त्वाच्या निवडणुकीत नवख्या चेहऱ्यावर विश्वास दाखवेल का, याबाबत साशंकता आहे. कारण २०२९ च्या राजकीय समीकरणांचाही विचार पक्षाला करावा लागणार आहे. पक्षाकडून गोपनीय सर्वेक्षण सुरू असल्याचीही चर्चा आहे. मतदारसंघातील स्थानिक संस्थांमधील राजकीय समीकरणे, मतदारांमधील स्वीकारार्हता, आगामी विधानसभा निवडणुकांवरील परिणाम आणि संघटनात्मक ताकद या सर्व बाबींचा अभ्यास करूनच अंतिम निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे.

# महाराष्ट्रातील युवा आता नव्या दिशेने



### कृष्णराज महाडिक; भाजयुमो युवाशक्ती जागर यात्रेनिमित्त बार्शीत मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १८ मे-**

महाराष्ट्र प्रदेश भाजप युवा मोर्चाच्यावतीने आयोजित युवाशक्ती जागर यात्रेनिमित्त बार्शी येथे युवकांशी संवाद मेळावा पार पडला. यावेळी प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी, महाराष्ट्रातील युवा आता नवीन दिशेने चालणार असून युवकांना योग्य दिशा, संधी आणि नेतृत्व देण्यासाठीच ही युवाजागर यात्रा सुरू केल्याचे सांगितले.

यावेळी स्पर्धा परीक्षेतील गुणवंत व पोलिस भरतीतील गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. महाडिक म्हणाले की, ' युवकांचे शिक्षण, रोजगार, आरोग्य, पर्यावरण तसेच विविध सामाजिक प्रश्न आणि त्यांच्यासमोरील आव्हाने समजून घेतल्याशिवाय त्यावर प्रभावी उपाययोजना होऊ शकत नाहीत. त्यामुळे युवकांशी थेट संवाद साधत त्यांचे विचार आणि अपेक्षा जाणून घेण्याचे काम या यात्रेमधून सुरु आहे.

मेळाव्यात महाडिक यांनी रणवीर राऊत यांच्या कार्याचे विशेष कौतुक केले. मी तुमचा प्रामाणिक मित्र म्हणून आलो असून युवकांसोबत खांद्याला खांदा लावून काम करणार असल्याची ग्वाही दिली.

मेळाव्यात भाजयुमोच्या नव्या पदाधिकाऱ्यांची नियुक्त्या करण्यात आल्या. प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांच्या हस्ते नव्या पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्रांचे वितरण करण्यात आले.

मेळाव्यास जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, उपनगराध्यक्ष रोहित पाटील, वैरागचे नगरसेवक शाहूराजे निंबाळकर, उपसभापती बाबासाहेब गायकवाड, दीपक रोंगे, किरण घुले, मदन दराडे, दशरथ पप्पू टेकाळे, भैय्या वाणी, अमोल डिसले, राहुल कांबळे, केदार सोनू पवार, विराज राऊत, महेश गोरे, अमोल पवार आदी उपस्थित होते. बार्शी शहर व तालुक्यातील युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

### लोकसभेसाठी आजपासूनच कामाला : रणवीर राऊत

भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष रणवीर राऊत यांनी २०२९ च्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर, माढा आणि धाराशिव लोकसभा मतदारसंघात भाजयुमो अधिक सक्षम करण्यासाठी आजपासूनच कामाला सुरुवात करत आहे. युवा जागर यात्रेमुळे आम्हाला नवी प्रेरणा मिळाली असून भविष्यात पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्नशील राहू, असे सांगितले.

# शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपये थकविलेल्या 'त्या' कंपनीवर कारवाई करा : कोकाटे

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १८ मे-**

टेंभुर्णी एमआयडीसीतील एका कंपनीकडून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर पैसे थकवल्याचा आरोप होत आहे. संबंधितांवर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी शिवसेना नेते संजय कोकाटे यांनी प्रशासनाकडे केलीआहे.

टेंभुर्णी, माढा, करमाळा, माळशिरस व इंदापूर परिसरातील केळी उत्पादक शेतकऱ्यांकडून वेंडरमार्फत उधारीवर केळी खरेदी करून परदेशात निर्यात करण्याचा संबंधित कंपनीचा व्यवसाय आहे. यासाठी स्थानिक सुशिक्षित बेरोजगारांना वेंडर म्हणून कामाला लावले आहे. शेतातून केळी काढणे व बॉक्स पॅकिंग करून कंपनीला पुरवठाचे काम त्यांच्याकडून करून घेतले जाते. मात्र, कंपनी व वेंडर यांच्यात कोणताही लेखी करार नसल्याचा आरोप आहे.

निवेदनानुसार, कंपनी आवश्यकतेपेक्षा जास्त वेंडर तयार करून त्यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर खरेदी करते. नंतर त्यांच्यामार्फत शेतकऱ्यांचे पैसे थकवते. अलीकडे सुमारे २५ वेंडरनी कोकाटे यांच्याकडे तक्रार केली असून, विविध वेंडरमार्फत शेतकऱ्यांचे सुमारे २०० कोटी रुपयांपर्यंत देणे थकले असल्याचा दावा केला आहे.

मागील तीन ते चार महिन्यांपासून देयके न मिळाल्याने शेतकरी व वेंडर दोघेही आर्थिक अडचणीत सापडले आहेत. एका बाजूला शेतकरी पैशासाठी सर्व वेंडरकडे पाठपुरावा करत आहेत, तर दुसऱ्या बाजूला कंपनीकडून पैसे मिळत नसल्याने वेंडर असलेल्या युवकांवर मोठा मानसिक ताण निर्माण झाला आहे. काहींवर आत्महत्येची वेळ येत असल्याचा गंभीर आरोपही निवेदनात केला आहे.


कंपनी जुने वेंडर युवकांचे पैसे न देता नवीन वेंडर तयार करून अधिक खरेदी करत असल्याचा आरोप करत, शेवटी मोठी थकबाकी ठेवून कंपनी येथून निघून जाण्याची शक्यता व्यक्त केली आहे. कंपनीची मालमत्ता मर्यादित असून, बँकांचे कर्ज आणि शेतकऱ्यांचे मोठे देणे यामध्ये तफावत असल्याचेही नमूद केले आहे. या पार्श्वभूमीवर संजय कोकाटे यांनी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून कंपनीकडून थकीत देयके वसूल करावीत, तोपर्यंत नवीन केळी खरेदी थांबवावी आणि संबंधितांवर फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

३१ तारखेपर्यंत देणे न दिल्यास कंपनीला खरेदी-विक्री करू देणार नाही, तसेच कोल्ड स्टोरेजमधील माल बाहेर जाऊ देणार नाही, असा इशारा दिला आहे. कोकाटे यांच्या मागणीमुळे परिसरातील केळी उत्पादक व संबंधित कंपनीचे वेंडर यांना दिलासा मिळाला असून कंपनीवर कारवाईची आशा झाली आहे.

# लोकप्रतिनिधींच्या कार्यास अधिकृतता मिळणार : महापौर

### महापालिकेत नगरसेवक - नगरसेविकांना ओळखपत्र व बिल्ल्यांचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मे-**



महानगरपालिकेच्या वतीने आज महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत नगरसेवक व नगरसेविकांना अधिकृत ओळखपत्र तसेच बॅच बिल्ल्यांचे वितरण केले. नगरसेवकांना त्यांच्या पदाची अधिकृत ओळख दर्शविणारे ओळखपत्र, बॅच बिल्ले प्रदान केले. यामुळे महानगरपालिकेच्या विविध बैठका, कार्यक्रम तसेच प्रशासकीय कामकाजामध्ये लोकप्रतिनिधींची ओळख अधिक सुलभ होणार आहे. नगरसेवक हे नागरिक आणि प्रशासन यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहेत. ओळखपत्र व बॅच बिल्ल्यांमुळे लोकप्रतिनिधींच्या कार्यास अधिकृतता व सुसूत्रता मिळणार असून नागरिकांमध्ये विश्वास अधिक दृढ होईल, असे महापौर म्हणाले. यावेळी महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी तसेच नगरसेवक उपस्थित होते.

# 'पंचशतावरी'ने कोरड्या विहिरीत अखंड पाण्याचा प्रवाह

### माणगंगा भ्रमणसेवा संस्थेसह दोन संस्थांचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा । दिपक भाकरे**
**सांगोला,दि.१८ मे -**

माणगंगा भ्रमणसेवा संस्था वाढेगाव, श्री बृहत भारत समाज सेवा संस्था मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने राबवलेल्या पंचशतावरी जलसंवर्धन प्रकल्प राबवला होता. त्यातून शेतकऱ्यांच्या शेतातील कोरड्या विहिरीला अखंड पाण्याचा प्रवाह सुरु झाला आहे.

डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान तसेच मेडशिंगी व वाढेगावचे ग्रामस्थ यांच्या सहकार्याने लोकसहभागातून २०२५ मध्ये जागतिक जलसंवर्धन पंधरवड्यानिमित्त अप्रुका नदीवरील सिमेंट बंधाऱ्यावर पंचशतावरी जलसंवर्धन प्रकल्प राबवला होता. या प्रकल्पामुळे प्रकल्पापासून २०० फूट अंतरावर दादासाहेब सोनलकर यांचे शेतात



पाषाणात असणाऱ्या ८० फूट खोली व ३० फूट व्यासाच्या ५ वर्षापासून कोरड्या असलेल्या विहिरीच्या पाषाणातून अखंड पाण्याचा प्रवाह सुरू झाला आहे. निर्मितीपासून कोरड्या असणाऱ्या विहिरीत स्वच्छ भरलेले पाणी पाहून शेतकऱ्यातून या पंचशतावरी प्रकल्पाचे कौतुक होत



आहे. प्रकल्पामुळे परिसरात असणाऱ्या ५ ते ६ विहिरीच्या पाणीसाठ्यात चांगल्या पद्धतीने वाढ झालेली आहे.

जि.प.सदस्य अतुल पवार यांच्या सहयोगातून बांधलेल्या सिमेंट नाल्याच्या पाणीसाठाक्षेत्रात १००-१०० फूट खोल बोअरिंग मशीनच्या सहाय्याने ५ कुपनलिका खोदून त्यामध्ये ७-८ फूट उंचीच्या जमिनीच्या पृष्ठभागावर दोन ते अडीच फूट उंच राहतील, अशा केसिंग पाईप लावल्या. त्या पाईपला छोटी छिद्रे पाडून त्यामध्ये खडे, गाळ जाऊ नये म्हणून पाईपला वायरचे कापड गुंडाळले. तसेच पाईपवरील तोंडावर झाकण लावून त्या झाकणाला छिद्रे पाडून त्यावर वायरचे कापड गुंडाळले. नंतर पाईपभोवती ५ फूट लांब, ५ फूट रुंद व ५ फूट खोलीचे खड्डे घेऊन ते खड्डे छोटी खडी, मध्यम खडी व दगड असे थर देऊन खड्डे बुजवले. मे २०२५ मध्ये पाऊस होऊन सिमेंट बंधाऱ्यात साठलेले पाणी त्या पाचही होल मधून शंभर फूट भूगर्भात जाऊन पाझराद्वारे परिसरात गेले. आसपासच्या विहिरीच्या पाणी साठ्यात वाढ झाली. ८० फूट खोलीची मोठी विहीर पाडल्यापासून एक मुशी पाषाण दगड लागल्याने विहिरीत एक थेंबही पाणी येत नव्हते. परंतु या प्रकल्पामुळे पाझराद्वारे मोठ्या प्रमाणात स्वच्छ पाणी विहिरीत साठत असल्याचे शेतकरी दादासाहेब सोनलकर यांनी सांगितले. या कामासाठी तालुका कृषी अधिकारी दीपाली जाधव, डॉ.आनंद भिंगे, डॉ.मच्छिंद्र सोनलकर, सुहास बाजारे यांचे सहकार्य लाभले.

### या वर्षात दोन ठिकाणी प्रयोग राबवणार

संस्थेच्या माध्यमातून तालुक्यातील माण नदी पात्र स्वच्छ केले आहे. त्यामध्ये काही प्रमाणात पाणी टिकले तर वृक्षवेली, पशुपक्षी यांचे अस्तित्व राहील. त्याचा पर्यावरणाला उपयोग होईल. या हेतूने आमच्या संस्थेने जलसंधारणाचे नवीन अभियान राबवले व त्याचे सकारात्मक परिणाम दिसले. या वर्षात दोन ठिकाणी प्रयोग राबवणार आहोत.

**-वैजिनाथ घोंगडे, अध्यक्ष, माणगंगा भ्रमणसेवा संस्था.**

## महत्वाचे...

### 'बीआरडीएस'च्या १८ विद्यार्थ्यांचे फॅशन टेक्नॉलॉजी निफ्ट परीक्षेत यश

**सोलापूर, दि. १८ मे-**

डिझाईन क्षेत्रातील देशातील सर्वोच्च संस्था मानल्या जाणाऱ्या 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी' प्रवेश परीक्षेत सोलापूरच्या 'बीआरडीएस' संस्थेच्या विद्यार्थ्यांनी यशाचा नवा उच्चांक प्रस्थापित केला आहे. फेब्रुवारी २०२६ मध्ये झालेल्या प्रवेश परीक्षेत संस्थेच्या २० पैकी तब्बल १८ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवत दुसऱ्या टप्प्यातील 'सिच्युएशन टेस्ट'साठी आपली निवड निश्चित केली आहे. या परीक्षेत श्रावणी अंबुरे, स्मृती जाजू, दिविजा भानप, समीक्षा मोटगी, आरुषी राचेती, श्रेया कोरे, तेजस्विनी देशमुख, सौम्या कोल्हापुरे, साई कुलकर्णी, साक्षी हिंदोळे, प्रसन्न बडगु, अयान शेख, अमृता दळवी, मेघना गवळी, समृद्धी इंगळे, तनिष्का बालदवा, ओमसाई बराड आणि ऋषिकेश गंगनावर या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. सात रस्ता परिसरातील बीआरडीएस सोलापूर केंद्राने यापूर्वीही ३० हून अधिक विद्यार्थ्यांना भारतातील विविध निफ्ट महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळवून दिला आहे. केंद्राचे प्रमुख धर्मेश टंक यांच्या मार्गदर्शनाखाली यंदाही ९० टक्के निकाल लागला असून, यशस्वी विद्यार्थ्यांची आता एप्रिलमध्ये होणाऱ्या दुसऱ्या टप्प्यातील परीक्षेसाठी तयारी सुरू झाली आहे.






### 'लोकमंगल महाविद्यालय'चे रानमसले येथे प्लास्टिकमुक्त परिसर अभियान

**सोलापूर, दि. १८ मे-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून समृद्ध गाव योजनेंतर्गत मौजे रानमसले, ता. उत्तर सोलापूर येथे प्लास्टिकमुक्त परिसर अभियान राबविले. या उपक्रमांतर्गत रासेयो स्वयंसेवकांनी रानमसले येथील श्री ब्रह्मगायत्री मंदिर परिसरात स्वच्छता केली तसेच मंदिर परिसरातील प्लास्टिक गोळा केले. त्याचबरोबर त्यांनी मंदिरा परिसरात चाफ्याच्या दोन झाडांचे वृक्षारोपण केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. आशिष सरकाळे व प्रा सायली बडेकर तसेच सर्व स्वयंसेवक उपस्थित होते. या उपक्रमासाठी सरपंच मनोहर क्षीरसागर व उपसरपंच रमेश सुतार तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या अभियानासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन तसेच संस्थेचे अध्यक्ष रोहन देशमुख व सचिव डॉ.अनिता ढोबळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# महापालिकेच्या स्टोअरमधून भंगार चोरीचा प्रयत्न

**नगरसेवक अमोल शिंदे यांच्या सतर्कतेने प्रकार उघड**

**सभागृह नेते नरेंद्र काळे, अन्य नगरसेवक, अधिकारी घटनास्थळी**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ मे-**

सोलापूर महापालिकेच्या मागील गेटजवळील स्टोअर रूम परिसरातून भंगार चोरीचा प्रकार उघडकीस आला असून हा प्रकार शिवसेना शिंदे गटाचे नगरसेवक अमोल शिंदे यांनी उघडकीस आणला. या प्रकारामुळे महापालिका परिसरात मोठी खळबळ उडाली. याप्रकरणी संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. महापालिका इमारतीच्या मागील बाजूस असलेल्या स्टोअर रूममधून भंगार एका खासगी गाडीमधून घेऊन जाताना नगरसेवक अमोल शिंदे यांनी आज दुपारी पकडला. त्यानी तात्काळ सभागृह नेते नरेंद्र काळे, महापालिका अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, नगर अभियंता सारिका अकुलवार यांना फोन करून बोलावून घेतले.

यावेळी नगरसेवक सत्यजित वाघमोडे, सात्विक बडवे, विनायक विटकर, किरण पवार यांच्यासह नगरसेवक, उपअभियंता अविनाश वाघमारे, अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक जगन्नाथ बनसोडे उपस्थित होते. सर्वांनी स्टोअर मधील माल घेऊन जात असलेली छोटा हत्ती गाडीची पाहणी केली. या प्रकरणामुळे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, सभागृह नेते नरेंद्र काळे आणि नगरसेवक अमोल शिंदे चांगलेच संतापले. सदर बजार पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी आले. यावेळी सभागृह नेते नरेंद्र काळे आणि नगरसेवक अमोल शिंदे यांनी योग्य चौकशी करून गुन्हा दाखल करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

अतिक्रमण प्रतिबंधक विभागाकडून अतिक्रमित साहित्य जागेवरच निष्काशीत केले जाते. ते इथे आणले जात नाहीत. जप्त केलेले साहित्य आधार कार्ड पाहून दिले जाते. याप्रकरणी संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक जगन्नाथ बनसोडे यांनी केली. महापालिकेच्या स्टोअर रूममध्ये विविध कारवायांमधून जप्त करण्यात आलेले भंगार साहित्य जमा केले जाते. सोमवारी सकाळी एका खासगी छोटा हत्ती वाहनातून हे भंगार भरून नेले जात असल्याची माहिती एका जागरूक नागरिकाने नगरसेवक अमोल शिंदे यांना दिली. त्यानंतर शिंदे घटनास्थळी पोहोचले असता वाहनात भंगार भरले जात असल्याचे दिसून आले. यावेळी संबंधित वाहन चालकासह भंगार भरत असलेले चार जण आणि काही कर्मचारी घटनास्थळावरून पसार झाल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणात महापालिकेतील काही कर्मचाऱ्यांचा सहभाग असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

### साहित्य चोरीला जाणे ही अत्यंत लाजिरवाणी बाब

याबाबत बोलताना नगरसेवक अमोल शिंदे म्हणाले, महापालिकेच्या स्टोअरमधील भंगार खासगी वाहनातून बाहेर नेले जात होते. आम्ही घटनास्थळी पोहोचताच संबंधित चार जण आणि काही कर्मचारी पळून गेले. परवानगी नसताना अशा पद्धतीने महापालिकेचे साहित्य चोरीला जाणे ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. संबंधितांवर तात्काळ गुन्हा दाखल करून कठोर कारवाई झाली पाहिजे.

### सखोल चौकशी करून संबंधितांवर गुन्हे दाखल करा

सभागृह नेते नरेंद्र काळे यांनीही या घटनेला गंभीर स्वरूपाचे प्रकरण असल्याचे सांगितले. स्टोअरमधील स्क्रॅप खासगी वाहनातून नेताना पकडण्यात आले. वाहन, चालक आणि स्क्रॅप जागेवर आढळले. काही कर्मचारी घटनास्थळावरून पळून गेले. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि आर्थिक व्यवहारात सहभागी असणाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत. कुणाचीही गय केली जाऊ नये, अशी मागणी त्यांनी केली.तसेच, स्टोअर परिसरातील सीसीटीव्ही फुटेज जप्त करून तपास करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्याचेही काळे यांनी सांगितले.

# महापालिका क्षेत्रात पहिल्या टप्प्यात सुमारे १ लाख पुस्तके दाखल

**समग्र शिक्षा योजनेंतर्गत बालभारतीकडून पुरवठा सुरू**

**३२६ शाळांमधील ७२ हजारहून अधिक विद्यार्थ्यांना होणार लाभ**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ मे-**

समग्र शिक्षा अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या मोफत पाठ्यपुस्तक योजना सन २०२६-२७ चा सोलापूर महानगरपालिका क्षेत्रात प्रारंभ झाला. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती), पुणे यांच्याकडून पहिल्या टप्प्यातील १ लाख पाठ्यपुस्तके सोलापूर मनपा मराठी केंद्र शाळा क्रमांक ६ येथे पोहोचली आहेत.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच विद्यार्थ्यांच्या हातात पुस्तके पडावीत या दृष्टीने प्रशासनाने वेगाने पावले उचलली आहेत. सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, महापालिकेचे मुख्य लेखा अधिकारी तथा नियंत्रण अधिकारी डॉ. रत्नराज जवळगेकर, प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी मल्हारी माने यांच्या नियंत्रणाखाली ही मोहीम राबवली जात आहे.

चालू शैक्षणिक वर्षात मनपा क्षेत्रात इयत्ता १ ली ते ८ वीच्या एकूण ७२ हजार ३६३ लाभार्थी विद्यार्थ्यांची नोंद झाली आहे. या सर्व विद्यार्थ्यांसाठी एकूण ४ लाख ५० हजार ९८० पुस्तकांची मागणी नोंदवण्यात आली होती. त्यापैकी पहिल्या टप्प्यात सध्या ९५ हजार ते १ लाख पुस्तके प्रशासनाला प्राप्त झाली असून, उर्वरित पुस्तकेही लवकरच उपलब्ध होणार आहेत.

सोलापूर शहरातील मनपा आणि खाजगी अनुदानित अशा एकूण ३२६ शाळांमधील विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. माध्यमनिहाय शाळांची संख्या अशी : मराठी माध्यम: २१८ शाळा, उर्दू माध्यम: ५२ शाळा, कन्नड माध्यम: १४ शाळा, तेलुगू माध्यम: ०३ शाळा, हिंदी माध्यम: ०२ शाळा, इंग्रजी माध्यम: ०२ शाळा, एकूण: ३२६ शाळा.

### अल्पवयीन माता नोंदणी; आशा सेविका, कर्मचाऱ्यांना येताहेत धमक्या

**सोलापूर, दि.१८ मे-**

महाराष्ट्र आरोग्य विभागाच्या वतीने राज्यभरात अल्पवयीन माता शोधण्याचे व त्यावर नियंत्रण आणण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून, या मोहिमेत कार्यरत असलेल्या आशा वर्कर्स, आरोग्य सेविका आणि इतर कर्मचाऱ्यांना धमक्या दिल्या जात असल्याचा आरोप करत संबंधितांवर गुन्हा दाखल करावा. नावे गोपनीय ठेवण्यात यावी अशी मागणी लाल बावटा आशा वर्कर्स संघटनेतर्फे महापालिका आरोग्य अधिकारी यांच्याकडे केली आहे.

राज्य शासनाने अल्पवयीन मातांच्या घटनांवर निर्बंध आणण्यासाठी विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत. त्याअंतर्गत आशा सेविका व आरोग्य कर्मचारी माहिती संकलनाचे काम करत आहेत. मात्र, नावासह माहिती गोपनीय ठेवणे बंधनकारक असतानाही काहींकडून संबंधित अल्पवयीन मातांच्या कुटुंबीयांपर्यंत माहिती पोहोचविली जात असल्याची माहिती समोर आली. यामुळे अनेक ठिकाणी आशा सेविका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे, असेही सांगण्यात आले.

### ९.८६ कोटी मतदारांच्या घरी पोहोचणार निवडणूक यंत्रणा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि १८ मे-**

भारत निवडणूक आयोगाने देशातील १६ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये 'विशेष सखोल पुनर्रिक्षण' मोहिमेचा तिसरा टप्पा जाहीर केला आहे. या मोहिमेत महाराष्ट्राचा समावेश असून, राज्यातील सुमारे ९ कोटी ८६ लाख मतदारांच्या नोंदींची प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे.

महाराष्ट्रात विशेष सखोल पुनरिक्षण मोहीम अत्यंत व्यापक स्वरूपात राबवण्यात येणार आहे. यात राज्यातील एकूण ९,८६,४४,४१३ मतदारांच्या तपशिलाची खातरजमा मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत नियुक्त करण्यात येणार आहे. अधिकारी घरोघरी जाऊन माहिती गोळा करतील. या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी राजकीय पक्षांतर्फे नेमण्यात आलेले 'बूथ लेव्हल एजंट्स' त्यांना सहकार्य करणार आहेत. महाराष्ट्रातील ही प्रक्रिया जून महिन्यापासून सुरू होऊन ऑक्टोबरमध्ये पूर्ण होईल.

दि.२० ते २९ जून २०२६ या कालावधील बीएलओ यांना प्रशिक्षण आणि पूर्वतयारी करण्यात येईल. दि.३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत घरोघरी जाऊन भेटी देण्यात येतील. ५ ऑगस्ट २०२६ रोजी मसुदा मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल. दि.५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे-हरकती नोंदविता येतील. दि.७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादीची प्रसिध्द करण्यात येईल. सर्व राजकीय पक्षांना प्रत्येक मतदान केंद्रावर आपले एजंट नियुक्त करावेत, असे आवाहन निवडणूक आयोगाने केले आहे.

## अणदूरचे आध्यात्मिक वैभव

# श्री नीलकंठेश्वर संस्थान मठाचा प्रेरणादायी प्रवास

**श्री नीलकंठेश्वर संस्थान मठ हे महाराष्ट्रातील वीरशैव लिंगायत समाजाचे एक प्रमुख धार्मिक, शैक्षणिक आणि सामाजिक केंद्र म्हणून आज ओळखले जाते. धार्मिक परंपरा, सामाजिक बांधिलकी आणि शैक्षणिक उन्नती यांचा सुंदर संगम या संस्थानाच्या कार्यातून अनुभवायला मिळतो. वैदिक शैव परंपरेचे काटेकोर पालन करत येथे बटणा दीक्षा, विविध धार्मिक संस्कार, आध्यात्मिक मार्गदर्शन आणि समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबविले जातात.**

या मठाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे अध्यात्मासोबत समाजपरिवर्तनाची जपलेली नाळ. श्री शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी यांच्या नेतृत्वाखाली संस्थानाने गेल्या पंचवीस वर्षांत अणदूर आणि परिसरात अभूतपूर्व परिवर्तन घडवून आणले आहे. शिक्षण, संस्कार, व्यसनमुक्ती, सामाजिक सलोखा आणि धार्मिक जागृती या क्षेत्रांत त्यांनी दिलेले योगदान मोलाचे आहे. गावातील तरुणांना व्यसनापासून दूर ठेवून शिक्षणाची ओढ निर्माण करणे, धार्मिकतेतून नैतिकता रुजविणे आणि कौटुंबिक सौहार्द वाढविणे हे त्यांच्या कार्याचे मोठे फलित मानले जाते.

अणदूर गावाला लागलेले शिस्तीचे वळण आज अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. श्री शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजींच्या सततच्या मार्गदर्शनामुळे गावात अध्यात्मिक वातावरण निर्माण झाले असून धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांत गावकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून येतो. समाजातील भांडणे, कौटुंबिक हिंसाचार, व्यसनाधीनता यांसारख्या समस्यांवरही त्यांच्या विचारांचा सकारात्मक परिणाम झालेला दिसतो. एका उच्चशिक्षित, पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या व्यक्तीने सांसारिक जीवनाचा त्याग करून अध्यात्माची वाट स्वीकारणे ही स्वतःमध्ये प्रेरणादायी घटना ठरली आहे.



श्री शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी यांनी अन्नदान, ज्ञानदान, सर्वधर्म समभाव, समानतेचा संदेश आणि मानवतेची शिकवण समाजापर्यंत पोहोचवली आहे. त्यांच्या माध्यमातून अणदूर आणि परिसरातील शेकडो भाविकांना चारधाम यात्रेचे आयोजन करून आध्यात्मिक पर्यटनाची संधी मिळाली. त्यामुळे अनेकांच्या जीवनात भक्ती आणि अध्यात्माचा नवा अध्याय सुरू झाला आहे.

सध्या अणदूर येथे सुरू असलेला श्री शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजींचा पट्टाभिषेक रौप्य महोत्सव राज्यभर चर्चेचा विषय ठरला आहे. श्री शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजींचा पट्टाभिषेक रौप्य महोत्सव हा न भूतो न भविष्यती असा सोहळा १३ मे ते २० मे दरम्यान मोठ्या उत्साहात सुरू आहे. या कालावधीत अति रुद्र याग, चंडिका होम, नवग्रह पूजन, धर्मसभा, भव्य अड्डु पालखी सोहळा आणि विविध धार्मिक कार्यक्रम, महाप्रसाद, महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती, सन्मान सोहळा संपन्न होत आहेत. विशेष म्हणजे या सोहळ्यास पाच जगद्गुरूंचे आगमन ही अणदूरकरांसाठी आनंददायी अनुभव पहावयास मिळाला या महोत्सवामुळे संपूर्ण अणदूर गाव शिवमय झाले आहे.

हरिहरानंद भारती महास्वामीजी यांच्या प्रभावी शिवकथेमुळे भाविकांना शिवभक्तीचा अनोखा अनुभव लाभत आहे.यात महिलांची संख्या मोठ्या प्रमाणात दिसून येते,सुहासिनींची कुंभ मिरवणूक, सुवाद्यांसह पालखी अड्डु पालखी सोहळा, शिवपार्वती विवाह सोहळा हा लक्षवेधी ठरला आहे,घराघरासमोर रांगोळी,तोरण, अणदूरमध्ये वाढणारी गर्दी ही कुठल्याही मोठ्या सणापेक्षा कमी वाटत नाही आणि जगद्गुरूंच्या स्वागतासाठी गावात उभारलेले स्वागत फलक हे या सोहळ्याचे आकर्षण ठरत आहे.शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी यांच्या शिकवणीमुळे सर्व जाती धर्माच्या लोकांचा या सोहळ्यात सहभाग दिसून येतोय,या पट्टाभिषेक रौप्य महोत्सव समीतीचे अध्यक्ष माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली समीतीने उत्कृष्ट कार्य करीत असल्याचे निदर्शनास येते आज अणदूर हे केवळ एक गाव राहिले नसून अध्यात्म, संस्कार आणि समाजपरिवर्तनाचा आदर्श ठरले आहे. श्री नीलकंठेश्वर संस्थान मठाचे मठाधिपती श्री शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी यांच्या कार्यातून ग्रामीण भागातही आध्यात्मिक चळवळीच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडवून आणता येतो, याचा प्रत्यय येतो. शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजींचे कार्य महाराष्ट्राच्या नव्हे तर देशाच्या आध्यात्मिक इतिहासात सुवर्ण अक्षरांनी नोंदले जाईल, यात शंका नाही.

**- दयानंद काळुंके**
**पत्रकार, अणदूर**

### जिल्हा परिषद समोरच्या आंदोलकांची इतरत्र व्यवस्था करा : पृथ्वीराज माने

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मे-**

जिल्हा परिषदेच्या पहिल्या सर्वसाधारण सभेत डॉ. पृथ्वीराज माने यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर येणारे मोर्चे आणि आंदोलकांची जिल्हा परिषद ऐवजी अन्यत्र सोय करा, अशी मागणी जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.




विविध मागण्यांसाठी जुने जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद इमारती समोरील रस्त्यावर सतत आंदोलन, मोर्चे काढण्यात येत असल्याने प्रशासकीय कामास अडथळा निर्माण होतो. तसेच जिल्हा परिषदेचे एक गेट बंद करावे लागते. रस्त्यावर वाहतुक कोंडी होते. काही वाहनेही जिल्हा परिषद आवारात लावली जातात. जिल्हा परिषदेमधील कामांसाठी जिल्ह्यातील अनेक नागरिक येतात; त्यांचीही यामुळे गैरसोय होते.

आंदोलन, उपोषणे, मोर्चे काढुन अन्यायाविरुद्ध न्याय मिळवणे हा लोकशाहीचा भाग आहे याबाबत कुणाचेही दुमत नाही. मात्र जिल्हाधिकारी कार्यालय एकीकडे व आंदोलने जिल्हा परिषदेसमोर होतात. ही बाब लक्षात घेता आंदोलनास अन्यत्र सोयीची जागा देवून आवश्यक सुविधा द्याव्यात, असेही या निवेदनात नमूद आहे. यावेळी भगवान कदम, अजय सोनटक्के, उमेश भगत, सुनील जाधव आदी उपस्थित होते.










**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# महापौर कोंड्याल, उपमहापौर देवकर ई-बाईक, सभागृह नेते काळे सायकलवर

## अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे मात्र पायी आले

## महापालिका अधिकारी, कर्मचाऱ्यांचा नव्हता प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ मे-**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचत, पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत जीवनशैलीचा अवलंब करण्याबाबत केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत महानगरपालिकेच्या वतीने दर सोम वार हा दिवस 'नो व्हेईकल डे म्हणून राबविण्यात येत आहे. त्यानुसार महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर हे ई-बाईक, सभागृह नेते नरेंद्र काळे हे सायकलवर तर अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे हे चक्क पायी चालत महापालिकेत आले होते.

आखाती युध्दजन्य परिस्थितीमुळे पेट्रोल, डिझेल व इतर इंधनाचा काटकसरीने आणि गरजेपुरता वापर व्हावा, वाढते वायू प्रदूषण आणि जागतिक तापमानवाढ यावर नियंत्रण मिळवण्यासाठी सोलापूर महानगरपालिकेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून सोलापूर महानगरपालिकेतील सर्व पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी दर सोमवार हा दिवस महापौर विनायक कोंड्याल यांनी 'नो व्हेईकल डे' म्हणून घोषित केला होता.

यादिवशी खासगी तसेच शासकीय वाहनांचा वापर टाळून सार्वजनिक वाहतूक, सायकल, ई-वाहने किंवा पायी कार्यालयात येण्यास प्राधान्य देण्याचे आवाहन केले होते. ही घोषणा कृतीत उतरवत महापौर कोंड्याल हे हेल्मेट घालून ई-बाईकवरुन आले होते. त्यांच्या गाडीवर माजी नगरसेवक दीपक राजगे होते. जुनी मिल चाळ येथील निवासस्थानापासून रखरखत्या उन्हात दुपारी १२.१५ वाजता ते महापालिकेत आले.

उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर ह्या सकाळी ११.३२ वाजता ई-बाईकवरुन महापालिकेत दाखल झाल्या. सभागृहनेते नरेंद्र काळे हे सकाळी ११.२८ वाजता चक्क सायकलवरुन महापालिकेत आले होते. नगरसेवक सत्यनारायण गुर्रम, विजय चिप्पा यांनीही ई बाईकवरुन आले होते. दरम्यान, महापालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांमधून 'नो व्हेईकल डे'ला म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नसल्याचे दिसून आले.





### पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे काळाची गरज

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या संदेशानुसार आपण सर्वांनी पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे काळाची गरज आहे. 'नो व्हेईकल डे' हा उपक्रम फक्त एक दिवसापुरता मर्यादित नसून भविष्यातील पिढ्यांसाठी स्वच्छ आणि निरोगी वातावरण निर्माण करण्याचा संकल्प आहे. याद्वारे इंधन बचत, वाहतूक कोंडी कमी, वायू प्रदूषणावर नियंत्रण आणि पर्यावरणविषयक जनजागृती निर्माण होण्यास मोठी मदत होणार आहे, असे महापौर विनायक कोंड्याल यांनी सांगितले.

### एका हातात डायरी, दुसऱ्या हातात पाण्याची बाटली

पंतप्रधान नरेंद्र मोदी, महापौर विनाय कोंड्याल यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे हे आपल्या वसंत विहार परिसरातील घरापासून महापालिकेत पायी चालत आले. एका हातात डायरी आणि दुसऱ्या हातात पाण्याची बाटली घेऊन ते चालत आले होते. यानिमित्ताने त्यांनी कृतीतून इतर कर्मचारी-अधिकाऱ्यांना सकारात्मक आणि प्रेरक संदेश दिला आहे.

### जास्तीत जास्त दिवस ई-बाईकचा वापर

सोलापूर महानगरपालिकेतील ८ स्वीकृत नगरसेवक ४ इलेक्ट्रिक बाईकवरुन डबलसीट महापालिकेत दाखल झाले. रोहिणी तडवळकर, अक्षय अंजिखाने, मनीष केत, ज्ञानेश्वर म्याकल, वृषाली चालुक्य, ऋषिकेश मेहत्रे, श्रीनिवास दायमा व रुद्रेश बोरामणी यांनी यात सहभाग घेतला. फक्त सोमवारीच नव्हे, तर महिन्यातील जास्तीत जास्त दिवस ई-बाईक वापरून इंधन बचतीसाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# झेडपी अध्यक्ष एसटीने तर उपाध्यक्ष व सीईओ सायकलवर

## अतिरिक्त सीईओ इलेक्ट्रिक बाईकवर

## डेप्युटी सीईओ चालत पोहोचले कार्यालयात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ मे**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचत, पर्यावरण संवर्धन आणि प्रदूषण नियंत्रणासाठी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत सोलापूर जिल्हा परिषदेत सोम वारी 'नो व्हेईकल डे' उत्साहात पाळण्यात आला. जिल्हा परिषदेच्या पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांनी स्वतः पुढाकार घेत विविध पर्यायी वाहतुकीचा वापर करत कार्यालयात हजेरी लावली. त्यामुळे जिल्हा परिषद परिसरात दिवसभर या उपक्रमाचीच चर्चा रंगली होती.

'नो व्हेईकल डे'च्या निमित्ताने जिल्हा परिषदेची दोन्ही मुख्य प्रवेशद्वारे वाहनांसाठी बंद ठेवण्यात आली होती. सकाळी कार्यालयीन कामकाज सुरू होताच मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन आणि जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंद्रजीत पवार हे सायकलवरून जिल्हा परिषदेत दाखल झाले. वरिष्ठ अधिकारी सायकलवर आल्याचे पाहण्यासाठी कर्मचारी आणि नागरिकांनी गर्दी केली होती.

यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर हे इलेक्ट्रिक बाईकवरून कार्यालयात पोहोचले. सामान्य प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील या पायी चालत जिल्हा परिषदेत आल्या. पर्यावरणपूरक वाहतुकीचा संदेश देण्यासाठी अधिकाऱ्यांनी घेतलेला पुढाकार लक्षवेधी ठरला.

जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य यांनीही उपक्रमात सहभाग घेतला. ते आपल्या इलेक्ट्रिक बाईकवरून एसटी स्थानकापर्यंत आले आणि तेथून एसटी बसने सोलापूरकडे रवाना झाले. यावेळी त्यांच्यासोबत भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. जिल्हा परिषद सदस्य नेताजी खंडागळे हे देखील इलेक्ट्रिक बाईकवरून जिल्हा परिषदेत आले.











## ▶▶ महत्वाचे...

### सिध्देश्वर तलावात बुडून वृध्दाचा मृत्यू

**सोलापूर, दि.१८ मे-**

सोलापूरचे ग्रामदैवत श्रीसिध्देश्वर मंदिर येथील तलावात एका ७७ वर्षीय वृध्दाचा बुडून मृत्यू झाल्याची घटना रविवार, दि.१७ मे २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता घडली. जीतदास गुलाबदास पांगळ (रा.वसंत विहार, सोलापूर) असे मयत वृध्दाचे नाव आहे. रविवारी सायंकाळी तलावात पाण्यावर तरंगताना संबंधित व्यक्तीचा मृतदेह तेथील लोकांना आढळून आला. ही खबर फौजदार चावडी पोलिसांना समजजताच पोलिस हवालदार कटारे यांनी घटनास्थळी पोहोचून सदरचा मृतदेह विच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केला.




### दोन दुचाकींची धडक; एकजण जागीच ठार

**सोलापूर, दि.१८ मे-**

भरधाव वेगातील दोन दुचाकींची जोरदार धडक बसून झालेल्या अपघातात एकजण जागीच ठार झाल्याची घटना सोलापूर-अक्कलकोट महामार्गावरील वळसंग वाडा हॉटेल समोर घडली. रोहित कृष्णात जाधव (वय-३५, रा.दहिटणेवाडी, ता.अक्कलकोट) असे मयताचे नाव आहे. रविवार, दि.१७ मे २०२६ रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास सोलापूरकडून अक्कलकोटकडे भरधाव निघालेल्या दुचाकींची वळसंग वाडा हॉटेलसमोर जोरदार धडक बसली. यात एकजण जागीच मृत्युमुखी पडला. अन्य दोघे किरकोळ जखमी झाले आहेत.

# रेल्वेच्या लोगोमध्ये आता १८ तारे, हुतात्मा एक्सप्रेस मध्यरात्री १.३० वाजता आली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ मे-**


भारतीय रेल्वेच्या अधिकृत लोगोमध्ये आता १८ ताऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. पुण्याहून सोलापूरकडे येणारी हुतात्मा एक्सप्रेस ही रेल्वे शनिवारी तब्बल चार तास उशिराने आली. सोलापूर स्थानकावर रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारास येणारी ही रेल्वेगाडी मध्यरात्री १.३० वाजता आल्याने प्रवाशांतून तीव्र संताप व्यक्त करण्यात आला.

लोगोबाबत रेल्वे बोर्डाने १४ मे २०२६ रोजी सर्व झोनल रेल्वे उत्पादन युनिट्स प्रशिक्षण संस्था, रेल्वे सार्वजनिक उपक्रमांना आदेश जारी केले आहेत. दक्षिण किनारपट्टी रेल्वे ही भारतीय रेल्वेची २८ झोनल रेल्वे म्हणून कार्यान्वित होत असल्याने रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लाल रंगातील १८ तारे असलेल्या नव्या लोगोच्या वापरास मान्यता दिली. १ जूनपासून सर्व अधिकृत पत्रव्यवहार, स्टेशनरी, प्रकाशने फलक, डिजिटल प्लॅटफॉर्म, प्रसिध्दी साहित्य यांसह भारतीय रेल्वेचा लोगो वापरल्या जाणाऱ्या प्रत्येक अधिकृत ठिकाणी सुधारित लोगोचा वापर करण्यात येणार आहे. नवीन लोगो डाऊनलोड करण्यासाठी स्वतंत्र लिंकही उपलब्ध करुन देण्यात आली आहे.



दरम्यान हुतात्मा एक्सप्रेस ही रेल्वेगाडी दररोज सायंकाळी ५:५० वाजता पुणे स्थानकावरुन सुटून रात्री ९ वाजून ३० वाजेपर्यंत सोलापूर स्थानकावर पोहोचते. मात्र शनिवार, दि.१६ मे २०२६ रोजी अमरावतीहून पुण्यात येणारी हुतात्मा एक्सप्रेस मॅचिंग वेळेत न आल्याने संपूर्ण वेळापत्रक कोलमडले होते.

ही गाडी रात्री ८.३० वाजण्याच्या सुमारास पुणे स्थानकात दाखल झाली. त्यानंतर प्रवाशांना रेल्वेगाडीत बसवून हुतात्मा एक्सप्रेस रात्री ९.३० वाजता सोलापूरच्या दिशेने रवाना करण्यात आली. दरम्यान, तांत्रिक कारणामुळे हुतात्मा एक्सप्रेसला उशीर झाला असल्याचे रेल्वे प्रशासनाकडून सांगण्यात आले.




# सोलापूरच्या जनगणना कामकाजाची मुंबईच्या अधिकाऱ्यांकडून पाहणी

## पर्यवेक्षक, प्रगणकांच्या कामाचे कौतुक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मे-**

सोलापूर जिल्ह्यातील सर्व घरयादी गटांमध्ये जनगणनेचे काम सुरु आहे. मुंबई येथील जनगणना कार्यालयाचे सहसंचालक रमेश भोसले, सांख्यिकी अधिकारी जनगणना संचालनालय अजित भांड, सोलापूरचे सहाय्यक महसूल अधिकारी प्रवीण पवार यांनी सोलापूर जिल्ह्यातील विविध चार्ज कार्यालयांना भेट देऊन जनगणना कामकाजाचा आढावा घेतला.

यावेळी पंढरपूर तहसिल कार्यालय, माळशिरस तहसिल कार्यालय, अक्कलकोट तहसिल कार्यालय, उत्तर सोलापूर तहसिल कार्यालय, दक्षिण सोलापूर तहसिल कार्यालय, अक्कलकोट नगरपालिका, दुधनी नगरपालिका, मैंदर्गी नगरपालिका, पंढरपूर नगरपालिका, म्हाळुंग श्रीपूर नगरपालिका, अकलूज नगरपालिका, नातेपुते नगरपालिका, माळशिरस नगरपालिका आणि सोलापूर महानगरपालिका येथील चार्ज कार्यालयांना भेटी देण्यात आल्या.

अधिकाऱ्यांनी जनगणना कामकाजाबाबत पर्यवेक्षक व प्रगणकांना मार्गदर्शन केले HLB ना भेट देऊन जनगणना कामासाठी घरांना देण्यात आलेल्या क्रमांकांची पाहणी करण्यात आली. पर्यवेक्षक व प्रगणकांनी केलेल्या कामाचे अधिकाऱ्यांनी कौतुकही केले.

सध्या सोलापूर जिल्ह्यातील सर्व घरयादी गटांमध्ये जनगणनेचे काम सुरू असून प्रगणकांकडून कच्चा नकाशा तयार करणे तसेच घरांचे क्रमांक निश्चित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

जनगणना कार्यालयाकडून प्राप्त सूचनांनुसार दि.२० मे २०२६ पासून क्षेत्रीय कामास सुरुवात करण्यात येणार आहे. सोलापूर जिल्ह्यात एकूण ५४५४ घरयादी गट असून त्यापैकी ५०२ घरयादी गटांमध्ये प्रत्यक्ष HLO pp Ûmao कामास सुरुवात झाल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

# 'श्रीसद्‌गुरु मामा दांडेकर सेवा'च्या वतीने अधिक मासोत्सव, शुक्रवारी पुस्तक प्रकाशन




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ मे-**

श्रीसद्‌गुरु मामा दांडेकर सेवा मंडळाच्या वतीने श्राविका शाळेसमोरील माऊली मंदिर येथे रविवार, दि.१७ मे २०२६ पासून अधिक मासोत्सव योजिले आहे. शुक्रवार, दि.२२ मे २०२६ रोजी दुपारी ४.३० वाजता संजीव कुसुरकर लिखित जयांचिये चोखटे मानसी (वै. प्राचार्य मामासाहेब दांडेकर स्मृति सौरभ) या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष बाबूशेठ तोष्णीवाल यांनी दिली.



अधिक मासोत्सव अंतर्गत ज्ञानेश्वरी साम ुदायिक पारायण, र त न प्र भ ा स ह स्त्र बु ध्दे यांची श्रीकृष्ण लीलामृत कथा उपक्रम यांसह विविध कार्यक्रम होत आहेत. रविवार, २४ मे रोजी शाम जोशी-कासेगांवकर यांचे कीर्तन होणार आहे. 'जयांचिये चोखटे मानसी' या पुस्तकात संजीव कुसूरकर यांनी मामासाहेब दांडेकर ह्यांच्या जीवनातील ठळक प्रसंग आणि आठवणी ज्ञानेश्वरीतील ओवींचा आधार घेत संकलित केल्या आहेत.

संजीव कुसुरकर हे बडोदा बँकेतील निवृत्त अधिकारी असून यापुर्वी त्यांची ज्ञानेश्वरी दृष्टांत रत्ने, ज्ञानेश्वरी आणि ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ही पुस्तके प्रकाशित झाली आहेत. वै.दा.का. थावरे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी संत साहित्य सेवा संघाचे सचिव ह्या नात्याने २५ वर्षे आध्यात्मिक क्षेत्रात योगदान दिले आहे, असेही त्यांनी सांगितले.

# जिल्हाधिकारी कर्मचाऱ्यांचा दर मंगळवारी 'नो व्हेईकल डे'

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ मे-**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंधन बचत, पर्यावरण संरक्षण व इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराबाबतच्या आवाहनाला प्रतिसाद देत, सोलापूर जिल्हा परिषद, महानगरपालिकेकडून 'नो व्हेईकल डे' आयोजित केल्यानंतर आता जिल्हा प्रशासनाकडूनही दर मंगळवारी 'नो व्हेईकल डे' साजरा करण्यात येणार असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांनी दिली.

पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाम ुळे सोमवारी जिल्हा परिषद परिसरात दिवसभर वेगळीच चर्चा रंगली होती. अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांच्या सहभागामुळे नो व्हेईकल डे हा केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता प्रत्यक्ष कृतीतून दिलेला संदेश ठरला. याच धर्तीवर जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस.यांच्यासह इतर अधिकारी इलेक्ट्रिक वाहनातून, काहीजण सायकलवरून कार्यालयात येणार असल्याचे समजते.

# सोलापूरसह राज्यातील काही जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा

## सोलापुरात सोमवारीही सुर्यदेवाचा कोप

## आपत्ती विभागाने दिला यलो अलर्ट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मे-**

सोलापूरसह राज्यात उष्णतेचा कहर बघायला मि ळत आहे. यासोबतच काही भागात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचा मोठा इशाराही देण्यात आला. विदर्भ, मराठवाड्यात उष्णतेच्या लाटेचा धोका आहे. सोलापूर, धाराशिव आणि लातूरमध्ये अवकाळी पाऊस होण्याची शक्यता आहे. इतकेच नव्हेतर आपत्ती विभागाकडून या जिल्ह्यासाठी यलो अलर्ट आला आहे. दरम्यान, सोलापुरात रविवारी ४४ अंश तर आज दुसऱ्या दिवशीही सोमवारी ४३.६ अंश सेल्सियस इतके तापमान असल्याने दिवसभर नागरिकांना उकाड्याशी सामना करावा लागला.

भारतीय हवामान विभागाने पावसाचा येलो अलर्ट जारी केला. सोमवारी हिंगोली, परभणी, अमरावती, वर्धा, अकोला, नागपूर, चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये उष्णतेचा मोठा इशारा देण्यात आला. बाकी राज्यातील इतर भागांमध्ये पाऊस हजेरी लावण्याची शक्यता आहे. रविवारी अकोला, वर्धा, अमरावती, यवतमाळ, ब्रह्मपुरी या ठिकाणी ४५ अंश सेल्सिअच्या पुढे तापमानाची नोंद झाली. सोलापूरसह इतरही काही जिल्ह्यांमध्ये ४३ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. काही दिवसातच राज्यात मॉन्सून दाखल होण्याची शक्यता आहे.



राज्यात सध्या सूर्य आग ओकताना दिसत आहे. उष्णता वाढत आहे. आज राज्यावर दुहेरी संकट असल्याचे बघायला मिळतंय. उष्णतेसोबतच थेट पावसाचाही इशारा देण्यात आला.

सोलापूर जिल्ह्यात सतत हवामान बदलताना दिसत आहे. कधी ढगाळ वातावरण तर कधी कडक उन्हाचे चटके, अशा बदलत्या वातावरणामुळे नागरिक हैराण झाले आहेत. जिल्ह्याचे तापमान तब्बल ४४ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचल्याने उकाड्यात मोठी वाढ झाली आहे. तापमानात सतत चढ-उतार होत असल्याने नागरिकांच्या आरोग्यावरही परिणाम होताना दिसत आहे. उष्णतेचा कहर पुन्हा एकदा वाढताना दिसत आहे. आज उन्हाचा कडाका वाढण्याची शक्यता आहे. नागरिकांनी शक्यतो दुपारी १२ ते ४ घराबाहेर पडणे टाळावे. प्रशासनाकडून उष्णतेपासून संरक्षण करण्याकरिता नक्की काय उपाययोजना करायच्या, या सूचना देण्यात आल्यात. जिल्ह्यात १९ एप्रिलला वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. या अवकाळी पावसाचा मोठा फटका जिल्ह्यातील मुख्य काही पिकाला बसला आहे. जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये गारपीट झाल्याने शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे समोर आले.

## ज्ञानामृत आनंदलहरी १४४५

**जें सर्वत्र सर्वही देहीं । जया करितांही घातु नाहीं ।**
**तें विश्वात्मक तूं पाही । चैतन्य एक ।।**

देह नाशिवंत आहे, आत्मा अमर आहे. आत्मा अमर, अविनाशी असल्याने त्याला कोणी मारु शकत नाही किंवा तो मरत नाही. याबद्यलचे स्पष्टीकरण माऊलींनी मागील ओवीप्रमाणे या ओवीतही केले आहे. अर्जुन फक्त देहाकडे पाहून म्हणाला की मी यांना मारणार नाही. आत्मा, जीवात्मा, चेतना काय असते याचे ज्ञान आपल्याप्रमाणे अर्जुनालाही नाही. ज्याला याचे ज्ञान झाले तो ब्रम्हरुपच होऊन जातो असेही भगवंतानी म्हटले आहे. या धावपळीच्या जीवनात किंवा संसारात मी-मी, माझे-माझे म्हणण्यात आम्हाला आमच्या नाशिवंत देहाचा सुध्दा पूर्ण परिचय झाला नाही, तर आत्म्याच्या परिचय कसा होईल. या नाशिवंत देहाला आम्ही सर्वस्व समजून बसलो आहोत. त्यामुळे मोह, कोध्र लोभ, दंभ, मत्सर, स्वार्थ, द्वेष आदिची वाढ मोठया प्रमाणावर होत आहे. ख-या अर्थाने ज्याचा शोध घ्यायला पाहिजे त्या मार्गावर सुध्दा पाऊल पडत नाही ही चांगली बाब नाही. आपणालाच आपला शोध घ्यावा लागेल.



आत्म्याबद्यल पुढे बोलतांना श्रीकृष्ण म्हणाले, अर्जुना सर्व प्राणीमात्रांची शरीरे जन्मापुर्वी अव्यक्त असतात, ती जन्मानंतर व्यक्त होतात व मृत्यूनंतर पुन्हा अव्यक्त होतात. तर मग याचा शोक करण्याची आवश्यकता आहे का ? कोणी अधिकारी पुरुष या आत्म्याकडे आश्चर्यकारक म्हणून पाहातात, कोणी त्याला आश्चर्यकारक म्हणून वर्णितात, कोणी याच्याबद्यल आश्यर्चकारक आहे म्हणून त्याच्या विषयी ऐकलेले सांगतात. यापैकी कोणीही याला तत्वत: जाणीत नाही. आत्मा हा सर्व ठिकाणी व सर्वाच्या शरीरात राहातो. त्याचा घात करतो म्हटले तरी त्याचा घात होत नाही. आत्मा हे जगद्रुप चैतन्य आहे. आत्मा हा सर्व प्राणीमात्राच्या देहात सारखाच आहे, हे सांगुन भगवंतांनी ईश्वराला सर्व समान असल्याचा मोठा समतावादी दृष्टांत येथे दिला आहे. या समतावादी दृष्टांताची आज संपुर्ण मानव जातीला गरज आहे. कोणी गरीब असो, कोणी श्रीमंत असो, कोणी लहान असो, कोणी मोठा असो, पशू असो, पक्षी असो, सर्व देहात सारखाच आत्मा भरुन उरल्याचे भगवंतांनी म्हटले आहे. ज्ञानदेवांनी पैठण नगरीत मुक्या रेडयाच्या तोंडून वेद वदवून भगवंताचे, आत्मा सर्व देहात भरल्याचे म्हणणे खरे करुन दाखविले. सर्व देही एकच आत्मा आहे, तर मग आपण दुजाभाव का करतो ? हा प्रश्न आपल्या समोर येऊ शकतो. आपण या आत्म्याला ओळखले नसल्याने किंवा त्याची प्रचिती आली नसल्याने आपल्या हातून आप-परभाव निर्माण होत असावा. संत ज्ञानदेव, गोरोबा काका, मुक्ताई, संत तुकाराम महाराज, संत रामदास स्वामी, चोखा महाराज, एकनाथ महाराज, संत सावता, संत नामदेव, संत कबीर, संत जनाई, सजन कसाई, संत नरहरी सोनारासारख्या महात्म्यांना आत्म्याची प्रचिती आली होती म्हणून त्यांना सर्व प्राणीमात्र समान दिसत होते. आपणालाही ही प्रचिती येवो अशी माऊली चरणी प्रार्थना. आपली सकारात्मक दृष्टी आपणास ही प्रचिती देण्याकामी मदतीला येऊ शकेल. जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : मंगळवार,**
**दि. १९ मे २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - अधिक, शु. तृतीया**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- मार्गशीर्ष (०८.४१)**
**योग - धृति (१७.४९)**
**करण - वणिज (२४.३९)**
**राहू काल : मंगळवार**
**दु. ३.०० ते ४.३०**

**दिनविशेष :**
**विनायक चतुर्थी (अंगारक योग).**
**जागतिक कौटुंबिक डॉक्टर दिन**
**१९१०: 'हॅले' या प्रसिद्ध धूमकेतूचे शेपूट पृथ्वीच्या अगदी जवळून गेले होते.**
**२०००: अमेरिकेने स्पेस शटल 'अटलांटिस' आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर सामान पोहोचवण्यासाठी प्रक्षेपित केले.**

## मधमाशी दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मे-**




युगंधर फाउंडेशन, सोलापूर यांच्या वतीने २० मे जागतिक मधमाशी दिन तसेच २२ मे जागतिक जैवविविधता दिन निमित्त विविध जनजागृती व प्रशिक्षण उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

जागतिक जैवविविधता दिनाच्या पार्श्वभूमीवर निसर्गातील आणि जैवविविधतेतील अत्यंत महत्त्वाचा घटक असलेल्या मधमाश्यांचे संवर्धन व त्यांचे पर्यावरणाशी असलेले सहसंबंध लक्षात घेऊन युगंधर फाउंडेशन, सोलापूर आणि उइठ्ढख पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने १९ मे ते २३ मे या कालावधीत मधमाशी पालन प्रशिक्षण व जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

यामध्ये मधमाशी संवर्धन, मध उत्पादन, नैसर्गिक शेती, परागीभवनाचे महत्त्व, जैवविविधता संरक्षण यांसारख्या विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच २० मे जागतिक मधमाशी दिनानिमित्त चित्रकला स्पर्धा व निबंध स्पर्धा आयोजित करण्यात येणार असून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. याशिवाय २२ मे जागतिक जैवविविधता दिनानिमित्त महाराष्ट्रातील जैवविविधता, स्थानिक जैवविविधतेचे संवर्धन, जैवविविधता नोंदवही तयार करण्याची प्रक्रिया याबाबत विशेष मार्गदर्शन करण्यात येणार आहे. शहर व जिल्हास्तरावर जैवविविधता संवर्धनासाठी सामाजिक संस्था, शाळा, महाविद्यालये तसेच महिला बचत गट यांच्या माध्यमातून वर्षभर विविध उपक्रम राबविण्याचा संकल्प करण्यात आला असल्याची माहिती फाउंडेशनच्या अध्यक्षा प्रा. रेश्मा माने यांनी दिली. हे प्रशिक्षण आम्ही निसर्गयात्री निसर्ग अभ्यास केंद्र, सोलापूर येथे आयोजित करण्यात आले असून इच्छुकांनी अधिक माहितीसाठी ८९२८७७४०२८ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

# औषध विक्रेत्यांचा उद्या देशव्यापी बंद

## महाराष्ट्रातही शंभर टक्के प्रतिसादाचा दावा; केंद्र सरकारच्या भूमिकेविरोधात एआयओसीडी आक्रमक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ मे-**

केंद्र सरकारकडून प्रलंबित मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत अखिल भारतीय औषध विक्रेता संघटना (एआयओसीडी) ने दि. २० मे रोजी देशव्यापी औषध विक्रेता बंदची हाक दिली आहे. या बंदला महाराष्ट्रातही शंभर टक्के प्रतिसाद मिळेल, असा दावा सोलापूर जिल्हाध्यक्ष व्यंकटेश पुजारी यांनी पत्रकार परिषदेत केला आहे.

ड्रग प्राईझ कंट्रोल ऑर्डर (डीपीओ)२०१३ अंतर्गत काही जीवनावश्यक औषधांवर होलसेलर व रिटेलरचा नफा निश्चित करण्यात आला आहे. मात्र, मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांकडून २० ते ४० टक्क्यांपर्यंत मोठ्या प्रमाणावर सवलती दिल्या जात असल्याने पारंपरिक औषध विक्रेत्यांपुढे गंभीर स्पर्धात्मक संकट निर्माण झाले आहे.

या कायद्यानुसार उत्पादकांकडून कडून काही जीवनावश्यक औषधीवर ८ टक्के होलसेलरला व १६ टक्के रिटेलरला, तसेच अनियंत्रित औषधीवर १० टक्के होलसेलर व २० टक्के रिटेलरला नफा निश्चित केला आहे. मात्र, मोठ्या कॉर्पोरेट कंपन्या अव्यवस्थित स्पर्धा निर्माण करून २० टक्के ते ४० टक्के पर्यंत डिस्काउंट देत आहेत. त्यामुळे देशातील सुमारे १२.५० लाख औषध विक्रेत्यांचा व्यवसाय धोक्यात आला असून अनेक दुकाने बंद होण्याच्या मार्गावर आहेत.देशातील सुमारे १२.५० लाख औषध विक्रेत्यांचा व्यवसाय धोक्यात आला असून अनेक मेडिकल दुकाने बंद होण्याच्या उंबरठ्यावर असल्याचा दावा संघटनेने केला आहे. त्यामुळे सरकारने नियंत्रित नफ्याच्या तरतुदीचा पुनर्विचार करावा तसेच डॉक्टरांनी लिहून दिलेल्या औषधाऐवजी औषध विक्रेत्यांना ब्रँड सबस्टिट्यूट औषधे देण्याचा अधिकार द्यावा, अशी प्रमुख मागणी केली आहे. संबंधित केंद्रीय मंत्री, प्रशासकीय अधिकारी तसेच पंतप्रधानांकडे वारंवार निवेदने देऊनही कोणतीही सकारात्मक दखल घेण्यात आलेली नाही. त्यामुळे संघटनेला आंदोलनात्मक भूमिका स्वीकारावी लागली आहे. लोकशाही मार्गाने सातत्याने पाठपुरावा करूनही सरकारकडून प्रतिसाद न मिळाल्याने औषध विक्रेत्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. सरकारने तातडीने न्याय्य निर्णय न घेतल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशाराही जिल्हा सचिव राजेश विरपे यांनी दिला आहे. या पत्रकार परिषदेस प्रशांत खलिपे, बसवराज मणुरे,श्याम बाहेती, सिध्देश्वर घाळे, मनीष बलदवा, विलास कारभारी, सिध्दाराम चाबुकस्वार,अनंत चिटकुल, प्रताप कांचन आदी उपस्थित होते.

## आमच्या घराचे भांडण सोडवणारा तू कोण? असे म्हणत तरुणावर हल्ला

**सोलापूर, दि. १८ मे-**

आमच्या घराचे भांडण सोडवणारा तु कोण ? असे म्हणत एका तरुणावर लोखंडी सळई आणि कोयत्याने जीवघेणा हल्ला केल्याची घटना रविवार पेठ परिसरात १६ मे रोजी घडली आहे. याप्रकरणी जेलरोड पोलिस ठाण्यात चौघाजणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महेश सुरेश बनसोडे, सिद्धेश्वर सुरेश बनसोडे, अभिषेक नवनाथ मोहिते आणि वैभव नवनाथ मोहिते (सर्व रा. रविवार पेठ, सोलापूर ) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत विजय राजू क्षीरसागर (रा. रविवार पेठ, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी विजय क्षीरसागर यांनी आरोपींचे भांडण मध्यस्थी करून ते सोडवले होते. याचाच राग मनात धरून आरोपींनी १६ मे रोजी सायंकाळी ५:३० वाजण्याच्या सुमारास जय हॉस्पिटलसमोर विजय यांना गाठले. तू आमच्या घराचे भांडण सोडवणारा कोण? असे म्हणत आरोपी महेश बनसोडे याने लोखंडी सळईने विजय यांच्यावर वार करण्याचा प्रयत्न केला. विजय यांनी तो वार अडवल्यामुळे त्यांच्या उजव्या हाताच्या तळहाताला किरकोळ जखम झाली. त्याचवेळी आरोपी सिद्धेश्वर बनसोडे याने कोयत्याने थेट विजय यांच्या डोक्यात मारून त्यांना गंभीर जखमी केले. तसेच, इतर दोन आरोपी अभिषेक मोहिते आणि वैभव नवनाथ मोहिते यांनी रस्त्यावर पडलेले फरशीचे तुकडे घेऊन विजय यांच्या दुचाकीवर मारले. यात दुचाकीच्या पेट्रोल टाकीचे मोठे नुकसान झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलिस हवालदार कांबळे हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.



## सोलापूर विद्यापीठात शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची निदर्शने

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मे-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शासनाकडे असलेल्या प्रलंबित मागण्यासाठी निदर्शने केला.

विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्ती कृती समिती यांनी अकृषि विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचा-यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करणे, विद्यापीठातील उर्वरित शिक्षकेत्तर कर्मचा-यांना सातवा वेतन आयोग लागू करणे, जुनी पेन्शन योजना लागू करणे, सातवा वेतन आयोगानुसार रजा रोखीकरण अदा करणे व अन्य न्यायिक प्रलंबित मागण्याबाबत तात्काळ व ठोस निर्णय न झाल्यास टप्याटप्याने आंदोलन छेडण्याचा निर्णय घेण्यात त्यानुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील कर्मचारी यांनी आज दि. १८ मे, रोजी दुपारी भोजन अवकाश कालावधीत विद्यापीठाच्या मुख्य इमारती समोर निदर्शने, घोषणाबाजी करुन कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधनाचा प्रयत्न केला.

यावेळी सोलापूर जिल्हा शिक्षक संघ( सुटा) यांनी कर्मचाऱ्यांच्या मागण्या या रास्त असुन या आंदोलनास पाठिंबा दिला. यावेळी सुटा संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा.नेताजी कोकाटे, सचिव प्रा. गुरमे यांनी पाठिंब्याचे पत्र कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुनिल थोरात यांना दिले. या निदर्शने आंदोलनात महासंघ उपाध्यक्ष सोमनाथ सोनकांबळे, रवी हुक्किरे, भागवत घंटे, प्रशांत चोरमले, वसंत सप्ताळे, कांचन आघाव, उज्वला दंतकाळे उपस्थित होते.

## 'इनाम निर्मूलन कायदा' तात्काळ मागे घ्या

### अन्यथा राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मे-**



महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने प्रस्तावित केलेल्या 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम, २०२६' विरोधात सोलापुरातील विविध मंदिर विश्वस्त आणि हिंदुत्ववादी संघटनांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. हा कायदा हिंदू देवस्थानांच्या धार्मिक, मालमत्ता आणि स्वायत्त हक्कांवर घाला घालणारा असल्याचा आरोप करत प्रशासनाला निवेदन देण्यात आले. नायब तहसीलदार श्रीमती मते यांनी हे निवेदन स्वीकारले.

यावेळी श्रीक्षेत्र वडवळ नागनाथ देवस्थानचे अध्यक्ष श्रीकांत शिवपुजे, महादेव ननवरे, प्रसाद पंडित, संतोष पुजारी, ॲड. सतीश गाजूल, भास्कर राऊळ, दीपक परदेशी, महाराष्ट्र मंदिर महासंघ जिल्हा संघटक विनोद रसाळ, हिरालाल तिवारी, राजन बुणगे, संदीप ढगे, महादेव पाटील, राजश्री देशमुख, बालराज दोंतुल आदी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, छत्रपती शिवरायांच्या काळापासून मंदिरांच्या धार्मिक विधी, अन्नछत्र आणि परंपरा टिकवण्यासाठी देवस्थानांना इनामी जमिनी देण्यात आल्या आहेत. मात्र, प्रस्तावित कायद्यातील कलम ३ व ४ नुसार या जमिनींचे हक्क रद्द करून त्या वहिवाटदार किंवा पुजाऱ्यांच्या नावावर करण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यामुळे मंदिरांच्या मालमत्तेचे व्यापारीकरण होऊन देवस्थाने परावलंबी होतील, अशी भीती व्यक्त करण्यात आली. तसेच, वक्फ बोर्डाच्या जमिनींना कायद्यातून वगळून केवळ हिंदू देवस्थानांवरच कारवाई करण्याचा प्रयत्न हा संविधानातील समानतेच्या अधिकाराच्या विरोधात असल्याचा आरोप करण्यात आला. महसूल अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरोधात न्यायालयात दाद मागण्यास बंदी घालणारे कलम १८ हे घटनात्मक अधिकारांवर आघात असल्याचेही निवेदनात नमूद आहे.

## रेवणसिध्देश्वर नगर येथे घरात झोपल्या ठिकाणी एकाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ मे-**

घरामध्ये झोपल्या ठिकाणी एका ३८ वर्षाच्या व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना विजापूर रोडवरील रेवण सिद्धेश्वर नगरात रविवारी रात्री साडे आठ वाजता उघडकीस आली.

किशोर शंकर गायकवाड ( वय ३८ वर्ष , रा. रेवणसिद्धेश्वर नगर , मोतीबाग , विजापूर रोड , सोलापूर ) असे त्या मयताचे नाव आहे. किशोर गायकवाड हे रविवारी सायंकाळी सात वाजता घरामध्ये झोपले असताना घरच्यांनी त्यांना साडेआठ वाजता उठविण्याचा प्रयत्न केला. मात्र ते काही हालचाल करत नसल्याने त्यांना घरच्यांनी उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात नातेवाईक राहुल भिसे यांनी रात्री दहा वाजता दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

## विवेकानंद केंद्राचे व्यक्तिमत्व विकास शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मे-**



विवेकानंद केंद्र कन्याकुमारी, शाखा जुळे सोलापूर तथा व्ही. के.वयम्च्या वतीने व्यक्तिमत्व विकास शिबिर संपन्न झाले. यात ६० शिबिरार्थींनी भाग घेतला होता. संपूर्ण शिबिराची थीम 'स्वराज्य' आणि टॅगलाईन स्वराज्य ते सुराज्य ही होती.

याचे उद्घाटन माजी नगरसेवक आणि पश्चिम महाराष्ट्र विभाग प्रमुख गणेश गुंडमी यांच्या हस्ते झाले. समारोप पंढरपूर गोशाळेचे ट्रस्ट विजयकुमार जय शंकर बरबडे आणि महाराष्ट्र प्रांत कार्यपद्धती प्रमुख आ. मदगोंडाजी पुजारी यांच्या उपस्थितीत झाला. यात ६ वी ते ८ वी वर्गातील विद्यार्थ्यांसाठी विविध अंगांनी व्यक्तिमत्व विकासाचा प्रवास अविस्मरणीय ठरला. शिबिरात बौद्धिक, सांस्कृतिक, शारीरिक आणि सामाजिक कौशल्यांच्या सत्रांनी मुलांना सशक्त बनवण्याचा प्रयत्न केला गेला. अल्प वेळात आणि मर्यादित मनुष्यबळातही संघटनेतील प्रत्येक कार्यकर्त्याने उत्कृष्ट सहकार्य आणि समर्पण दाखवले. प्रत्येक मंडल आणि गणांनी आपापल्या कार्यात उत्कृष्टपणे सहभाग घेतला, ज्यामुळे शिबिराची गुणवत्ता आणि उत्साह यामध्ये लक्षणीय वाढ झाली. शिबिरातील विविध सत्रांनी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, संघभावना, नेतृत्वगुण, आरोग्यविषयक जागरूकता आणि सांस्कृतिक जाणिवा वाढविल्या. विशेषतः '१०८ सूर्यनमस्कार महायज्ञ' आणि 'प्रेरणादायी पुनरुत्थान सत्रांनी' शिबिरार्थींना शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या नवचैतन्य प्राप्त करून देण्याचे प्रयत्न केले

## बाळे येथे आढळला दुर्मिळ प्रकारचा नाग

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ मे-**



बाळे (तोडकर वस्ती) सोलापूर येथील रहिवासी दत्तात्रय चव्हाण व राम गायकवाड त्यांच्या वॉल कंपाऊंडमध्ये सायकलीजवळ १६ मे रोजी, मध्यरात्री १ वा. एक साप आढळला. त्यांनी लगेच WCS चे सदस्य सुरेश क्षीरसागर यांना क्षीरसागर हे त्वरित घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी कंपाउंडबाहेरून तो साप ओळखला असता तो नाग प्रजातीचा विषारी साप असल्याचे दिसून आले. परंतु जवळ जाऊन त्याचे नीट निरीक्षण केले असता त्यांच्या लक्षात आले की, सापाच्या डोक्यावर आणि मानेभोवती पांढऱ्या रंगाचे ठिपके दिसून आले. आणखी जवळून त्याचे निरीक्षण केले असता साधारणतः पावणे पाच फुटीचा हा नाग होता आणि याला कोणतीही जखम नसल्याचे ही विशेषतः आढळून आले. हा साप सामान्य नसून ल्युसिस्टिक प्रकारचा असल्याचे त्यांच्या लक्षात आले. पुढील वैद्यकीय तपासणीसाठी निमल राहतचे डॉक्टर आकाश जाधव यांच्याकडे या नाग सापाला दाखल करण्यात आले. डॉ. जाधव यांनी सापाचे निरीक्षण केले असता त्याला फंगल इन्फेक्शन किंवा इतर कोणताही संसर्ग नसल्याचे सांगितले आणि त्याला त्याच्या नैसर्गिक अधिवासात सोडून देण्यास हरकत नसल्याचे सांगितले. वनपरिक्षेत्र कार्यालयाकडे या सापाबाबत नोंद करण्यासाठी पाठविण्यात आले होते. वनविभागाने याची नोंद घेतल्यानंतर त्याला त्याच्या नैसर्गिक अधिवासात सोडून देण्यात आले. या बचाव कार्यात सोलापूर वनविभाग उपवनसंरक्षक कुलराज सिंग, सहायक वनसंरक्षक अजित शिंदे, सहायक वनसंरक्षक ऐश्वर्या शिंदे, वनपरिक्षेत्र अधिकारी रोहितकुमार गांगर्डे, वनपरिक्षेत्र अधिकारी शिला बडे, वनपाल रुकेश कांबळे, वनरक्षक गंगाधर विभूते, रेस्क्यू टीम प्रविण जेऊरे, मुन्ना निरवने, प्रसाद बोलदे, WCS टीमचे शिवानंद हिरेमठ, राहुल दोरकर उपस्थित होते.

# महानगरपालिका, कोहिनूर टेक्निकल इन्स्टिट्यूटचा जनजागृती उपक्रम

### राष्ट्रीय डेंग्यू डे या दिवसाचे औचित्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मे-**




सोलापूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त वीणा पवार आणि आरोग्याधिकारी डॉ. राखी माने यांच्या मार्गदर्शनाखाली १६ मे रोजी 'राष्ट्रीय डेंग्यू दिन' आरोग्य विभागामार्फत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या निमित्त डेंग्यूच्या प्रादुर्भावाला आळा घालण्यासाठी भव्य रॅलीच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली आहे. या कार्यक्रमासाठी कोहिनूर टेक्निकल इन्स्टिट्यूटचे व्यवस्थापक वल्लभ कुलकर्णी आणि स्टाफ यांनी बॅनर साहित्य देवून रॅली मध्ये उस्फूर्त प्रतिसाद देत आपली सामाजिक बांधिलकी जपली.

या रॅलीमध्ये नागरी आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, आशा वर्क या आरोग्य क्षेत्रातील या सर्व घटकांनी एकत्र येत परिसरातील विविध भागांमध्ये फिरून नागरिकांना डेंग्यूपासून बचावाचे आवाहन केले. रॅलीदरम्यान कर्मचाऱ्यांच्या हातात डेंग्यू प्रतिबंधात्मक उपायांचे फलक होते. डेंग्यूला पळवून लावूया, परिसर स्वच्छ ठेवूया अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. आशा वर्कर व आरोग्य कर्मचाऱ्यांनी रॅलीदरम्यान नागरिकांशी थेट संवाद साधून साचलेल्या पाण्यात डेंग्यूच्या डासांची उत्पत्ती कशी होते, याबद्दल माहिती दिली.आठवड्यातून एक दिवस 'कोरडा दिवस' पाळणे, पाणी साठवलेली भांडी झाकून ठेवणे, आणि ताप आल्यास त्वरित सरकारी आरोग्य केंद्रात तपासणी करून घेणे, याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. डेंग्यू हा डासांमुळे होणारा आजार असून, केवळ सतर्कता आणि स्वच्छतेच्या जोरावर आपण त्याला रोखू शकतो. प्रत्येक नागरिकाने आपल्या घरात आणि परिसरात पाणी साचू न देता आरोग्य विभागाला सहकार्य करावे, असे आवाहन वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी यांनी केले.

**तीन दिवसीय विशेष मोहिमेची मुख्य वैशिष्ट्ये**

**गप्पी मासे सोडण्याचा उपक्रम:** डासांची पैदास रोखण्यासाठी शहरातील डासोत्पत्ती स्थानांमध्ये मनपा आरोग्य विभागातर्फे गप्पी मासे सोडण्यात आले.

**विस्तृत जनजागृती:** शहरातील विडी कारखाने, सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि मुख्य चौकांमध्ये नागरिकांना डेंग्यू प्रतिबंधात्मक उपाय समजावून सांगण्यात आले.

**रॅली आणि पॅम्प्लेट वाटप:** 'काय करावे व काय करू नये' याची माहिती देणाऱ्या पत्रकांचे वाटप आणि भव्य रॅली

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## पंढरपुरात भाविकांची उन्हापासून बचावासाठी व्यवस्थेची गरज



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १८ मे-**

दर तीन वर्षातून येणाऱ्याअधिक मासास रविवारपासन सुरुवात झाली आहे. अशातच सध्या उन्हाची तीव्रता वाढत आहे. पंढरपुरातील वाळंवट, नगरप्रदक्षिणा तसेच मुखदर्शन रांगेत उन्हामुळे भाविकांच्या पायांना चटके बसत आहेत. त्यांचा उन्हापसून बचाव होण्यासाठी व्यवस्थेची गरज आहे.

परगावाहून विठ्ठल दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना उन्हाचा कमालीचा त्रास होत आहे. त्यामुळे वाळवंटात जुना दगडी पुल ते चंद्रभागा घाटदरम्यान प्रशासनाकडून तात्पुरत्या स्वरुपात व्यवस्था करण्याची मागणी होत आहे. नगरप्रदक्षिणेचा मार्ग हा दोन किलोमीटर इतका आहे. वारकरी भाविक सर्रास अनवाणी पायांनी नगरप्रदक्षिणा करीत असतात. त्यांनाही उन्हाचा खूपच त्रास होत आहे. मंदिर प्रशासन किंवा नगरपालिकेने संपुर्ण नगरप्रदक्षिणा रस्त्यावर तात्पुरती उपाययोजना करावी. पदस्पर्श दर्शन रांगेत उन्हापासून बचावासाठी उपाय योजना केली आहे. मात्र मुखदर्शन रांगेकडे मंदिर प्रशासनाचे साफ दुर्लक्ष आहे. मंदिर प्रशासनाकडून मुख दर्शनरांगेत होणारी गर्दी पाहता सावलीची व्यवस्था करणे गरजेचे आहे.

### महत्त्वाचे...



## पंढरपूर शहरातील जड वाहतूक बाह्यवळण मार्गावरून वळवण्याची मागणी

**पंढरपूर, दि. १८ मे-**

शहरातील सर्व नागरिक व नगरसेवकांच्या वतीने पंढरपूर शहरात होत असलेली जड वाहतूक बाह्य वळण मार्गावरून वळवावी म्हणून म ाजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या सूचनेवरून भाजप नगरसेवकांसह शिष्टमंडळाने उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे व पोलिस निरीक्षक दशरथ वाघमोडे यांना निवेदन दिले. पंढरपूर शहरातील जडवाहतुकीमुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. शहरातील अरुंद रस्ते आणि अवजड वाहनांची वर्दळ यामुळे मुले, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांना रस्त्याने चालणे कठीण झाले आहे. अवजड वाहनांमुळे वाहतूक कोंडी होत आहे. याचा फटका रुग्णवाहिका, शालेय बस आणि कामावर जाणाऱ्या नागरिकांना बसत आहे. सोलापूर व कुर्डुवाडी भागातून येणाऱ्या बस अहिल्या पुलावरून बसस्थानकात वळवाव्यात, आदी मागण्यांचा निवेदनात समावेश आहे. यावेळी प्रशांत डगळे यांनी पंढरपूर शहरात जड वाहतूक होणार नाही या दृष्टीने प्रयत्न केले जातील. जुना अकलूज रोड, के.बी.पी. कॉलेज लिंक रोड, प्रबोधनकार ठाकरे चौक, मध्यप्रदेश भवनजवळ व पंढरपूर नगरपालिकेजवळ लोखंडी बॅरियर, रस्त्यावर स्पीडब्रेकर करण्याबाबत संबंधितांना सांगितल्याचे सांगितले. यावेळी गटनेते वासुदेव बडवे, सुजितकुमार सर्वगोड, पाणीपुरवठा सभापती अमोल डोके, ॲड.सुनिल वाळूजकर, धर्मराज घोडके, सौरभ थिटे, भाजप शहराध्यक्ष रोहित पानकर, गुरुदास अभ्यंकर, शरद माने, मालोजी शेंबडे, अशोक शिंदे, गणेश शिंदे, सिकंदर ढवळे हे उपस्थित होते.

## 'महावितरण'च्या कारभाराविरोधात गुरुवारी आमदार जानकरांच्या नेतृत्वात पदयात्रा

**वेळापूर, दि. १८ मे-**

महावितरणाच्या कथित सुलतानी कारभाराविरोधात तसेच शेतकरी व सर्वसामान्य जनतेच्या विविध वीज समस्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आमदार उत्तम जानकर यांच्या नेतृत्वाखाली गुरुवारी दि. २१ मे रोजी भव्य पदयात्रेचे आयोजन केले आहे. पदयात्रेत हजारो कार्यकर्ते सहभागी होणार असून, जनतेला २४ तास सिंगल फेज वीज, शेतकऱ्यांना ८ तास अखंड वीज, लोडशेडिंग बंद करणे तसेच महावितरणाचा अन्यायकारक कारभार थांबविण्याची मागणी करण्यात येणार आहे. पदयात्रा गुरुवारी सकाळी ९ वाजता वेळापूर येथील गरुड बंगल्यावरुन सुरू होणार असून माळशिरस तहसील कार्यालयापर्यंत सुमारे १८ किलोमीटर अंतर जाणार आहे. समारोप माळशिरस तहसील कार्यालय परिसरातील सर्टिफाय हायस्कूल ग्राउंड येथे सायंकाळी ४ वाजता होणार आहे. शेतकरी, युवक, महिला व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## न्यूयॉर्क युनिव्हर्सिटीतून विक्रमसिंह पाटील यांचे विशेष प्राविण्यासह यश

**टेंभुर्णी, दि. १८ मे-**

माजी कृषी सभापती संजय पाटील भिमानगरकर यांचे पुत्र विक्रम सिंह पाटील यांनी अमेरिकेतील न्युयॉर्क विद्यापीठातून 'एम.एस. इन प्रोजेक्ट मॅनेजमेंट' या पदवी अभ्यासक्रमात ग्रेडसह विशेष प्राविण्य मिळवले आहे. विक्रमसिंह यांचे शालेय शिक्षण इयत्ता आठवी ते दहावीपर्यंत सोलापूर येथे झाले. कोल्हापूर येथील डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधून सिव्हिल इंजिनिअरिंगची पदवी घेतली. उच्च शिक्षणासाठी ते अमेरिकेत गेले. परदेशात केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे, तर प्रोजेक्ट मॅनेजमेंटच्या विविध अंगांमध्येही उत्कृष्ट प्रावीण्य मिळवले. त्यांच्या यशाबद्दल कोंढार परिसरातील गावांमधून तसेच सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# 'शक्तीपीठ'साठी मोहिते-पाटील सरसावले

### शिवरत्न बंगल्यावर बाधित शेतकऱ्यांसह आमदारांची बैठक; जाणून घेतल्या समस्या

### मोबदल्यासह महामार्गाच्या आराखड्यावर चर्चा



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १८ मे-**

शक्तीपीठ महामार्गावरुन माळशिरस तालुक्यात शेतकऱ्यांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली आहे. काही नेते त्यांना भडकावतही आहेत. मात्र या सर्व पार्श्वभुम ीवर मोहिते-पाटील परिवाराकडूनच पुढाकार घेतला आहे. शिवरत्न बंगला, यशवंतनगर येथे यासंदर्भात महत्त्वपूर्ण बैठकीत शक्तीपीठ महामार्ग बाधितांच्या समस्यांसह वेगवेगळ्या पैलुंवर चर्चा करण्यात आली.

जेष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील , खासदार धैर्यशील मोहिते-पाटील व आमदार उत्तम जानकर यांच्या उपस्थितीत बाधित शेतकऱ्यांच्या समस्या ऐकून घेण्यात आल्या. शक्तिपीठ महामार्गाची सद्यस्थिती, मोबदला, रेडी रेकनर दर, २० टक्के कपात, जीएसटी संदर्भातील गैरसमज, सर्व्हिस रोड, अंडरपास, पाईपलाईनसाठी डक्ट, जुनी-नवी आलाइनमेंट याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. मा.आ.रणजितसिंह मोहिते पाटील यांनी प्रास्ताविकात सोलापूर जिल्ह्यातील ४ तालुक्यातील ४३ गावातून १२९ किमी रस्ता जात आहे. पानगाव, करकंब तसेच वेळापूर येथे इंटरचेंज आहेत. हा रस्ता पूर्ण भरावाचा असून दर ५०० मीटर अंतरावर अंडरपास तसेच कच्चे सेवा रस्ते आहेत. या मार्गात जमिनी जाणाऱ्या बाधित शेतकऱ्यांना त्यांची संमती असेल तर रेडी रेकनरच्या ५ पट मोबदला दिला जाणार आहे. २०२३ नंतर या जमिनीत केलेल्या बदलाचा मोबदला दिला जाणार नसल्याचे सांगितले.

यावेळी मुनाच कंपनीच्या अधिकाऱ्यांनी प्रश्नोत्तरात सध्याची परिस्थिती आम्ही नकाशात घेणार असून मोबदल्यासाठी दि.३० जानेवारी २०२३ च्या मार्गदर्शक तत्त्वांचा वापर करणार असल्याचे सांगितले. खा.धैर्यशील मोहिते पाटील यांनी या रस्त्यात कोणत्याही प्रकारचे राजकारण न आणता ज्यांची खरेच अडचण असेल त्यांच्या भावना समजून घेतल्या पाहिजेत, असे सांगितले.

यावेळी खा.धैर्यशील मोहिते पाटील, मा.आ.रणजितसिंह मोहिते पाटील, आ.उत्तम जानकर, सभापती दत्ता मगर, माजी जि.प. अध्यक्ष मदनसिंह मोहिते-पाटील, अर्जुनसिंह मोहिते-पाटील , नगरसेवक सयाजीराजे मोहिते-पाटील आदी उपस्थित होते. यावेळी सभापती दत्ता म गर, माजी सभापती मच्छिंद्र ठवरे, चंद्रकांत मगर, उत्तम पाटील, अरणदिवे आदींनी भावना मांडल्या. आमदार रणजीत सिंह मोहिते-पाटील यांनी मतदार याद्यात नाव नोंदणी सुरू आहे. पदवीधर मतदारसंघाचीही नाव नोंदणी सुरू आहे. याबाबत सविस्तर माहिती देऊन तालुक्यातील पाटबंधारे खात्याकडून पाण्याची सद्यस्थिती याची माहिती घेतली.

### प्रत्येक बाधित शेतकऱ्याशी बोलणार

खासदार धैर्यशील मोहिते पाटील २१ तारखेनंतर माढा लोकसभा मतदार संघातील शक्तीपीठ महामार्गामध्ये येणाऱ्या गावांमध्ये जाऊन व ज्यांच्या जमिनी जाणार आहेत त्या शेतकऱ्यांची बैठक घेऊन अडचणी समजून घेणार असल्याचे सांगितले.

### आमदार उत्तम जानकर झाले आक्रमक

आमदार उत्तम जानकर यांनी आक्रमक होत शासनाचा जी आर चुकीचा असून संयुक्तिक मोजणीच्या वेळी असणारी परिस्थिती पाहून तसेच संबंधित शेतकरी व लोकप्रतिनिधी यांची संमती घेऊनच हा रस्ता झाला आहे. या रस्त्याचा स्थानिक शेतकऱ्यांना कसलाही फायदा नाही, रेडी रेकनरचे प्रत्येक गावांचे दर वेगळे आहेत. शासनाने बळाचा वापर करून संयुक्तिक मोजणी केली तर ती आम्ही चालू देणार नाही असा इशारा दिला.

### एकरी १० कोटी दिले तरी नको

एकरी १० कोटी दिले तरी आम्हाला नको, मात्र आमच्या गावातून रस्ता नको अशा निमगावकरांच्या ठाम विरोधाबरोबरच वेळापूर, अरण, करकंब येथील बाधित शेतकऱ्यांचा कडाडून विरोध झाल्यानंतर अखेर या बाधित शेतकऱ्यांची पुन्हा एकदा बैठक घेऊन तोडगा काढण्याचा निर्णय बाधित शेतकऱ्यांच्या बैठकीत घेण्यात आला.

## पानगावातील संत तुकाराम विद्यालयात दहावी-बारावी मधील गुणवंतांचा सन्मान



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १८ मे-**

तालुक्यातील पानगाव येथील संत तुकाराम माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयात नुकत्याच जाहीर झालेल्या दहावी आणि बारावीच्या परीक्षेत यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

प्रशालेत आयोजित या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य आनंद कसबे यांनी केले. इयत्ता दहावीमधील गुणवंत विद्यार्थी प्रथम क्रमांक कु.अंकिता काळे, द्वितीय श्रावणी काळे तृतीय, माधुरी मोरे तसेच इयत्ता बारावीमधील गुणवंत विद्यार्थी प्रथम क्रमांक दीक्षा ताटे, द्वितीय साक्षी काळे व अमृता जाधव, तृतीय आरती वलगुडे यांचा शाळा व्यवस्थापन समि तीचे अध्यक्ष व संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य आनंद कसबे यांच्यासह शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य संतोष कानगुडे, प्रकाश कानगुडे, आबासाहेब ताटे, नितीन काळे, चंद्रकांत जाधव, नितीन शिंदे, भारत ताटे आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांचे कष्ट, पालकांचा पाठिंबा, शाळेचे नियोजन या त्रिसूत्रीचे हे यश असल्याची भावना अनेकांनी यावेळी व्यक्त केली. दरम्यान यशस्वी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी देखील यावेळी मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राजक्ता यादव यांनी तर आभार सुदर्शना कदम यांनी मानले.

## पिलीव परिसरातील तापमानात वाढ; उष्णतेमुळे जनजीवन विस्कळीत

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १८ मे-**

माळशिरस तालुक्यासह पिलीव परिसरात सध्या सुर्य अक्षरशः आग ओकत आहे.तापमानाने कधी नव्हे ते चाळीस पार केली आहे. दिवसा उन्हाचा तडाखा जाणवत असून जनजीवन विस्कळीत झाले आहे.

पिलीव परिसरात सध्या कधी नव्हे ते तापमान ४२ अंशापर्यंत पोहचले आहे. सकाळी ९ वाजल्यापासूनच प्रचंड उन्हाचा तडाखा सुरु होतोय ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत उन्हाचा तडाखा जाणवत आहे. परिणामी सकाळी ९ वाजल्यापासून ते संध्याकाळपर्यंत बाजारपेठ अक्षरश ओसाड पडत आहे. तापमानाचा लहान मुले, वयस्कर नागरीक, जनावरे यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. आजाराचे प्रमाण वाढले आहे. उष्णतेपासून बचावासाठी नागरिक, मुले विहिर, कालव्यांमध्ये पोहणे. थंड पेयाचा वापर करणे, दिवसभर झाडाच्या सावलीत बसणे आदी उपाय करत आहेत.

दुसरीकडे वाढत्या उन्हामुळे सध्या सुळेवाडी, बचेरी, शिंगोर्णी भागात विहिरींनी तळ गाठला आहे. पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई जाणवत आहे. त्यातच पिलीव सोडून आसपासच्या इतर भागात सध्या दहा-दहा तास लोडशेडिंग सुरु आहे. यामुळे तर नागरिकांचा जीव अक्षरशः मेटाकुटीस आला आहे. मे महिन्याच्या अखेरीस मोठा पाऊस पडल्याशिवाय तापमान कमी होणार नाही अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. पण तोपर्यंत नागरिकांचा जीव अक्षरशः मेटाकुटीस आला आहे.

## बार्शीत पोलिस पाटील, ग्रामसुरक्षा दल व पोलिसमित्र यांच्यात बैठक

### तालुका पोलिस ठाण्यातर्फे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि १८ मे-**

सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली रविवार दि.१७ मे रोजी बार्शी तालुका पोलीस ठाणे येथे पोलीस ठाणे हद्दीतील पोलीस पाटील, ग्राम सुरक्षा दल व पोलीस मित्र यांची बैठक झाली.

बैठकीत आगामी उत्सव, सण, बकरी ईद तसेच आगामी ग्रामपंचायत निवडणुका शांततापूर्ण पार पाडण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. गावामध्ये कोणताही अनुचित प्रकार घडू नये, सामाजिक सलोखा कायम राहावा, अफवा किंवा आक्षेपार्ह संदेश सोशल मीडियावर प्रसारित होऊ नयेत याबाबत सूचना दिल्या. तसेच गावातील संशयित हालचाली, भांडण-तंटे, अवैध धंदे, जातीय किंवा धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या व्यक्तींवर लक्ष ठेवून तत्काळ पोलीस ठाण्यास माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले.

बैठकीदरम्यान ग्राम सुरक्षा दल व पोलिस मित्र यांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करुन गावातील शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी सक्रिय सहभाग नोंदविण्याबाबत मार्गदर्शन केले. आगामी काळात गावपातळीवर पोलिस व नागरिक यांच्यात समन्वय वाढवून गुन्हे प्रतिबंधक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना दिल्या. तसेच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी बार्शी तालुका पोलीस ठाणे आवारात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी '१ पोलिस पाटील - १ वृक्ष' या उपक्रमांतर्गत उपस्थित पोलिस पाटील यांना प्रत्येकी एक वृक्ष देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमास सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश माने, एपीआय दिलीप ढेरे, पीएसआय भालेराव, एएसआय गवळी, पोलीस हवालदार दशरथ बोबडे, राजेंद्र मंगरुळे, रुपेश शेलार, धनराज केकाण, देशमुख, कॉन्स्टेबल राहुल बोंदर, सुरेश बिरकले, ओमप्रकाश दासरे, रोहित बागल उपस्थित होते.



## गाय समजून घेतल्यास शेतीत यश; चिखलठाण येथे गोसेवकांचा स्नेहमेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.१८ मे-**

शेतकरी जोपर्यंत गाईला समजून घेत नाही, गाईच्या गोमूत्र आणि शेणाचा योग्य वापर करत नाही, तोपर्यंत शेतीचे खरे अर्थकारण फायद्याचे होणार नाही. गोमूत्र हे रासायनिक खतांच्या तुलनेत शुद्ध सोन्यासारखे आहे. गाईचे महत्त्व समजले, तर शेतकऱ्यांचे भविष्य निश्चित बदलू शकते, असे परखड विचार गोसेवक परमेश्वर तळेकर यांनी व्यक्त केले.

ग्राम सुधार समितीच्या माध्यम ातून कोटलिंग मंदिर चिखलठाण येथे आयोजित जिव्हाळा ग्रुपच्या स्नेहमेळाव्यात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी आनंद पतसंस्थेचे अध्यक्ष डॉ. सुभाष सुराणा हे होते. व्यासपीठावर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र बारकुंड, धरणग्रस्त संघर्ष समितीचे अध्यक्ष प्रा. शिवाजी बंडगर, प्रा. सुहास गलांडे, 'लोकविकास'चे चेअरमन दीपक देशमुख, आदिनाथचे माजी उपाध्यक्ष प्रा. शहाजी देशमुख, आदिनाथचे माजी कार्यकारी संचालक हरिदास डांगे, ग्राम सुधार समितीचे अध्यक्ष डॉ. बाबुराव हिरडे, उपाध्यक्ष नाथाजी शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात डॉ. सुभाष सुराणा यांनी विज्ञान आणि अध्यात्म यांची सांगड घालण्याची गरज अधोरेखित केली. अंधश्रद्धेला खतपाणी घातले, तर जीवनाचे कल्याण होणार नाही, असे स्पष्टपणे सांगितले. स्वागत राजेंद्र बारकुंड यांनी तर गजेंद्र पोळ यांनी सूत्रसंचालन केले

यावेळी राजेंद्र रणसिंग, निळकंठ ताकमोगे, प्रशांत नाईकनवरे, कैलास लबडे, विलास लबडे, विजय लबडे, नानासाहेब साळुंखे, प्रमोद गव्हाणे, सचिन गव्हाणे, चंद्रकांत पवार,माजी प्राचार्य नागेश माने आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# पंढरपुरात उद्यापासून तीन दिवस पाचवे अक्षर संमेलन

### कलाकारांची मांदियाळी, तीन दिवस जमणार कला-वारकरी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १८ मे-**

अक्षरकलेचे जतन, संवर्धन आणि कलाकारांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी पंढरपुरमध्ये पाचवे राज्यस्तरीय अक्षर संमेलन होत आहे. गोपाळपूर येथील स्वेरी कॉलेज येथे २२, २३ आणि २४ मे रोजी राज्यभरातून कला- वारकऱ्यांचा मेळावा होत आहे.

अक्षरांची गोडी, माणसे जोडी हे सुंदर ब्रीदवाक्य घेऊन माझी शाळा माझा फळासमूह आणि स्वेरी कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने या भव्य अक्षर संमेलनाचे नियोजन केले आहे. संमेलनामध्ये महाराष्ट्रासह देशभरातून सुमारे ५०० कलाकार सहभागी होत आहेत. पहिल्या दिवशी उद्घाटन सोहळ्यानंतर फलक लेखन आणि लाईव्ह स्केच प्रात्यक्षिक होणार आहे. कलाकार आपल्या कुंचल्यातून आणि अक्षरातून सजीव कलाविष्कार साकारणार आहेत. त्यानंतर फॅब्रिक कॅलिग्राफी आर्ट्स अंतर्गत कापडी पिशव्या आणि टी-शर्टवरील सुलेखनाचे आकर्षक सादरीकरण केले जाईल. कलेला आधुनिकतेची जोड देत व्यावसायिक संधी निर्माण करण्याचा हा अभिनव प्रयत्न आहे. याच दिवशी अक्षर व गालिचा रांगोळीचे प्रात्यक्षिक आणि कार्यशाळाही होत आहे.




### संमेलनाची वैशिष्ट्ये

✻ महाराष्ट्रासह देशभरातून सुमारे ५०० कलाकार ✻ पोर्ट्रेट रांगोळी, फॅब्रिक कॅलिग्राफी, लाईव्ह स्केच प्रात्यक्षिक ✻ उल्लेखनीय कलाकारांना राज्यस्तरीय अक्षर गौरव पुरस्कार ✻ दोन्ही रात्री सांस्कृतिक कार्यक्रम

दुसऱ्या दिवशी व्यक्तिचित्र रांगोळीचे (पोर्ट्रेट रांगोळी) थक्क करणारे प्रात्यक्षिक आहे. यानंतर सुलेखन प्रात्यक्षिक व चर्चासत्र होत आहे. मी आणि माझे सुलेखन या उपक्रमांतर्गत कलाकार आपल्या वैयक्तिक कलाप्रवासाचे अनुभव मांडणार आहेत. ऑनलाईन मार्केटिंग, कॅलिग्राफी सॉफ्टवेअर आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा कलेमध्ये वापर यावरही विशेष चर्चा होणार आहे. कलेचा प्रवास लोकल ते ग्लोबल या विषयावर आयोजित मुलाखत सत्र कलाकारांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. शेवटच्या दिवशी टायपोग्राफी, फलक लेखन आणि फॉन्ट या विषयांवर विशेष सादरीकरण आहे. त्यानंतर उल्लेखनीय कलाकारांना राज्यस्तरीय अक्षर गौरव पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. सर्वच सहभागी कलाकारांना स्मृतीचिन्ह देण्यात येणार आहे. संमेलना दरम्यान दोन्ही रात्री सांस्कृतिक कार्यक्रम होत आहेत. सहभागी कलाकारांच्या उपस्थितीत संगीत रजनीचे बहारदार कार्यक्रम रंगणार आहेत. कला आणि संस्कृतीचा अनोखा मिलाफ अनुभवायला मिळणार आहे. संमेलनाचे अध्यक्ष म्हणून कॅलिग्राफीची आवड असणारे महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाचे मुख्याधिकारी (गट- अ ) शुभम गायकवाड हे असणार आहेत. स्वागत अध्यक्षपद होप फाउंडेशन महाड येथील नरेंद्र महाडिक भूषविणार आहेत. संमेलनाची सर्व धुरा संयोजक अक्षरमित्र अमित भोरकडे, ज्ञानेश्वर विजागत, एम.एम.पवार व प्रशांत वाघमारे संभाळत आहेत. सहभागी कलाकारांना ऑनलाइन रजिस्ट्रेशन आवश्यक आहे. संमेलनातील कलाकृती व लेखन साहित्य सर्वांसाठी २४ मे रोजी पाहता येतील.